सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, २८ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ८० | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विनम्र अभिवादन



अनादि मी अनंत मी, अवध्य मी
भला मारिल रिपु जगतिं
असा कवण जन्मला ।
असे धीरोदात्त काव्य करणाऱ्या
स्वातंत्र्यवीर सावरकर यांची आज जयंती

## विचारपुष्प



समाजाला हानिकारक, केवळ स्वार्थापोटी उत्पन्न झालेली इच्छा ही विकृती आहे. जनहिताला पोषक, समाज धर्माला अनुकूल असलेली इच्छा प्रत्यक्ष परमेश्वरासारखी उदात्त आहे.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

४ केंद्राचे स्वागतार्ह पाऊल (अग्रलेख)

# ‘एसआयआर’ प्रक्रिया वैधच

## ● सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ● निष्पक्ष निवडणुकांच्या जनादेशात फुंकते प्राण

◆ **नवी दिल्ली, २७ मे**

मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण करण्याची निवडणूक आयोगाची प्रक्रिया वैध आहे तसेच ही प्रक्रिया घेण्याचा आयोगाचा अधिकार कायम आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिला. हा निवडणूक आयोगासाठी मोठा विजय मानला जात आहे. ही प्रक्रिया निष्पक्ष निवडणुका घेण्याच्या घटनात्मक आदेशात प्राण फुंकते, असेही न्यायालयाने नमूद केले.

ही प्रक्रिया मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्याच्या घटनात्मक अनिवार्यतेस पुढे नेते, असे या अत्यंत गाजलेल्या मुद्यावर निकाल देताना सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वातील न्यायासनाने स्पष्ट केले. एसआयआर प्रक्रिया राबवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला संविधानाच्या अनुच्छेद ३२४ आणि लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम २१(३) अन्वये आहे, असा निर्णय न्या. जॉयमाल्या बागची यांचाही समावेश असलेल्या न्यायासनाने दिला.



### याद्यांच्या सचोटीवरच निष्पक्ष निवडणुका

**ही वादग्रस्त प्रक्रिया केवळ प्रशासकीय सोयीसाठी अवलंबलेली एक पद्धत आहे, असा निष्कर्ष काढणे आम्हाला शक्य होत नाही, असे न्यायासनाने नमूद केले. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका या केवळ मतदानाशी संबंधित तांत्रिक बाबींवर अवलंबून नसतात. त्या प्रामुख्याने मतदार याद्यांची सचोटी, अचूकता आणि विश्वासार्हतेवर अवलंबून असतात, असेही त्यात म्हटले.**

मतदारयादीतून नाव वगळणे म्हणजे एखादी व्यक्ती नागरिक नाही, अशी कायदेशीर घोषणा करणे नव्हे, असा निर्वाळा बिहारमधील एसआयआर प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या याचिकांचा एक संच निकाली काढताना न्यायालयाने दिला. न्यायालयाच्या निकालामुळे संपूर्ण राजकीय वर्तुळातून तीव्र राजकीय प्रतिक्रिया उमटल्या.

सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर प्रक्रिया कायदेशीर आणि घटनात्मक असल्याचे घोषित केले आहे. यावरून स्पष्ट होते की, राहुल गांधी आणि काँग्रेसने या प्रक्रियेला सुरुवातीपासूनच विरोध केला. कारण, ते भारतीय मतदारांच्या नव्हे, तर बेकायदेशीर घुसखोरांच्या बाजूने उभे होते, असे भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी ‘एक्स’वरील एका पोस्टमध्ये म्हटले.

न्यायालयाचा बिहारमधील एसआयआरबाबतचा निर्णय आयोगाच्या तर्कहीन, घाईगडबडीच्या आणि भेदभावपूर्ण कार्यपद्धतींवर शिक्कामोर्तब करणारा आहे. या कार्यपद्धतींमुळेच बंगालमधील एसआयआर प्रक्रियेनंतर २७ लाख वैध मतदार मतदानापासून वंचित राहिले आणि त्यांचे भवितव्य आजही अधांतरीच आहे. न्याय झाला पाहिजे आणि होतानाही तो दिसला पाहिजे, असे तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या.

आपण न्यायालयापासून जाणीवपूर्वक दूर राहिलो. कारण, औपचारिक निकाल येण्यापूर्वीच, या खटल्याचा अंतिम परिणाम काय असेल, हे खूप आधी स्पष्ट झाले होते, असे या खटल्यातील पक्षकारांपैकी एक निवडणूक विश्लेषक आणि कार्यकर्ते योगेंद्र यादव यांनी सांगितले.

एसआयआर ही निष्पक्ष निवडणुका घेण्याच्या घटनात्मक आदेशात प्राण फुंकते, असे न्यायालयाने आयोगाने आपल्या वैधानिक अधिकारांची मर्यादा ओलांडल्याचा युक्तिवाद फेटाळताना नमूद केले. पहिल्या टप्प्यात आयोगाने बिहारमध्ये एसआयआर प्रक्रिया सुरू केली. तिथे मागील चार दशकांतील वेगाने झालेले शहरीकरण आणि मोठ्या प्रमाणातील स्थलांतरणामुळे मतदार यादीतून ६५ लाख नावे वगळण्यात आली. *(वृत्तसंस्था)*

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती विशेष

# विचारांचा अखंड धबधबा म्हणजे ‘वैनायक’!



**स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवितांचे अर्थ समजण्यासाठी उत्कट भावना आणि अभ्यास लागतो. त्यांच्या कविता घटनांवर भाष्य करतात. मनात उचंबळून आलेल्या भावनांची, विचारांची ती उत्कट अभिव्यक्ती असते. या काव्य प्रवाहाला वृत्त-छंदांचे बंधन नसते. ठरावीक लयीचे बंधन असते, पण यमक साधण्याचा अट्टहास नसतो. इंग्रजी साहित्यातील ब्लँक व्हर्सशी साधर्म्य सांगणाऱ्या काव्यरचनेची गरूडभरारी म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिभेतून साकारलेले वृत्त वैनायक!**

**रेवती जोशी-अंधारे**

◆ **नागपूर, २७ मे**

स्वातंत्र्यवीरांनी वैनायक वृत्ताची रचना अंदमानच्या तुरुंगवासादरम्यान केली. ‘मी स्वभावाने कवी पण परिस्थितीने क्रांतीकारक बनलो,’ असे ते स्वत:विषयी म्हणतात. त्यांनी अनेक कविता विविध वृत्तात, छंदात बांधून लिहिल्या. विचारांच्या आवेगाला वृत्त-छंद किंवा यमकाचे बंधन न घालता, कागदावर उतरविणारे त्यांचे वैनायक वृत्त एका अर्थी निर्यमक धवलचंद्रिका वृत्त आहे, असा मतप्रवाह आहे. मात्र, हे मात्रवृत्त असून यात सहा मात्रंचे तीन गट आणि शेवटी एक गुरू अक्षर, अशी चरण योजना असते, अशीही मान्यता आहे.

दुसऱ्या मतप्रवाहानुसार य म त र असे चार गण आणि एक गुरू म्हणजे वैनायक वृत्त! स्वातंत्र्यवीरांनी यातील अंत्य यमक काढले आणि उपांत्य अक्षर लघू असावे, ही अटही काढली. परिणामी, यमक नसलेले आणि वाक्यार्थाचा संदर्भ तसाच पुढील ओळीत शिरणारे वैनायक वृत्त आकाराला आले. प्रभावी आणि भावनाप्रधान काव्य निर्यमक वैनायक वृत्तात रचण्याचा हा प्रयोग नंतर ‘पुस्तकबंद’ झाला.

सावरकरांच्या नावाशी साधर्म्य सांगणारे वैनायक हे नाव, त्याच्या गरूड या दुसऱ्या अर्थालाही साजेसे आहे. यमक, शब्दांची मर्यादा भेदत मुक्तछंदाच्या जवळ जाणाऱ्या या वृत्तात स्वातंत्र्यवीरांच्या ‘कमला’ व ‘गोमंतक’ या दीर्घकाव्याची मांडणी केली. वैनायक वृत्तात प्रयोगशील सावरकरांनी ‘मूर्ति दुजी ती’, ‘मरणोन्मुख शय्येवर’, ‘महासागर’ या रचना अंदमानात लिहिल्या. यामध्ये वैनायकाचा जोरकसपणा लक्षात येतो.

वृत्ताच्या बंधनांमुळे पल्लेदार कल्पना खंडतात आणि वृत्तांच्या या हतबलतेची जाणीव सावरकरांना झाली. या मौलिक काव्यरचनांद्वारे सावरकरांनी मराठी साहित्यात तत्त्वज्ञान आणि क्रांतिकारी विचारांना निर्विवादपणे नवी उंची दिली.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास साहित्यिकांनी करायलाच हवा. त्यांची संस्कृतप्रचुर भाषा अभ्यासाशिवाय काव्यरसिकांच्याही आवाक्याबाहेर आहे. सावरकरांच्या काव्यरचनांचाही अभ्यास व्हायला हवा. विद्यापीठांमध्ये स्वा. सावरकर साहित्य अध्यासन सुरू झाल्यास दर्जेदार चर्चा आणि संशोधन कार्यातून नवे अभ्यासक घडतील, असे मत स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था, पुण्याच्या मार्गदर्शिका डॉ. शुभा साठे यांनी व्यक्त केले.

# होर्मुझ खुली करणार

◆ **तेहरान, २७ मे**

इराण-अमेरिका यांच्यातील शांतता कराराचा मसुदा तयार झाला असून, लवकच होर्मुझ सामुद्रधुनीतील कोंडी फुटण्याची आशा पल्लवित झाली आहे. सामंजस्य कराराच्या मसुद्याअंतर्गत, अमेरिकन सैन्य इराणच्या आसपासच्या भागातून माघार घेईल आणि या जलमार्गातील नाकाबंदी उठवेल, तर दुसरीकडे इराण जहाजांच्या वाहतुकीसाठी सुरक्षेची हमी देईल.

अमेरिकेने जलमार्गातील नाकाबंदी उठवण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी खुली होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीने म्हटले की, अमेरिकेसोबतच्या सामंजस्य कराराच्या प्राथमिक आराखड्याचा मसुदा तयार झाला आहे. मसुद्यानुसार, इराण एका महिन्याच्या आत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांची वाहतूक युद्धपूर्व पातळीवर पूर्ववत करेल. *(वृत्तसंस्था)*

# पुण्यातील शिक्षकासह डॉक्टर अटकेत

**नीट पेपरफूट प्रकरण**

### देशभरातून १३ अटकेत

◆ **पुणे, २७ मे**

‘नीट’ पेपरफूट प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातील खासगी ‘नीट’ मार्गदर्शन क्लासमधील शिक्षक हर्षद शहा, तसेच लातूरमधील बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना मंगळवारी उशिरा रात्री अटक केली. नीट पेपरफूट प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला अटक करण्यात आली होती. लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे याने कुलकर्णीकडून रसायनशास्त्राचे प्रश्न मिळविले होते. डॉ. शिरुरेची या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर डॉ. शिरुरेला सीबीआयने अटक केली.

नीट पेपरफूट प्रकरणात आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली. डॉ. शिरुरे हे मूळचे लातूरचे आहेत. यापूर्वी या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. कुलकर्णीकडून डॉ. शिरुरेने रसायनशास्त्राचे प्रश्न मिळवले होते. हे प्रश्न आणि अचूक उत्तरे डॉ. शिरुरेने लातूरमधील एका शिकवणी वर्ग चालकाच्या मुलासह तीन विद्यार्थ्यांना दिले होते.

पुण्यातील शिवाजीनगर भागात असलेल्या एका खासगी शिकवणी वर्गातील भौतिकशास्त्राचे शिक्षक तेजस हर्षदकुमार शहा याला अटक करण्यात आली. पेपरफूट प्रकरणात अटक करण्यात आलेल्या शिक्षिका मनीषा हवालदारने शहाला भौतिकशास्त्राचे प्रश्न आणि अचूक उत्तरे दिली होती. *(तभा वृत्तसेवा)*







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### एअर इंडियाच्या विमानात हवेतच बिघाड

**नवी दिल्ली :** एअर इंडियाचे २३० प्रवासी असलेले सॅन फ्रान्सिस्कोला जाणारे विमान हवेत तब्बल आठ तासांपेक्षा जास्त वेळ राहिल्यानंतर पुन्हा दिल्लीला परतले, अशी माहिती विमान कंपनीने दिली. विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे विमान मागे फिरवावे लागले असून, त्याचे दिल्ली विमानतळावर सुरक्षित लँडिंग झाले. एअर इंडियाने निवेदनात म्हटले की, २७ मे रोजी दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोसाठी एआय १७३ विमानाने उड्डाण केले. नियमांनुसार तांत्रिक समस्येमुळे दिल्लीत परतले आहे. विमान सुरक्षितपणे उतरले असून, एअर इंडियाच्या सुरक्षा मानकांनुसार आता त्याची तांत्रिक तपासणी केली जाईल. हे विमान चिनी हवाई हद्दीत असताना, जवळपास तीन तासांपेक्षा जास्त वेळ उड्डाण केल्यानंतर ते पुन्हा दिल्लीच्या दिशेने वळवण्यात आले होते. प्रवासी आणि क्रू मेंबर्सची सुरक्षा आणि कल्याण हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. प्रवाशांना झालेल्या त्रासाबद्दल आम्ही दिलगीर आहोत. त्यांना लवकरात लवकर त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली जात असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## ‘लोकहितं मम करणीयम्’....



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक तरुण भारत नागपूरच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या ‘लोकोत्तर’ या विशेषांकाचे प्रकाशन करताना ना. नितीन गडकरी. यावेळी श्री नरकेसरी प्रकाशनचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलास डांगरे, कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, तरुण भारतचे प्रबंध संचालक धनंजय बापट यांच्यासह श्री नरकेसरी प्रकाशन संचालक मंडळातील सर्वश्री अशोक मानकर, संदीप पोशेट्टीवार, समीर गौतम, आशिष बडगे, मीरा कडबे, महाव्यवस्थापक देवेंद्र टोणपे आणि जाहिरात विभागातील कर्मचारी उपस्थित होते

# बुरशी, जीवाश्म शेवाळांना मिळाली जागतिक ओळख

**जैविक कुळ-नावांना मान्यतेचा डॉ. देशमुख यांचा दावा**

◆ **चंद्रपूर, २७ मे**

कवकशास्त्र’ आणि जीवाश्म शेवाळांच्या वर्गीकरणशास्त्रात चंद्रपूरचे प्राध्यापक डॉ. उमाकांत देशमुख यांनी केलेल्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. ‘अंबेल्युसेसी’ आणि ‘वेसिक्युलोस्ट्रोमॅटेसी’ या त्यांच्या दोन नवीन जैविक कुळ-नावांचा जागतिक वैज्ञानिक समुदायाने स्वीकार केला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

येथील जनता महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. उमाकांत देशमुख यांनी कवक वर्गासाठी ‘अंबेल्युसेसी यू. बी. देशमुख’ हे नवीन कुळनाव प्रस्तावित केले असून ते न्यूझीलंडमधील प्रतिष्ठित ‘फायटोटॅक्सा’ या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झाले आहे. यापूर्वी अस्तित्वात असलेले ‘अ‍ॅग्रिकोमायसेटेस’ हे नाव आंतरराष्ट्रीय नामकरण नियमांनुसार अवैध ठरल्यानंतर त्यांनी सखोल अभ्यास करून नवीन वैध नाव सुचविले. हे कुळ वर्ग ‘अ‍ॅग्रिकोमायसेटेस’ आणि ‘बासिडिओमायकोटा’ संघातील



कवकांशी संबंधित असून त्याची अधिकृत नोंद जागतिक स्तरावरील ‘मायकोबँक’ (एमबी ८६३५९७) मध्ये करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या कुळाचा प्रकार वंश ‘अंबेल्युस’ असून त्याची प्रकार प्रजाती ‘अंबेल्युस सायनेसिस’ आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

डॉ. देशमुख यांनी, पेरू येथील संशोधक ‘एड्यूरडो ए. मोलिनारी-नोवोआ’ यांच्या सहकार्याने जीवाश्म निळ्या-हिरव्या शेवाळांवरही संशोधन केले. या संशोधनातून ‘वेसिक्यूलोस्ट्रोमेटेसी यु. बी. देशमुख अ‍ॅन्ड मोलिनारी’ हे नवीन कुळनाव प्रस्तावित करण्यात आले असून ते आयर्लंडमधील ‘युनिव्हर्सिटी गालवे’ अंतर्गत प्रसिद्ध होणाऱ्या ‘नोटुलाई अल्गारम’ या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. पूर्वी अस्तित्वात असलेले ‘वेसिक्युलराईसी’ हे नाव अवैध ठरल्यानंतर नव्या वैज्ञानिक नियमांनुसार हे वैध नामकरण करण्यात आले. तसेच ‘वेसिक्युलोस्ट्रोमा’ या जीवाश्म शेवाळ वंशातील चार प्रजातींसाठी नवीन वैज्ञानिक संयोजनांची नोंदही करण्यात आली आहे.

या यशाबद्दल डॉ. देशमुख यांनी, रॉयल बोटॅनिक गार्डन्स, एडिनबर्ग येथील डॉ. जॉन मॅकनिल, हार्वर्ड युनिव्हर्सिटी हर्बेरिया येथील डॉ. कांची गांधी तसेच जर्मनीतील वेस्टरडिजेक फंगल बायोडाव्हर्सिटी इन्स्टिट्यूटमधील मायकोबँक क्युरेटर कोंस्टेंज बेश्नच यांचे आभार मानले आहेत.? ◂(तभा वृत्तसेवा)

### सिद्धरामय्या आज देणार मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

**बंगळुरू :** मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विनंतीवरून राज्यपालांनी त्यांना गुरुवारी



सकाळी १०.३० वाजता भेटीची वेळ दिली आहे. यावेळी ते मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा राज्यपालांकडे सोपविणार आहेत. राज्याचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी सांगितले की, पक्षाचे नेते काँग्रेस हायकमांडच्या निर्णयाचे पालन करतील. पक्ष नेतृत्वाच्या आदेशावरून मुख्यमंत्री निर्णय घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाचे सरचिटणीस आणि कर्नाटकचे प्रभारी रणदीप सिंग सुरजेवाला गुरुवारी पत्रपरिषदेत कर्नाटक सरकारच्या आगामी नेतृत्वासंदर्भात माहिती देणार आहेत. मुख्यमंत्री सिद्धरामय्या गुरुवारी राज्यपालांची भेट घेणार असून, राजीनाम्यासंदर्भात आपल्याला माहीत नसल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली आहे, या संदर्भात सर्व मंत्र्यांना संदेश पाठवण्यात आले.

# सीमापार दहशतवादाचे परिणाम भोगावे लागतील

**भारताचा ‘युनो’त पाकिस्तानला इशारा**

**आत्मरक्षणाचा आम्हाला अधिकार**

◆ **न्यू यॉर्क, २७ मे**

सीमापार दहशतवादाला दिलेल्या आश्रयाचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागतील, असा सज्जड इशारा भारताने संयुक्त राष्ट्राच्या एका बैठकीत पाकिस्तानला दिला. आपल्या शेजारी देशाकडून घडवल्या जाणाऱ्या अशा दहशतवादी हल्ल्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार असल्याचे भारताने स्पष्ट केले.

पाकिस्तानने आज केलेल्या निराधार आणि अनुचित विधानांना प्रत्युत्तर देणे मला भाग पडले आहे. भारत या संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट करू इच्छितो, असे संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे कायमस्वरूपी प्रतिनिधी, राजदूत हरीश पर्वथनेनी यांनी मंगळवारी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या बैठकीत सांगितले.

स्वतंत्र भारताच्या वाटचालीची सुरुवातच पाकिस्तानच्या सीमापार आक्रमणाशी लढा देण्यात झाली. पूर्ण कायदेशीर आणि अपरिवर्तनीय विलीनीकरणाद्वारे भारताचे भाग बनलेल्या प्रदेशांचा पाकिस्तानला हव्यास होता, असे पर्वथनेनी बरसले. मे महिन्यासाठी १५ राष्ट्रांच्या या संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थेचे अध्यक्षपद चीनकडे असताना चीनच्याच अध्यक्षतेखाली सुरक्षा परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेची उद्दिष्टे आणि तत्त्वे कायम राखणे तसेच संयुक्त राष्ट्रसंघावर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था बळकट करणे या विषयावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान, पर्वथनेनी यांनी पाकिस्तानला हे जोरदार उत्तर दिले. पाकिस्तानकडून सीमेपलीकडील दहशतवादाचा वापर आणि भारताला हजारो जखमा करून रक्तबंबाळ करण्याची त्याची नीती, हे त्याचे पोकळ वक्तृत्व आणि संयुक्त राष्ट्राच्या सनदेप्रती असलेल्या कटिबद्धतेच्या दाव्याचा फोलपणा स्पष्ट करणारे आहे.

अशा सीमापार दहशतवादापासून स्वतःचे रक्षण करण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. सीमापार दहशतवादाला दिलेल्या आश्रयाचे परिणाम भोगावे लागतात, हे पाकिस्तानला मान्य करावे लागेल, असे पर्वथनेनी यांनी सांगितले. अनेक युद्धे छेडून, भारतावर अकारण आक्रमण करून आणि सीमापार दहशतवादाला सातत्याने आश्रय देऊन, पाकिस्तानने सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. ◂(वृत्तसंस्था)



**विनाशकारी शक्तींचा वापर**

पाकिस्तानने दहशतवाद, धार्मिक अतिरेकीपणा, हिंसक मूलतत्त्ववाद आणि भारतविरोधी प्रचार यासारख्या विनाशकारी शक्तींचा वापर करण्याचे धोरण, आपल्या निर्मितीपासूनच कोणत्याही खंडविना सुरू ठेवले आहे. त्यासाठी अधिक स्पष्टीकरणाची गरज नाही. पाकिस्तानने दहशतवादाच्या सर्व प्रकारांना दिलेला पाठिंबा, विश्वासार्ह आणि अपरिवर्तनीय अशा पद्धतीने पूर्णपणे थांबवलाच पाहिजे, असे भारताने म्हटले.

**जम्मू-काश्मीरसोबतच सिंधू जलकराराचे तुणतुणे**

सुरक्षा परिषदेतील चर्चेला संबोधित करताना पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला तसेच सिंधू जलकराराचाही संदर्भ दिला. हा करार भारताने एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर स्थगित केला होता. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील लष्कर-ए-तोयबाची उपसंघटना द रेझिस्टन्स फ्रन्टने स्वीकारली होती.

# मान्सूनची भारताच्या दिशेने वाटचाल

◆ **नवी दिल्ली, २७ मे**

केरळम्‌मधील मान्सूनच्या आगमनाची २६ मे ही अपेक्षित तारीख हुकली असली, तरी नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्राचा काही अधिक भाग, लक्षद्वीप परिसर आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनने पुढील वाटचाल केली आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने बुधवारी दिली.



मान्सून २६ मे रोजी केरळम्‌मध्ये दाखल होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने यापूर्वी वर्तवला होता. या मॉडेलच्या अंदाजामध्ये अधिक किंवा उणे चार दिवसांची तफावत असू शकते. सामान्यपणे मान्सून केरळम्‌मध्ये १ जून रोजी दाखल होतो. यासह देशात पावसाळा सुरू होतो.

मागील वर्षी मान्सून २४ मे रोजी केरळम्‌मध्ये दाखल झाला होता, अशी माहिती हवामान विभागाने दिली. पुढील दोन-तीन दिवसांत नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्राच्या आणखी काही भागांत लक्षद्वीप परिसरात तसेच नैऋत्य, पूर्व-मध्य व पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात, आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांत आणि ईशान्य बंगाल उपसागराच्या काही भागांत पुढील वाटचाल करण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, असे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे.

भारताला आपल्या ७० टक्क्यांपेक्षा जास्त वार्षिक पाऊस मान्सूनच्या महिन्यांत मिळतो. यामुळे शेती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, जलविद्युत निर्मिती आणि भूजल पुनर्भरण यासाठी हा ऋतू अत्यंत महत्त्वाचा ठरतो. ◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...

### अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून धमकी; तरुणाविरुद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२७ मे-**

कॉलेजला ए-जा करणाऱ्या एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून प्रेमसंबंधासाठी धमकी दिल्याप्रकरणी एका तरूणाविरूद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८, ३५१(२) तसेच पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. आकिब आजमोद्दिन शेख (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. पीडित मुलगी ही ३० एप्रिल रोजी दुपारी कॉलेजमधून घरी जात होती. तेव्हां आकिब शेख याने तिचा रस्ता अडवून प्रेमसंबंध ठेवण्याची मागणी केली. मुलीने नकार दिल्यास तिचे फोटो व्हायरल करून बदनामी करण्याची तसेच तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर १५ मे रोजी दुपारी व्हिवको प्रोसेस चौक परिसरात आरोपीने पुन्हा मुलीचा पाठलाग करत तिला त्रास दिला. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीने सर्व घटना आपल्या पालकांना सांगितली. मुलीच्या आई वडीलांनी जेलरोड पोलिस ठाण्यात धाव घेऊन आरोपी विरुद्ध रीतसर फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

### डोक्यात दगड घालून केले जखमी; मंगळवेढा पोलिसांत चौघांवर गुन्हा

**मंगळवेढा, दि. २७ मे -**

भाळवणी येथे झाडाचे आंबे दिल्याने एका ३३ वर्षीय तरुणास डोक्यात दगड घालून गंभीर जखमी केल्याप्रकरणी पद्मिनी गायकवाड, सुनिता पाटील, वेदांत पाटील, आदित्य पाटील (रा.आलेगाव) यांच्याविरुध्द पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी रविकिरण गायकवाड (रा.भाळवणी) हे दि.७ मे रोजी दुपारी ३ वाजता घराच्या पाठीमागे असलेल्या आंब्याच्या झाडाचे आंबे पत्नी वैशालीसह उतरवत होते. यावेळी फिर्यादीची आई पद्मिनी, बहिण सुनिता हिची मुले आदित्य व वेदांत हे सदर ठिकाणी आले. सजाबाई गायकवाड हिला तुम्ही झाडाचे आंबे का दिले? असे म्हणून वरील आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत पडलेला दगड घेवून फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. वैशाली ही भांडणे सोडविण्यास आली असता तिलाही शिवीगाळ करीत लाथाबुक्क्याने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

### सिद्धेश्वर प्रशालेच्या पायरीवर तीस वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**सोलापूर, दि.२७ मे-**

येथील सिद्धेश्वर प्रशालेच्या पायऱ्यावर एका तीस वर्षीय तरुणाचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आज बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास आढळून आला. प्रज्योत शशिकांत व्यवहारे (वय ३०, रा.जुनीमिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. आज बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास सिद्धेश्वर प्रशालेच्या पायरीजवळ तो बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. याची माहिती फौजदार चावडीच्या पोलिसाना समजताच पोलिस हवालदार रुपनर यांनी घटनास्थळी पोहोचून त्याला येथील शासकीय रुग्णालयात दुपारी अडीच वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत प्रज्योत व्यवहारे हा अविवाहित असून तो मजुरी करायचा. त्याच्या पश्चात आई आणि भाऊ असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.




### विवाहितेकडून उंदीर मारण्याचे औषध प्राशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

अज्ञात कारणावरून एका विवाहित तरुणीने उंदीर मारण्याचे औषध पिल्याची घटना कुमठा नाका भागातील भारत नगरात आज बुधवारी पहाटे दोन वाजता घडली. पूजा पारधे (वय २६, रा. भारत नगर, सोलापूर) असे त्या विवाहितेचे नाव आहे. तिने आज पहाटे घरामध्ये अज्ञात कारणावरून उंदीर मारण्याचे औषध पिले. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी पती राजू याने येथील शासकीय रुग्णालयात पहाटे दाखल केले.

## नीट-यूजी फेरपरीक्षेचा उच्चस्तरीय समितीने घेतला आढावा

◆ **नवी दिल्ली, २७ मे**

केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन् यांच्यासोबत बुधवारी आगामी नीट-यूजी फेरपरीक्षेचा आढावा घेतला. डॉ. के. राधाकृष्णन् हे राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) संदर्भातील शिफारसींच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या उचाधिकार सुकाणू समितीचे अध्यक्षही आहेत.

या बैठकीला उच्च शिक्षण सचिव, एनटीएचे महासंचालक, एटीएचे वरिष्ठ अधिकारी आणि शिक्षण मंत्रालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान एनटीएच्या महासंचालकांनी परीक्षा सुरक्षेला बळकटी देण्यासाठी आणि परीक्षा सुरळीतपणे पार पडावी यासाठी हाती घेतलेल्या अतिरिक्त उपाययोजनांची सदस्यांना माहिती दिली. यामध्ये विद्यमान पाळत यंत्रणांचे सर्वंकष मूल्यमापन आणि त्या अधिक सक्षम करण्याच्या योजनांचा समावेश होता. परीक्षेची सुरक्षा हीच सर्वोच्च महत्त्वाची बाब असल्याचे अधोरेखित करताना प्रधान यांनी सांगितले की, देशभरातील परीक्षा केंद्रांवर पुरेशा सुविधा आणि विद्यार्थी-स्नेही वातावरण उपलब्ध करून देण्यालाही तितकेच प्राधान्य दिले गेले पाहिजे. नीट-यूजी फेरपरीक्षा २१ जून रोजी देशभरातील ५५० शहरांमधील ५,४०० पेक्षा जास्त परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### व्यापार करार चर्चेसाठी अमेरिकी पथक येणार

◆ **नवी दिल्ली, २७ मे**

अंतरिम व्यापार कराराचे तपशील निश्चित करण्याबाबत चर्चेसाठी आणि द्विपक्षीय व्यापार करारांतर्गत वाटाघाटी पुढे नेण्यासाठी अमेरिकेचे पथक १ ते ४ जून या कालावधीत भारताच्या दौऱ्यावर येत आहे.

अमेरिकी पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य वाटाघाटीकार ब्रेंडन लिंच करतील. दोन्ही बाजूंनी अंतरिम कराराचे तपशील निश्चित करण्याचे तसेच बाजारपेठेत प्रवेश, शुल्क न आकारण्याबाबच्या उपाययोजना, सीमाशुल्क व व्यापार सुलभता, गुंतवणूक प्रोत्साहन आणि आर्थिक सुरक्षा संरेखन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय व्यापार करारांतर्गत वाटाघाटी पुढे नेण्याचे प्रस्तावित केले आहे, असे निवेदनात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## योगेश साळुंखे यांचा आदर्श : पदापेक्षा भक्ती मोठी

**सोलापूर, दि. २७ मे-**

अधिक मास कमला एकादशीच्या पवित्र पर्वावर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या दर्शन व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी रिद्धी-सिद्धी दर्शन मंडपास भेट दिली.

यावेळी मंदिर समितीमध्ये सीसीटीव्ही ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेले कर्मचारी योगेश साळुंखे हे आपल्या कुटुंबासह सर्वसामान्य वारकरी व भाविकांप्रमाणे नियमित दर्शन रांगेत उभे राहून श्री विठ्ठलाचे दर्शन घेत असल्याचे निदर्शनास आले.

**“विठ्ठल विठ्ठल म्हणता,**
**पापे जाती दूर ।**
**भावे जे नाम घेती,**
**त्यांचा उद्धार ।।”**

विशेष बाब म्हणजे, ना कोणती विशेष सुविधा, ना स्वतंत्र प्रवेश, ना पदाचा वापर. फक्त विठुरायाच्या चरणी समान भक्तीभावाने उभा असलेला एक सेवक! योगेश साळुंखे यांच्या या



कृतीमुळे अत्यंत सकारात्मक संदेश भाविकांमध्ये पोहोचला. मंदिर समितीच्या कर्मचारी वर्गाकडून शिस्त, पारदर्शकता आणि सेवाभाव जपला जात असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले. “पद मोठं नसतं संस्कार मोठे असतात.” विठुरायाच्या दरबारात भक्तीच सर्वश्रेष्ठ असते, याचे सुंदर उदाहरण आज पाहायला मिळाले.

**।। पुंडलिक वरदेहरी विठ्ठल ।।**

## ऑर्केस्ट्रा बंद केल्याचे कारण विचारल्याने तरुणास मारहाण

**सोलापूर, दि.२७ मे-**

ऑर्केस्ट्रा का बंद केला म्हणून विचारणा केल्याने एका तरुणाला लाकडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडीतांडा येथे मंगळवारी रात्री दहा वाजता घडली. शिवाजी राठोड (वय ३५, रा. कोंडी तांडा, उत्तर सोलापूर) असे मारहाण झालेल्या त्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री घराजवळ त्यांनी आर्केस्ट्रा



का बंद केला म्हणून विचारणा केली असता त्याला राजू हरी राठोड याने लाकडाने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने त्यास उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मुलगा संदीप याने रात्री अकरा वाजता दाखल केले.

# रीलस्टारच्या पत्नीने गळफास घेऊन केला जीवनाचा शेवट

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २७ मे -**

ब्रह्मपुरी येथील रीलस्टारच्या पत्नीने एका हॉटेलमध्ये पत्र्याच्या लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी दि. २६ मे रोजी घडली. घटनेची अकस्मात मयत म्हणून मंगळवेढा पोलिसात नोंद झाली आहे.

घटनेबाबत खबर देणारे निलेश विलास पाराध्ये (वय ३०) हे हॉटेल व्यवसायिक आहेत. मयत तथा त्यांची पत्नी रोहिणी निलेश पाराध्ये हिने दि.२६ मे रोजी दुपारी २.३० वाजता अज्ञात कारणावरुन हॉटेल ग्रामपंचायतच्या स्वयंपाकघरातील पत्र्याच्या लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केल्याचे खबरेमध्ये म्हटले आहे. दरम्यान हे पती-पत्नी रीलस्टार म्हणून ओळखले जातात. ते आपल्या व्यवसायानिमित्त सोशल मिडीयावर सातत्याने रील बनवून टाकत असल्यामुळे प्रसिध्द झाले होते. पाच



ते सहा वर्षापुर्वीच त्यांनी विवाह केला होता. तद्नंतर ते पुणे येथे काही वर्षे स्थायिक होवून मागील वर्षी ब्रह्मपुरी हद्दीत येवून त्यांनी सोलापूर-मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावर एका शेतात रस्त्याकडेला हॉटेल ग्रामपंचायत नावाने व्यवसाय सुरु केला होता. तद्नंतर त्यांनी बालाजीनगर येथेही हॉटेल व्यवसाय चालू केला.

दि.२६ मे रोजी २.३० वाजता भर दुपारी हॉटेलमध्ये कोणी नसताना अचानक रोहिणीने गळफास घेवून जीवनाचा शेवट केला. या मागे नेमके कोणते कारण आहे? याचा पोलिस हवालदार मनोज खंडागळे हे कसून शोध घेत आहेत.

# विवाहितेने २ वर्षाच्या मुलासह जीवनाचा केला अंत

**संशयित नवरा, सासू, सासरा, नणंद, दीराविरोधात गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि२७ मे**

मैंदर्गी (ता.अक्कलकोट) येथील विवाहितेस माहेरहुन पैसे घेऊन ये असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी, जाचहाट करुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत नवरा, सासू, सासरा, दीर, नणंद यांच्यासह सात जणांविरोधात दक्षिण पोलीस ठाणे अक्कलकोट येथे आज बुधवारी गुन्हा दाखल झाला आहे.

भाग्यश्री सिद्धाप्पा कट्टेमनी (वय ३०, रा. मैंदर्गी ता.अक्कलकोट हीस आरोपींनी तिचे लग्नानंतर ते दिनांक २५ मे २०२६ दुपारी १२.०० वाजेपर्यंत माहेरून पैसे घेऊन ये असे म्हणून शिवीगाळ, दम दाटी, जाचहाट करून त्रास दिला. तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याने तिने २५ मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दोन वर्षाचा मुलगा शिवराज सिद्धाप्पा कट्टीमनी याच्यासह आत्महत्या केली, अशा आशयाची फिर्याद दिल्याने अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मयताची आई कलव्वा बसप्पा पुजारी (वय ४५, रा.भोसगा ता.अफजलपूर जि. कलबुर्गी, राज्य कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सासू-तिपव्वा शरणाप्पा कट्टीमनी, सासरा-शरणाप्पा कट्टीमनी, नवरा-सिद्धाप्पा शरणाप्पा कट्टीमनी, दीर- समर्थ शरणाप्पा कट्टीमनी, दीर-नागनाथ शरणाप्पा कट्टीमनी, नणंद-गंगव्वा शरणाप्पा पुजारी, दीर-यल्लाप्पा शरणाप्पा कट्टमणी ( सर्व रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापूर) यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली आहे.सदर घटना

-यातील पीडितेचे लग्नानंतर ते दिनांक पर्यंत मैंदर्गी ता. अक्कलकोट. येथे घडली . यातील पिडीत भाग्यश्री सिद्धाप्पा कट्टीमनी वय ३० वर्ष ही जाचहाटीस कंटाळुन ( रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापूर. ) या मुलासह आत्महत्या केली म्हणून फिर्याद दाखल झाली आहे . अधिक तपास सपोनि माने करीत आहेत .

CMYK



हिंदीत नाव कमावलं म्हणून कुणी मराठी रसिक हिंग लावून विचारतं नाही त्याला बरं तिथेही कुणी हिरो, हिरोईन म्हणून घेत नाही. मराठी पृष्ठभूमी असलेल्या भूमिकाच देतात. माधुरी आणि नाना सोडले तर काही कुणी किंमत देत नाहीत... घाटी म्हणून संबोधतात.
**- वैभव मांगले,** अभिनेता


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, २८ मे २०२६




महायुतीमध्ये अर्थखाते हे आमच्या पक्षाकडे होते, पण सुनेत्रा पवार या नव्यानेच उपमुख्यमंत्री झाल्यामुळे बजेट येणार असल्याने ते खातं नंतर राष्ट्रवादीला देण्यात येईल असे सांगण्यात आले होते, पण ते अद्याप दिले नाही.दिल्लीत काहीतरी निर्णय होईल.
**- हसन मुश्रीफ,** मंत्री



# माझे पूर्वज हिंदूच

- **पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांचे प्रतिपादन**
- **मुलांना शिकवला जातोय् खोटा इतिहास**

**◆ इस्लामाबाद, २७ मे**

माझे पूर्वज हिंदूच होते, असे वक्तव्य पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी केले. त्यामुळे पाकिस्तानची ओळख आणि इतिहासावर या देशात नवीन वाद उफाळला आहे.



पाकिस्तानी मुलांना खोटा इतिहास शिकवला जात आहे आणि देशातील नागरिक आपल्या मुळांपासून दूर जात आहेत, असे त्यांनी सांगितले.

पाकिस्तानातील मुसलमान आपल्या हिंदू पूर्वजांचा तिरस्कार करतात. आमचे पूर्वज सौदी अरब किंवा इराणमधून आले होते, असा खोटा दावा पाकिस्तानातील अर्ध्यापेक्षा जास्त नागरिक करतात. पाकिस्तानातील नवीन पिढी आपली संस्कृती आणि ओळखीपासून दूर जावी म्हणून हा विमर्श जाणीवपूर्वक तयार करण्यात आला, असे ख्वाजा आसिफ यांनी एका मुलाखतीत सांगितले.

### पाकिस्तानी समाजाचा विचार बदलला

**अमेरिकेच्या युद्धांमध्ये पाकिस्तानचा वापर करण्यासाठी समाजाचा विचार बदलण्यात आला आणि त्याच उद्देशाने इतिहास सादर करण्यात आला. आमच्या मुलांसमोर तथ्यात्मक इतिहास मांडलेला नाही. चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोक कोण होते, हे आज पाकिस्तानातील कित्येक लोकांना माहीत नाही, असे ख्वाजा आसिफ यांनी सांगितले.** ■

### पाकिस्तान कधीच इस्रायलला मान्यता देणार नाही

**आमच्या पायाभूत विचारसरणीला धक्का पोहोचेल अशा कोणत्याही कराराला आम्ही मान्यता देऊ नये, अशी माझी वैयक्तिक भावना आहे. पाकिस्तानची जुनी भूमिका आजही कायम आहे. १९६७ मधील सीमांच्या आधारावर पूर्व जेरुसलेमला राजधानी करून स्वतंत्र पॅलेस्टाईन बनत नाही, तोपर्यंत पाकिस्तान इस्रायलला मान्यता देणार नाही, असे ख्वाजा आसिफ यांनी सांगितले.** ■

पाकिस्तानातील हिंदू शासकांचा इतिहास जवळपास पुसून टाकण्यात आला, असे ख्वाजा आसिफ यांनी इतिहासाच्या पुस्तकांवर प्रश्न उपस्थित करताना सांगितले. आपण चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोकला इतिहासाच्या पुस्तकांतून हटवले. कारण, ते हिंदू होते. माझे पूर्वज हिंदू होते. यामुळे माझ्यातील पाकिस्तानीपण कमी होते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पाकिस्तानात शिकविली जाणारी पुस्तके अशा व्यक्तींनी लिहिली होती, ज्यांनी भावी पिढ्यांना एका विशिष्ट विचारसरणीत घडवण्याचा प्रयत्न केला, असे आसिफ म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

## रशियाने बनवली इबोला प्रतिबंधक लस

**◆ मॉस्को, २७ मे**

इबोला विषाणूच्या नवीन प्रकाराविरुद्ध लस विकसित केल्याचा दावा रशियाने केला आहे. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये हा विषाणू वेगाने पसरत असून, नवीन लसीमुळे आजाराला प्रतिबंध घालणे शक्य होणार आहे.



संशयित रुग्ण आणि मृतांची संख्या वाढतच असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने देखील आजाराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अशा वेळी, संभाव्य लसीचा उदय होणे हे वैद्यकीय शास्त्रासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. तथापि, या लसीची परिणामकारकता आणि उपलब्धता अद्याप आंतरराष्ट्रीय स्तरावर पूर्णपणे निश्चित झालेली नाही. दरम्यान रशियाने दावा केला की, त्यांच्या शास्त्रज्ञांनी इबोला विषाणूच्या नवीन प्रकाराविरुद्ध लस विकसित केली आहे, जी डीआरसीमध्ये पसरत असलेल्या बुंदीबुग्यो प्रकाराविरुद्धही संरक्षण देऊ शकते. रशियाचे आरोग्य मंत्री मिखाईल मुराश्को यांच्या मते, ही लस केवळ नवीन इबोला प्रकाराविरुद्धच नव्हे, तर दुर्मिळ बुंदीबुग्यो प्रकाराविरुद्धही संरक्षण देण्यास मदत करू शकते. *(वृत्तसंस्था)*



उत्तराखंडमधील कुमाऊं आणि गढवाल क्षेत्रातील जंगलाला भीषण आग लागली असून यामध्ये वनसंपदेचे मोठे नुकसान झाले आहे. अल्मोडा जिल्ह्यातील जंगलात उठलेल्या आगीच्या ज्वाळा

# वाढत्या तापमानात सर्वतोपरी काळजी घ्या : पंतप्रधान

**◆ नवी दिल्ली, २७ मे**

देशात तापमानाचा पारा सातत्याने वाढत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी नागरिकांना जास्तीत जास्त खबरदारी घेण्याचे आवाहन केले आणि अशा कठोर हवामानात शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम राखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.



लहान मुले, वृद्ध आणि घराबाहेर काम करणाऱ्यांना तीव्र उष्णतेचा विशेष धोका असतो आणि उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्याच्या धोक्याच्या लक्षणांकडे कुणीही दुर्लक्ष करू नये, कारण ते पटकन धोकादायक बनू शकते आणि त्यामुळे उष्माघातही होऊ शकतो, असे नरेंद्र मोदी यांनी एक्सवरील अनेक पोस्ट्सच्या मालिकेत म्हटले.

भारताच्या विविध भागांमध्ये तापमान प्रचंड वाढत असल्याचे आणि त्यासोबत येणाऱ्या आव्हानांचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. ही उष्णता आपल्या सर्वांसाठीत अतिशय कडक आहे. त्यामुळे मी तुम्हा सर्वांना आवाहन करतो की, शक्य तितकी अधिक खबरदारी घ्या, असे मोदी म्हणाले.

उष्म्याचा फटका बसलेल्या लोकांना मदत करावी आणि त्यांना पाणी, ओआरएस इत्यादी दिलासा देणाऱ्या गोष्टी मिळतील, याची खात्री करावी, असे आवाहन मोदींनी नागरिकांना केले. अशा हवामानात वेळीत घेतलेली काळजी आणि लक्ष अत्यंत मोलाचे ठरते. उष्णतेच्या लाटेदरम्यान जेव्हा शक्य असेल तेव्हा नागरिकांनी आपल्या वृद्ध आई-वडिलांना, आजी-आजोबांना आणि प्रियजनांना फोन करून त्यांची विचारपूस करावी, असे आवाहनही त्यांनी केले. *(वृत्तसंस्था)*

### घराबाहेर पडताना सोबत पाणी ठेवा

**मोदी यांनी सर्वांना पुरेसे पाणी पिण्याचा, घराबाहेर पडताना सोबत पाणी बाळगण्याचा आणि इतरांनाही पाण्याचा ग्लास देण्याचा आग्रह केला. कारण, अशा हवामानात अशा प्रकारच्या कृती अत्यंत मोलाच्या ठरतात. उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्यांच्या लक्षणांकडे लक्ष द्या, जसे की चक्कर येणे, मळमळणे किंवा तीव्र थकवा जाणवणे. तुमच्या आजूबाजूच्या कुणाला अस्वस्थ वाटल्यास, अशक्तपणा जाणवल्यास किंवा डोकेदुखी सुरू झाल्यास, त्यांना ताबडतोब थंड किंवा सावलीच्या ठिकाणी हलवणे उत्तम असते, असे ते म्हणाले.** ■

## शरद पवार ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल

**◆ मुंबई, २७ मे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार काळजी करण्यासारखी कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगण्यात येत आहे.

नियमित वैद्यकीय तपासणीसाठीच शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या काही महत्त्वाच्या चाचण्या सध्या सुरू आहेत. वाढते वय, सततचा प्रवास आणि राजकीय तसेच सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम लक्षात घेता डॉक्टरांनी नियमित आरोग्य तपासणीचा सल्ला दिला होता. यानुसारच शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना प्रकृतीची कोणतीही गंभीर समस्या नसून केवळ नियमित तपासणीचा भाग म्हणून विविध वैद्यकीय चाचण्या केल्या जात आहेत. *(वृत्तसंस्था)*

# अमेरिकेसोबत युनूस यांचा गोपनीय करार

- **वाणिज्य, परराष्ट्र मंत्रालयाला ठेवले अंधारात**
- **बांगलादेशी नागरिकांचा केला विश्वासघात**

**◆ ढाका, २७ मे**

बांगलादेशात १८ महिने अंतरिम सरकारचे नेतृत्व करणाऱ्या मोहम्मद युनूस यांनी अमेरिकेसोबत गोपनीय करार केला. या करारापासून वाणिज्य आणि परराष्ट्र मंत्रालयालाही अंधारात ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

अंतरिम सरकारमधील परराष्ट्र व्यवहार सल्लागार तौहीद हुसेन यांनी एका मुलाखतीत बांगलादेशाचा



अमेरिकेसोबतच्या व्यापार करारातील कारस्थाने उघड केली. हुसेन यांनी सांगितले की, या करारामध्ये वाणिज्य मंत्री किंवा परराष्ट्र मंत्रालयाचा कोणताही सहभाग नव्हता. या कराराशी निगडित कुठल्याही चर्चेला आम्हाला बोलवले नाही. अंतरिम सरकारमध्ये सर्वच निर्णय कॅबिनेटमध्ये घेतले गेले नाहीत. अमेरिकेसोबत सर्वसामान्य निवडणुकीच्या तीन दिवसाआधीच करार केला गेला. करारातील अटी बांगलादेशला अडचणीत आणणाऱ्या असल्याचे हुसेन यांनी सांगितले.

आंदोलनानंतर युनूस यांना सत्तेच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या विद्यार्थ्यांना युनूस यांनी फसवले. त्यांनी अराजकता रोखण्याऐवजी आंदोलकांना विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी मैदानात उतरवले. दीड वर्षाचा कार्यकाळ युनूस यांनी स्वतःसाठी वापरला. त्यांच्यावरील न्यायालयातील खटले मागे घेण्यात आले. आयकर माफ केला गेला. त्यांनी निवडणुकीपूर्वी फायदा घेतला, असा आरोप हुसेन यांनी केला. *(वृत्तसंस्था)*

## अभिनेते रमाकांत दायमा यांचे निधन

**◆ मुंबई, २७ मे**

टीव्ही आणि चित्रपट अभिनेते रमाकांत दायमा यांचे मंगळवारी निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते आणि मागील काही महिन्यांपासून आजारी होते. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या सह-कलाकार अभिनेत्री शुभांगी लाटकर यांनी समाज माध्यम पोस्टद्वारे दिली.

दायमा यांनी 'चक दे इंडिया', 'राम सेतू' आणि 'स्कॅम १९९२' यांसारख्या प्रसिद्ध चित्रपट आणि वेब सिरीजमध्ये अभिनय केला होता. अभिनेत्री शुभांगी लाटकर यांनी समाज माध्यमावर रमाकांत दायमा यांच्या निधनाची पुष्टी केली. त्यांनी रमाकांत यांचा एक जुना व्हिडीओ शेअर केला. यात ते नृत्य आणि अभिनय करताना दिसत आहेत. त्यांचा जन्म १३ सप्टेंबर १९५६ रोजी झाला होता. *(वृत्तसंस्था)*

# पी. विजयन् यांची खुर्ची गेल्यावर ईडीचे फेरे

### तपास यंत्रणेची घरावर छापेमारी

**◆ थिरुवनंतपुरम्, २७ मे**

सीएमआरए मनी लॉण्ड्रिंग प्रकरणी मुलीविरुद्ध सुरू असलेल्या तपासाचा एक भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने बुधवारी केरळम्चे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन् यांच्या निवासस्थानी आणि इतर काही ठिकाणी छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार राज्यात एकूण १० ठिकाणी छापेमारी केली जात आहे. यामध्ये राज्याच्या राजधानीतील विजयन् यांच्या भाड्याच्या घराचा, कन्नूर येथील एका



धाड पडल्यानंतर विजयन् यांच्या समर्थकांनी ईडी अधिकाऱ्यांच्या वाहनाला असा घेराव घालत तोडफोड केली

ठिकाणाचा आणि कोचिन मिनरल्स ॲण्ड रुटाईल लिमिटेड या खाजगी संस्थेतील महत्त्वाच्या व्यक्तींच्या घरांचा समावेश आहे.

या चौकशीमध्ये त्यांची मुलगी टी. वीणाचा समावेश असल्याने

### ईडीच्या अधिकाऱ्यांवर दगडफेक

**पी. विजयन् यांच्या कन्नूर येथील घरावरील छापेमारीनंतर बाहेर पडलेल्या ईडीच्या अधिकाऱ्यांना पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रोखून ठेवले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी ईडीच्या अधिकाऱ्यांवर दगडफेक केली तसेच त्यांच्या वाहनांची तोडफोड केली.** ■

विजयन् यांच्या घरावर छापेमारी करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. २०१७ ते २०२० या कालावधीत वीणा यांच्या एक्झालॉजिक सोल्युशन्स या कंपनीने सीएमआरएलला कोणतीही सेवा पुरवली नसताना सीएमआरएलने त्या कंपनीला १.७२ कोटी रुपयांचे बेकायदेशीर पेमेन्ट केल्याचा आरोप आहे. या प्रकरणातील ईडीची कारवाई रद्द करावी, अशी मागणी करीत सीएमआरएलने दाखल केलेली रिट याचिका मंगळवारी केरळम् उच्च न्यायालयने फेटाळली होती. त्यामुळे केंद्रीय तपास यंत्रणेला तपास पुढे चालू ठेवण्याची मुभा मिळाली आहे. ईडीने या प्रकरणी २०२४ मध्ये गुन्हे दाखल केले होता. विजयन् यांनी यापूर्वी आपल्या मुलीवर लावण्यात आलेले आरोप फेटाळून लावले असून, आपली प्रतिमा मलिन करण्यासाठी आणि आपली बदनामी करण्यासाठीच हे आरोप करण्यात आल्याचे म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'टायटन' घड्याळाचा प्रवास ओटीटीवर

**मुंबई :** भारतातील प्रतिष्ठित ब्रँडपैकी एक असलेल्या 'टायटन'च्या निर्मितीचा थक्क करणारा प्रवास आता प्रेक्षकांसमोर येणार आहे. 'ॲमेझॉन एमएक्स प्लेयर'ने त्यांच्या आगामी 'मेड इन इंडिया - अ टायटन स्टोरी' या मालिकेचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. सत्य घटनांवर आधारित ही वेब सीरिज ३ जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य उपलब्ध होणार आहे. विनय कामत यांच्या 'टायटन - इंडियाज मोस्ट सक्सेसफुल कन्झ्युमर ब्रँड' या पुस्तकावर आधारित ही सहा भागांची वेब सीरिज आहे. यामध्ये ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह यांनी जे.आर.डी. टाटा यांची भूमिका साकारली असून जिम सर्भ यांनी झेड. देसाई यांची भूमिका वठवली आहे. याशिवाय वैभव तत्त्ववादी, नमिता दुबे, लक्षवीर सरन आणि कावेरी सेठ यांच्याही भूमिका आहेत. ■




### 'सितारे जमीन पर' वर्ल्ड प्रीमियरसाठी सज्ज




**मुंबई :** थिएटर आणि डिजिटलवर मिळालेल्या अफाट यशानंतर आमिर खान अभिनीत 'सितारे जमीन पर' आता वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसाठी सज्ज आहे. हा चित्रपट ३१ मे रोजी दुपारी १ वाजता सोनी मॅक्सवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आनंद, हशा आणि भावना यांनी भरलेला हा चित्रपट देशभरातील कुटुंबांना एकत्र आणून घरबसल्या एक हृदयस्पर्शी अनुभव देणार आहे. या चित्रपटात आमिर खान गुलशनच्या भूमिकेत असून, जेनेलिया देशमुख, गुलशनची पत्नी सुनीताच्या भूमिकेत आहे. ■

# पाकिस्तानवर विश्वास ठेवणे अमेरिकेची चूक

## लिंडसे ग्रॅहम यांचा इशारा; अब्राहम करारासाठी दबाव वाढवावा

**◆ वॉशिंग्टन, २७ मे**

अमेरिका-इराण शांतता करारात मध्यस्थ म्हणून पाकिस्तानची संशयास्पद आहे. अमेरिकेने त्यांच्यावर ठेवलेला विश्वास सर्वात मोठी चूक आहे. पाकिस्तान विश्वासपात्र देश नाही. अब्राहम करारावर पाकिस्तानकडून तत्काळ प्रतिसादासा दबाव वाढवायला हवा अशी मागणी रिपब्लिकन खासदार लिंडसे ग्रॅहम यांनी केली आहे.



इस्रायलप्रती पाकिस्तानच्या शत्रुत्वपूर्ण वृत्तीचा हवाला देताना ग्रॅहम यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, शांतता प्रक्रियेतील पाकिस्तानची भूमिका संशयास्पद आहे. पाकिस्तान आपल्या हवाई तळावर इराणची लष्करी विमाने ठेवत आहे, ज्यामुळे मध्यस्थ म्हणून त्यांच्या निःपक्षपातीपणावर गंभीर शंका आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे इस्रायलविरोधातील टिप्पणी जगजाहीर आहे. ही बाब चिंताजनक असून, पाकिस्तानला मध्यस्थ बनवणे हे स्पष्टपणे समस्याप्रधान आहे. अब्राहम करारात पुन्हा सामील होण्याच्या ट्रम्प यांच्या आवाहनावर पाकिस्तानने तत्काळ आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. *(वृत्तसंस्था)*

## ट्रम्प सरकारच्या माजी वकिलांना कर्करोग

**◆ वॉशिंग्टन, २७ मे**

ट्रम्प सरकारच्या माजी वकील पॅम बॉन्डी थायरॉईड कर्करोगाशी झुंज देत आहेत. अमेरिकन मीडियाच्या मते, न्याय विभाग सोडल्यानंतर त्यांच्यावर उपचार झाले आणि आता त्या बऱ्या होत आहेत.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी एप्रिलमध्ये पॅमला त्यांच्या पदावरून हटवले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हा निर्णय जेफ्री एपस्टीन प्रकरणाशी संबंधित फाईल्स हाताळण्याच्या पद्धतीवरून घेण्यात आला होता. तथापि, कर्करोगाच्या बातम्यांवर पॅम बॉन्डी यांनी स्वतः अद्याप कोणतेही सार्वजनिक विधान केलेले नाही. पॅम बॉन्डी मागील काही आठवड्यांपासून कर्करोगाशी खंबीरपणे लढत आहेत, असे व्हाईट हाऊसचे डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ स्टीफन मिलर यांच्या पत्नी केटी मिलर यांनी समाज माध्यमावर लिहिले. *(वृत्तसंस्था)*



पाठलाग केल्यानंतर भारतीय नौदलाने समुद्री चाच्यांच्या बोटींवर नियंत्रण मिळविले

# हिंद महासागरात नौदलाचे धाडसी शौर्य

### आयएनएस कोलकाताने समुद्री चाच्यांचा हल्ला रोखला

**◆ कोलकाता, २७ मे**

भारतीय नौदलाने धाडसी पराक्रम दाखवत हिंद महासागरात समुद्री चाच्यांविरोधात मोठी कारवाई केली. नौदलाच्या कारवाईमुळे एका मालवाहक जहाजावर होणारा भीषण हल्ला रोखण्यात यश आले.

नौदलाने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम हिंद महासागरात मालवाहक जहाज एमव्ही माशाअल्लाह-१ वर समुद्री चाच्यांकडून हल्ला होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तातडीने नौदलाच्या आयएनएस कोलकाताने या धोक्याचा आढावा घेतला आणि हा हल्ला रोखला. प्रसंगावधान राखत नौदलाने केलेल्या कार्यवाहीमुळे मालवाहक जहाज सुरक्षितपणे मार्गस्थ झाले आणि समुद्री चाच्यांकडून होणारा संभाव्य हल्ला टळला. आयएनएस कोलकाता पश्चिम हिंद महासागरात (एडनच्या आखाताजवळ) एका मोहिमेवर तैनात आहे. एमव्ही माशाअल्लाह-१ जवळ समुद्री चाच्यांच्या संशयास्पद हालचालींची माहिती मिळताच भारतीय नौदलाच्या जहाजाने तत्काळ प्रतिसाद दिला. आयएनएस कोलकातावरील हेलिकॉप्टरच्या साहाय्याने ही शोधमोहीम राबवण्यात आली. *(वृत्तसंस्था)*

### जहाजावर चढून शोधमोहीम

**नौदल कारवाईदरम्यान जहाजाच्या कर्मचाऱ्यांनी मालवाहू जहाजावर चढून शोधमोहीम राबवली. भारतीय नौदल २००८ पासून एडनच्या आखातात समुद्री चाचेगिरीविरोधात सातत्याने तैनात आहे असे नौदलाने सांगितले. दरम्यान, याआधी सोमालिया किनारपट्टीवरील एका कारवाईत भारतीय नौदलाने ३५ समुद्री चाच्यांना पकडले होते. ऑपरेशन संकल्प अंतर्गत भारतीय नौदलाने ही मोठी कामगिरी यशस्वी केली. अरबी समुद्रात व्यापारी जहाजांवर हल्ला रोखण्यासाठी भारतीय नौदलाने विशेष मोहीम हाती घेतली असून त्यातून व्यापारी जहाजांना सुरक्षा दिली जाते.** ■

### 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'चे पोस्टर प्रदर्शित

**मुंबई :** समाज माध्यमावर मोशन पोस्टर प्रदर्शित करून 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. २ ऑक्टोबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. जैन फिल्म प्रोडक्शन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे यांनी केली आहे. वास्तवदर्शी कथानकावर आधारलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शक स्वरूप बी. सावंत हे आहेत. या चित्रपटाची कथा सध्या तरी गुलदस्त्यात असून, कलाकारांची नावेही गुप्त ठेवण्यात आली आहेत. या चित्रपटाची कथा सागरकुमार एस. जैन यांनी लिहीली असून, पटकथा व संवादलेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# केंद्राचे स्वागतार्ह पाऊल

पूर्वोत्तर राज्यांतील घुसखोरी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना देशाच्या एका माजी गृह राज्यमंत्र्यांनी केलेले 'हम बारूद के ढेर पे बैठे हैं' असे वक्तव्य बरेच बोलके आहे. सीमावर्ती भागांत आणि काही विशिष्ट राज्यांमध्ये होणारे अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदल देशाच्या सार्वभौमत्वाला, राष्ट्रीय सुरक्षेला आणि सांस्कृतिक अस्तित्वाला गिळंकृत करू पाहत आहे. या पृष्ठभूमीवर, १५ ऑगस्ट २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून या विषयाच्या अभ्यासासाठी उच्चस्तरीय समितीची घोषणा केली होती. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली आता समितीची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, देशाच्या भविष्यकालीन सुरक्षेसाठी हे किती अनिवार्य आहे, याचे महत्त्व विशद केले आहे. भारताचे वर्तमान आणि भविष्यातील अंतर्गत सुरक्षेसाठी हे ऐतिहासिक पाऊल मानले पाहिजे.

पूर्वोत्तर राज्यांमध्ये, विशेषतः पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये गेल्या काही दशकांत लोकसंख्येचे जे चित्र बदलले आहे, ते फार चिंताजनक आहे. उपलब्ध आकडेवारी आणि विविध अहवालांचे विश्लेषण केल्यास असे दिसते की, या राज्यांच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये एका विशिष्ट समुदायाच्या, म्हणजेच मुस्लिम लोकसंख्येच्या वाढीचा वेग देशाच्या सरासरी दरापेक्षा कितीतरी जास्त आहे. आसाममधील धुबरी, मरीगाव, गोआलपारा, बारपेटा आणि नागाव यासारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये आज हा समुदाय बहुसंख्य झाला आहे. पश्चिम बंगालच्या मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर या जिल्ह्यांमध्येही त्यांच्या लोकसंख्येचे पारडे जड झाले आहे. १९५१ ते २०११ च्या जनगणनेपर्यंत आणि त्यानंतरच्या गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार, या सीमावर्ती भागांतील हिंदू आणि स्थानिक आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने घटत आहे. दुसरीकडे मुस्लिम लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. ही वाढ केवळ नैसर्गिक प्रजननामुळे झालेली नाही, तर त्यामागे जाणीवपूर्वक केली जात असलेली खेळी आहे, हे आता लपून राहिलेले नाही. या असमतोलामुळे पूर्वोत्तर राज्ये सांस्कृतिकदृष्ट्या विलग होण्याची भीती व्यक्त केली जात आहे आणि ती रास्त वाटते. या भागातील अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदलाचे मुख्य कारण म्हणजे बांगलादेश आणि म्यानमारमधून होणारी अवैध घुसखोरी. भारताची हजारो किलोमीटरची पूर्व सीमा ही नद्या, जंगलांनी व्यापली आहे. त्याचाच गैरफायदा घेऊन लाखो घुसखोर दरवर्षी भारतात येतात. ही घुसखोरी आता केवळ रोजगाराच्या शोधात आलेली गर्दी राहिलेली नाही, तर ती सुनियोजित कारस्थानाचा भाग झाली आहे. काही स्थानिक राजकीय पक्षांनी 'व्होट बँके'साठी घुसखोरांचे लांगूलचालन केले. त्यांना अवैधरीत्या रेशन कार्ड, आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रे मिळवून दिली. एव्हाना, देशाच्या इतर भागांतही या घुसखोरांनी स्थानिक आदिवासी आणि गरीब नागरिकांच्या जमिनींवर, त्यांच्या हक्काच्या रोजगारावर आणि संसाधनांवर कब्जा केला आहे. घुसखोरांच्या गुंडागर्दीने आया-बहिणींची अब्रू धोक्यात आली आहे. त्याचा प्रत्यय बंगालमध्ये नुकताच आला. खरे तर, 'माँ-माटी-माणूस' अशी घोषणा देत 'दीदी' सत्तेत आल्या होत्या. पण घुसखोरांकडून स्थानिक महिलांवर होत असलेला अत्याचार त्यांना दिसला नाही. त्यामुळे दीदींच्या घोषणेतील 'माँ' दूर गेली आणि निवडणुकीत दीदीची वाट लागली. घुसखोरीमुळे देशातील मूळ नागरिकांचा रोजगार हिरावला जात असून, राष्ट्रीय साधनसंपत्तीवर कधी नव्हे एवढा ताण येत आहे, हे त्यातले आणखी एक 'व्हर्टिकल'. अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदलाचा केवळ भौगोलिक आणि राजकीय परिणाम होतोच. शिवाय, सामाजिक आणि सांस्कृतिक रचनेवरही त्याचा खोल आघात होतो. गेल्या काही वर्षांत देशातील विविध भागांतून, विशेषतः केरळ, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि झारखंडच्या आदिवासी पट्ट्यातून 'लव्ह जिहाद'सारख्या गंभीर प्रकरणांची मालिका समोर आली आहे. फसवणुकीच्या मार्गाने बहुसंख्य समाजातील मुलींना आणि विशेषतः आदिवासी मुलींना जाळ्यात ओढले जाते, त्यांच्याशी लग्न केले जाते आणि त्यानंतर त्यांचे सक्तीने धर्मांतर केले जाते. आदिवासी मुलींशी लग्न करून घुसखोर तेथील राखीव जमिनींवर मालकी हक्क मिळवतात. पुढे स्थानिक पंचायतींच्या निवडणुकांमध्ये राजकीय सत्ताही हस्तगत करतात. त्यामुळे स्थानिक संस्कृती तर नष्ट होत आहेच, सामाजिक सलोख्यालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. न्या. नावलेकर समितीला या सामाजिक आणि छुप्या पद्धतींचाही सखोल अभ्यास करावा लागणार आहे. जमीन, पाणी, अन्न, आरोग्यसेवा आणि शिक्षण ही संसाधने नेहमीच मर्यादित असतात. एखाद्या देशात कायदेशीर नागरिकांच्या सोबतीने कोट्यवधी अवैध घुसखोर राहू लागतात, तेव्हा त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण येतो. भारताच्या अनेक महानगरांमध्ये आणि सीमावर्ती राज्यांमध्ये झोपडपट्ट्यांची संख्या प्रचंड वाढत आहे. गुन्हेगारीत वाढ झाली आहे आणि बनावट नोटा, ड्रग्जची तस्करी तसेच दहशतवादी कारवायांनाही पाठबळ मिळण्यासाठी सुपीक जमीन तयार होत आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे. हे लोकसंख्येचे असंतुलन असेच सुरू राहिले, तर परिस्थिती आणखी चिघळेल, हे समजून घेतले पाहिजे. ज्या ज्या देशांनी आपल्या सीमांकडे दुर्लक्ष केले आणि अंतर्गत लोकसांख्यिकीय बदलांना गांभीर्याने घेतले नाही, त्या देशांचा भूगोल आणि संस्कृतीही नष्ट झाली हा इतिहास आहे. त्याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे 'लेबनॉन'. १९५० च्या दशकात लेबनॉन हा मध्यपूर्वेतील अत्यंत प्रगत देश होता, त्याला पूर्वेचे पॅरिस म्हटले जायचे. परंतु, पॅलेस्टिनी निर्वासितांच्या लोंढ्यामुळे आणि त्यानंतर झालेल्या अनैसर्गिक लोकसंख्या बदलामुळे अवघ्या दोन-तीन दशकांत तेथे यादवी माजली. आज तो देश पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. युरोपमधील 'कोसोव्हो' हे आणखी एक उदाहरण. तेथे अल्बेनियन मुस्लिम लोकसंख्येच्या अनैसर्गिक वाढीमुळे सर्बियाचा हा ऐतिहासिक भाग वेगळा झाला. हाच धोका सध्या 'ग्रेट ब्रिटन' आणि संपूर्ण युरोपसमोर उभा ठाकला आहे. ब्रिटनमध्ये गेल्या काही वर्षांत आशियाई आणि आफ्रिकन देशांतून आलेल्या मुस्लिमांची संख्या प्रचंड वाढली आहे. लंडन, बर्मिंगहॅम आणि लेस्टर यासारख्या शहरांमध्ये स्थानिक इंग्लिश लोकसंख्या अल्पमतात येत आहे. तेथे पाश्चात्त्य मूल्यांना आणि कायद्यांना आव्हान देणारे 'शरिया झोन्स' तयार होऊ लागले आहेत. परिणामी, मूळ इंग्लिश नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असून, देशाची संस्कृती वाचवण्यासाठी उजव्या विचारसरणीची मोठी आंदोलने उभी ठाकली आहेत. दंगली उसळत आहेत. युरोपचे हे जळजळीत वास्तव भारतासाठीही धोक्याची घंटा आहे. औदार्य माणसांना दाखवायचे असते, अमानुष प्रवृत्तींना नव्हे, हे आता युरोपला समजले आहे. चीनला ते आधीच समजले होते. लोकसांख्यिकीय संतुलन राखण्यासाठी चीनने अत्यंत कठोर आणि दीर्घकालीन धोरण अवलंबले आहे. त्या देशाने केवळ 'एक अपत्य धोरण' राबवून लोकसंख्या नियंत्रित केली. देशाच्या अंतर्गत भागात सांस्कृतिक संतुलनही बिघडू दिले नाही. शिनजियांग प्रांतात जेव्हा उईघुर मुस्लिम लोकसंख्येमुळे फुटीरतावादाचा आणि लोकसांख्यिकीय असंतुलनाचा धोका निर्माण झाला, तेव्हा चीनने अत्यंत कठोर पावले उचलली. तेथे 'हान' वंशाच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात पुनर्वसन करून संतुलन साधले. तसेच कट्टरवाद्यांना चिरडून टाकले. चीनचे हे 'मॉडेल' लोकशाही देशात जसेच्या तसे लागू करणे शक्य नसले, तरी देशाच्या सुरक्षेसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतात, हा धडा त्यातून घेता येतो.

या पृष्ठभूमीवर, केंद्र सरकारने स्थापन केलेली न्या. प्रकाश नावलेकर समिती ही भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने स्वागतार्ह पाऊल आहे. ही समिती सुनियोजित आणि कालबद्ध पद्धतीने या अनैसर्गिक लोकसंख्या बदलांचे व्यापक मूल्यांकन करेल आणि त्यावर ठोस उपाय सुचवेल, असा विश्वास आहे. कोणतीही अनैसर्गिक वाढ कॅन्सरसारखी घातक असते. त्यामुळे हा निर्णय घेतला गेला. देशाचे सार्वभौमत्व आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारच्या या दूरगामी निर्णयाचे देशपातळीवर स्वागत व्हायलाच हवे.

## प्रासंगिक

सुधीर पाठक

# सावध.... सावध रे



"सावध... सावध रे" हा मंत्र यावर्षी बकरी ईदला सर्वत्र कानावर पडतो आहे. जागृत भारताचा हा मंत्र आहे. या मंत्राप्रमाणे वावरा, दक्ष रहा, जागरूक असा हा नवयुगाचा संदेश आहे. मागील वर्षीच्या बकरी ईदच्या दिवशी कुर्बानी देण्याच्या प्रश्नावरून मीरा रोड-भाईंदर या मुंबईच्या उपनगरात तणाव निर्माण झाला होता. मीरा रोडवरील एका सदनिकेत बकऱ्याची कुर्बानी देण्यासाठी एक जागा निश्चित करण्यात आली होती. त्या ठिकाणी बकरीसाठी खुराडेही उभारण्यात आले होते. मात्र यासाठी संकुलातील सर्व जण सहमत नव्हते. पण बकरी ईद ज्यांना साजरी करायची आहे अशा गटाने या ठिकाणी ईद साजरी करण्याचे आणि कुर्बानी देण्याचे ठरविले होते. त्यावर इमारतीतील काही जण विरोधात गेले. त्यांनी विरोधही केला. त्यातून बजरंग दल आणि सदनिकेतील रहिवासी यात हाणामारी झाली. इमारतीतील एकाने भजन, कीर्तन करणाऱ्या बजरंग दलाच्या कार्यकर्त्यावर ब्लेडने हल्ला केला. पोलिस आले, शांतता प्रस्थापित झाली. काही जणांना अटक झाली आणि ते वातावरण काही काळाने शांत झाले होते.

यावर्षी पुन्हा बकरी ईद आली आणि वातावरणाने नवीन वळण घेतले. मधल्या काळात खूप परिवर्तने झाली होती. साधारणतः मीरा रोडचे रहिवासी ज्यात प्रामुख्याने दादरच्या फेरीवाले मंडळींचा समावेश होतो. ते सिद्ध झाले. दादर ते सेनापती बापट पुतळा या रानडे मार्गावर हल्ली जे फेरीवाले आहेत, त्यात मराठी फेरीवाल्यांची संख्या जवळजवळ नगण्य आहे. एकेकाळी ही सर्व मंडळी मराठी होती, पण त्यांनी आपल्या जागा विकल्या, सोडल्या किंवा त्रस्त झाले व जागा हस्तांतरित केल्या. आणि नवीन मंडळी त्या ठिकाणी आली. व्यवसाय करू लागलेत. ही नवनवीन मंडळी बरीचशी उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमधील आहेत. ते दिवसभर दादर परिसरात व्यवसाय करतात. बऱ्यापैकी मराठी जाणून आणि बोलून घेतात पण व्यवहार करण्याची वेळ येते तेव्हा "इतके टका द्या" ही भाषा सहजतेने त्यांच्या ओठावर येते. डिजिटल पेमेंट किंवा यूपीएने पैसे दिले तर समोर येणारे नावही चक्रावून टाकणारे असते. ते नाव भाईजानचे असते. ते दिवसभर व्यवहार फेरीवाले म्हणून दादरमधून करतात व रात्री मीरा रोडला परततात. त्यामुळेच मीरा रोड परिसर हा संघर्षाचा, तणावाचा केंद्रबिंदू झाला आहे.

यावर्षी हा वर्ग तसा अस्वस्थ आहे. एक तर सर्वत्र मतदारयाद्यांची फेरपडताळणी सुरू असल्यामुळे! महाराष्ट्रातही ते कार्य सुरू झाले आहे. याआधी पश्चिम बंगालच्या मतदारयादीतून जवळजवळ एक कोटी मतदारांची नावे तपासण्यात आली आणि ती काढण्यासाठी, त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली नसली तरी त्यांना ते मतदार असल्याचे सिद्ध करावे लागेल. यामुळेच निवडणुकीपूर्वी बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे धाबे दणाणले होते. ममता दीदींनी खूप कांगावेखोरपणा करून पाहिला. त्यांना अपेक्षा होती की केंद्र शासन त्यांचे बंगालमधील सरकार बरखास्त करेल आणि त्या ठिकाणी राष्ट्रपती राजवट लागू करेल. या राष्ट्रपती राजवटीविरुद्ध आपल्याला आंदोलन करता येईल. त्यातून जनतेची काही प्रमाणात सहानुभूती मिळेल आणि आपण केंद्रातील रालोआ सरकारवर मात करू. पण केंद्राचे भाजपचे नेतृत्व विलक्षण संयमाने वागले. त्यांनीही वेगळीच खेळी केली. दीदींच्या सर्व खेळी निष्प्रभ केल्या. शेवटपर्यंत राष्ट्रपती राजवट काही लागू केली नाही.

बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकार हे पाच 'एम'वर अवलंबून होते. यातील पहिला'एम' आहे स्वतः ममता दीदी. त्या स्वतः महिला असल्याने व मागील अनेक वर्षांपासून लक्ष्मी भांडारमार्फत दिली जाणारी मदत आणि त्यातून निर्माण झालेली सहानुभूती हा त्यांचा मोठा आधार होता. दुसरा 'एम' होता मुसलमान. तृणमूल काँग्रेसने त्यांना घरजावई असल्यासारखेच वागविले होते. त्यातही बांगलादेशातून आलेल्या घुसखोर मुसलमानांचा या सरकारवर अधिक अधिकार होता. त्यामुळे सर्व सरकारी यंत्रणा विविध योजनांचा फायदा त्यांना करून द्यायला सज्ज होती. त्यातून आपल्याला मुसलमान समाजाची एकगठ्ठा मते मिळतील अशी दीदींना खात्री होती. याशिवाय तिसरा 'एम' म्हणजे मनी किंवा चलन. तर चौथा होता मसल पॉवर. पाचवा 'एम' होता मंत्रालय. त्यातील दुसरा 'एम' बंगालमधून बाहेर पडून अन्यत्र पसरला आहे. तसाच तो मीरा भाईंदर आणि मुंबईमध्ये स्थिरावला आहे.

त्यातच मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने एक आदेश काढला व निवासी इमारतीत कुर्बानी देण्याला मज्जाव केला. कुर्बानी देण्यासाठीच्या जागा सर्व ठिकाणी निश्चित केल्या आणि त्याच ठिकाणी कुर्बानी देण्यात यावी असा आदेश निघाला. ही झाली सरकारी पातळीवरील योग्य दक्षता, पण याशिवाय मुंबई अस्वस्थ होण्याला कारणीभूत ठरले ते बांद्रा येथील अतिक्रमण हटविणे.

बांद्रा स्टेशन जवळील गरीब नगरमधील अतिक्रमणे १९ मे ते २४ मे २०२६ या काळात काढण्यात आली. जवळजवळ ४०० अतिक्रमणे काढली गेलीत. ही अतिक्रमणे काढण्यासाठी १००० ते दीड हजार सुरक्षा कर्मचारी म्हणजेच पोलिस दल, रेल्वेचे पोलिस, रेल्वे सुरक्षा पथक आणि इतर पथके कार्यरत होती. आज त्या अतिक्रमण जागेचे बाजार मूल्य ६०० कोटींच्या वर आहे. अशी १.२८ एकर जागा या पोलिस दलाने मोकळी करून पश्चिम रेल्वेच्या स्वाधीन केली आहे. या मोबदल्यात फक्त शंभर घरांचे पुनर्वसन होणार आहे. कारण तेवढीच घरे काही तरी परवानगी बाळगून आहेत.

वास्तविक न्यायालयाच्या आदेशानंतर ही कारवाई सुरू झाली. बघता बघता ती जागा रिकामी झाली, पण अतिक्रामकांचे नेतृत्व करणाऱ्यांच्या टोळ्या सर्वत्र फिरू लागल्या. पुनर्वसन होईल, जेव्हा जागा मिळेल तेव्हा बघू. आता कुठेतरी गाशा गुंडाळून आपण गेले पाहिजे, असे ठरवून या भंटोलांच्या टोळ्या वस्तीवस्तीत फिरू लागल्या. आपल्या राहण्याची कशी काही व्यवस्था होईल का? हे बघू लागल्यात. मीरा रोड, मुंब्रा, गोवंडी हा परिसर त्यांच्या मदतीला होता आणि त्यातूनच तणाव वाढविण्यासाठी काय पावले उचलता येतील हे बघितले गेले. मीरा रोडवरील पूनम क्लस्टर वन या सोसायटीच्या एका सदनिकेत काही बकऱ्याही आणून ठेवल्या होत्या. त्यांच्यासाठी तात्पुरता खुराडाही उभारला गेला. सोमवार २५ ला दोन्ही समाजात मोठा संघर्ष झाला, गदारोळ झाला. २६ तारखेला या गदारोळाचे रूपांतर हिंसक संघर्ष आणि आंदोलनात झाले. शेवटी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात झाले. पूनम क्लस्टर वन या सोसायटीतील ते बकरा-बकरीचे खुराडे मनपाने पाडले खरे, पण ते पुन्हा बांधण्याचा प्रयोग सुरू झाला. मंगळवार २६ ला सकाळी सकाळी हिंदू समाज व बजरंग दलाचे कार्यकर्ते या सोसायटीबाहेर जमले आणि त्यामुळे तणाव अधिकच वाढला. आंदोलकांनी त्या ठिकाणी हनुमान चालीसा पठन सुरू केले. इतकेच नव्हे तर काही कार्यकर्त्यांनी निषेध म्हणून एक डुक्करही त्या ठिकाणी आणून बांधला. जर निवासी संकुलात बिना परवानगी बकऱ्या आणून त्यांची कुर्बानी होऊ शकते, त्यांच्यासाठी खुराडे बांधले जाऊ शकतात तर डुकरे तिथे का राहू नये असा त्यांचा प्रश्न होता. नियंत्रणाबाहेर गेलेल्या जमावाला तोंड द्यायला आणि

### शासन आदेशातील प्रमुख नियम आणि मार्गदर्शक सूचना

**१. गोवंश हत्याबंदी (सक्त मनाई)** : महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) कायदा, १९९५ नुसार राज्यात गाय, बैल आणि वासरू यांच्या कत्तलीवर पूर्णपणे बंदी आहे. बकरी ईदच्या निमित्ताने गोवंशाची हत्या केल्यास कडक कायदेशीर कारवाई केली जाते. केवळ कायदेशीर परवानगी असलेल्या प्राण्यांचीच (उदा. बोकड, मेंढी, म्हैस/रेडा) कुर्बानी देण्याची मुभा असते.

**२. अधिकृत पशुवधगृह आणि जागा** : कुर्बानीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी (मुंबईत प्रामुख्याने देवनार पशुवधगृह) निश्चित केलेल्या अधिकृत जागांचाच वापर करणे प्रशासनाकडून बंधनकारक केले जाते.

**३. तात्पुरती परवानगी** : गृहनिर्माण संस्था (सोसायटी) किंवा खाजगी जागेत कुर्बानी द्यायची असल्यास, महापालिका, पोलिस किंवा संबंधित स्थानिक प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. यासाठी महापालिकेकडून विशेष ऑनलाईन ॲप किंवा पोर्टलद्वारे परवानगी दिली जाते.

**४. सार्वजनिक ठिकाणी मनाई आणि स्वच्छता** : सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर किंवा उघड्यावर कुर्बानी देण्यास सक्त मनाई असते. तसेच, प्राण्यांचे अवशेष सार्वजनिक कचराकुंडीत, नाल्यांमध्ये किंवा गटारात न टाकता, त्याची विल्हेवाट प्रशासनाने दिलेल्या गाड्यांमध्ये किंवा नियुक्त केलेल्या ठिकाणीच लावणे बंधनकारक असते.

**५. प्राण्यांची वाहतूक आणि क्रूरता प्रतिबंध** : प्राण्यांची वाहतूक करताना क्षमतेपेक्षा जास्त प्राणी वाहनात कोंबणे किंवा त्यांना क्रूरतेने वागवण्यास मनाई आहे. प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नियमांचे पालन करूनच वाहतूक करणे अनिवार्य असते.

कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करायला, पोलिसांना बराच प्रयास करावा लागला. यातायात करावी लागली, बळाचा वापरही करावा लागला. वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि मनपा अधिकाऱ्यांनी एक बैठक बोलवली आणि बकऱ्यांना एका टेम्पोतून सोसायटीमधून मनपाने ठरविलेल्या दुसऱ्या एका ठिकाणी हलविले गेले. याच गडबडीत कुठेतरी अफवा पसरली की गोधनही कुर्बानीसाठी ठेवले होते. तेही परत गेले. मुसलमान समाजात चीड व संताप वाढविण्यासाठी आणलेले डुक्करही अन्यत्र हलविले गेले. पण तणाव मात्र अजूनही कायम आहे.

मीरा रोड पाठोपाठ आता गोरेगावच्या गोकुळधाममध्येही कुर्बानीला विरोध होत आहे. उघड्यावर कुर्बानीला परवानगी देऊ नये अशी मागणी स्थानिक नगरसेविका प्रीती साटम यांनी प्रशासनाकडे केली आहे.

सरकार व जनतेने सावध राहून बकरी ईदचे निमित्त करून, संघर्ष करणाऱ्यांना जागीच रोखून, शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली आहे. पण एकूणच काय तर काळ सांगतो आहे सावध... सावध रे.

८८८८३९७७२७

## वेध

नीलेश जोशी

# झारीतील शुक्राचार्य

भारतीय संस्कृती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती व्यवस्थेचा कणा मानला जाणारा गोवंश आज अनेक संकटांशी झुंज देत आहे. एकीकडे राज्य सरकारद्वारा संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायदा करण्यात आला आहे. मात्र दुसरीकडे अवैध कत्तल, तस्करी, वाहतूक यामुळे गोवंशाची संख्या चिंताजनकरीत्या घटताना दिसत आहे. विशेषतः बकरी ईद दरम्यान राज्यात गोवंश कत्तल होऊ नये म्हणून राज्यस्तरावरील संबंधित विविध विभागांकडून आदेश निघतात. या आदेशांना समोर ठेवून अगदी जिल्हा, शहर स्तरावरदेखील आदेश निर्गमित होतात. विविध बैठका होऊन त्यात निर्देश दिले जातात; प्रत्यक्षात प्रशासनाच्या नाकावर टिच्चून मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल होते, ही वस्तुस्थिती आहे. हा विरोधाभास केवळ कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रश्नच उपस्थित करीत नाही, तर प्रशासकीय यंत्रणेच्या इच्छाशक्तीवरही प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

गोवंश संरक्षणाचा विषय हा केवळ धार्मिक निश्चितच नाही. हा विषय ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतीचे भवितव्य, दुग्ध व्यवसाय, पर्यावरण, जैवविविधता आणि सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंध असलेला आहे. भारत हा कृषिप्रधान देश मानला जातो. भारतीय शेती ही बैल, गाय आणि शेणखत यावर आधारित होती. रासायनिक खतांचा अतिरेक नव्हता. शेणखतामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहत होती. बैलांच्या सहाय्याने शेतीची कामे होत होती. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबासाठी गाय म्हणजे केवळ जनावर नव्हे तर उत्पन्नाचा स्रोत म्हटले जायचे. दूध, शेण, मूत्र, शेतीसाठी बैल, गोबर गॅस अशा अनेक प्रकारे गोवंशाची उपयोगीता वेळोवेळी सिद्ध झाली आहे. मात्र, आधुनिकतेच्या नावाखाली शेती यांत्रिकीकरणाकडे झुकली आणि पारंपरिक गोवंशाचे महत्त्व कमी होत गेले. ट्रॅक्टर, रासायनिक खते आणि दुग्ध व्यवसायातील व्यावसायिक स्पर्धेमुळे देशी गोवंश मागे पडला. याच काळात अवैध कत्तल आणि तस्करीचे प्रमाण वाढू लागले. अनेक ठिकाणी रात्रीच्या अंधारात जनावरे वाहून नेली जातात. वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक जनावरे कोंबून त्यांची वाहतूक केली जाते. अनेक वेळा या वाहतुकीत जनावरे जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात. तरीही प्रशासनाद्वारे जरब बसणारी कारवाई होत नसल्याने याला अद्यापही आळा बसला नाही.

हीच परिस्थिती गोवंश कत्तलीबाबतही आहे. अनेक शहरांमध्ये अधिकृत कत्तलखानेच नाहीत किंवा जे आहेत त्यांच्याकडे आवश्यक पर्यावरणीय मंजुरी, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, पशुवैद्यकीय तपासणी व्यवस्था नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. तरीही मोठ्या प्रमाणावर जनावरांची कत्तल होत असल्याचे चित्र आहे. काही भागांमध्ये रस्त्याच्या कडेला, विशिष्ट वस्त्यांमध्ये घरोघरी कत्तल केली जाते. त्यातून निर्माण होणारा जैविक कचरा, दुर्गंधी आणि रक्तमिश्रित पाणी सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक ठरते. ही रोजची समस्या तर आहेच; पण बकरी ईदेला मोठ्या प्रमाणात होणारी कत्तल अधिक चिंताजनक म्हणावी लागेल. ईदेच्या पृष्ठभूमीवर शेकडो जनावरांच्या कत्तलीनंतर स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशासन अतिरिक्त व्यवस्था उभी करते याबाबत कुणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही. पण स्वच्छता करताना प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांना जनावरांच्या अवशेषांत मोठ्या प्रमाणात गोवंशाचे अवशेष आढळून देखील गोवंशाची अवैध कत्तल झाल्याबाबत हे कर्मचारी पोलिस तक्रार का करीत नाहीत, असा प्रश्न उभा राहतो. एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्था गोवंशाची कत्तल होऊ नये म्हणून पत्र, बैठका यात आपला वेळ खर्ची घालतात तर दुसरीकडे गोवंशाची कत्तल झालेली असताना त्यांच्या डोळ्यावर पट्टी का असते?

खरं म्हणजे गोवंशाला केवळ धार्मिक प्रतीक म्हणून न पाहता ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू म्हणून पाहणे आवश्यक आहे. भविष्यातील मोठे संकट म्हणजे शेतीतील वाढते रासायनिक अवलंबित्व. जर गोवंश घटत गेला तर नैसर्गिक खतांचे उत्पादन कमी होईल. जमिनीचा पोत बिघडेल. पाण्याचे प्रदूषण वाढेल. त्यामुळे गोवंश संरक्षणाचा प्रश्न पर्यावरणीय शाश्वततेशीही जोडलेला आहे. याचा विचार करूनच फडणवीस सरकारने गोवंश हत्या बंदी कायदा केला. पण कायद्याची अंमलबजावणी म्हणजे केवळ खानापूर्ती आणि कागदी घोडे नाचवणे, असा अधिकाऱ्यांचा समज झाला आहे. असे अधिकारीच कायद्याच्या आड येणारे 'झारीतील शुक्राचार्य' म्हणावे लागतील. जोपर्यंत त्यांचा बंदोबस्त होणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण शक्य नाही.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# सिद्धरामय्या जाणार; शिवकुमार येणार?

केरळमध्ये काँग्रेसच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेतली असताना कर्नाटकात काँग्रेसमध्ये नेतृत्वबदलाच्या मुद्यावरून वादळ निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. आतापर्यंत देशातील तीन राज्यात काँग्रेसची सत्ता होती; त्यात तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेशचा समावेश आहे. यावेळी केरळमध्ये काँग्रेसची सत्ता आली आणि व्ही. डी. सतीशन मुख्यमंत्री झाले. त्यामुळे काँग्रेसशासित राज्यांची संख्या चारवर गेली. मात्र, या बातमीची शाई वाळत नाही, तोच कर्नाटकात काँग्रेसमध्ये नेतृत्वबदलाचे संकट उद्भवले आहे. हे संकट तसे जुने आहे. कर्नाटकात नेतृत्वबदलाचा मुद्दा अधूनमधून डोके वर काढतो आणि काही काळाने शांतही होतो. यावेळी मात्र तो आरपारला जाण्याची शक्यता दिसत आहे.

२०२३ मध्ये कर्नाटकात काँग्रेसला बहुमत मिळाले तेव्हा प्रदेश काँग्रेस अध्यक्ष असलेले डी. के. शिवकुमार मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार होते, पण त्यावेळी सिद्धरामय्या यांनी बाजी मारली. शिवकुमार यांना उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. मात्र, त्यांनी मुख्यमंत्रिपदाची आपली इच्छा कधीच लपवून ठेवली नाही. जेव्हा संधी मिळेल, तेव्हा त्यांनी ही इच्छा बोलून दाखवली. सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री करताना अडीच-अडीच वर्ष असा फॉर्म्युला ठरला होता, म्हणजे पहिली अडीच वर्ष सिद्धरामय्या मुख्यमंत्री राहतील आणि नंतरच्या अडीच वर्षात शिवकुमार मुख्यमंत्री होतील, असे ठरले होते, असे म्हणतात. शिवकुमार या कथित फॉर्म्युल्यावरूनच अडीच वर्षानंतर आपल्याला मुख्यमंत्री करण्याची मागणी करत होते. पण त्यांच्या या दाव्याला मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि काँग्रेसच्या नेतृत्वाने कधीच दुजोरा दिला नाही. तरीही शिवकुमार असा दावा वारंवार करत होते.

सिद्धरामय्या यांची मुख्यमंत्रिपदाची अडीच वर्ष पूर्ण झाल्यावर शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदावर पुन्हा एकदा दावा केला. पण त्यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाने त्याची दखल घेतली नव्हती. त्यामुळे यावेळी सिद्धरामय्या सरकारची तीन वर्षे पूर्ण झाल्यावर शिवकुमार यांनी या दाव्याचा पुनरुच्चार करताना काँग्रेसच्या नेतृत्वाला निर्वाणीचा इशारा दिला, असे दिसते. त्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाला यावेळी त्याची गांभीर्याने दखल घ्यावी लागली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार यांना दिल्लीत बोलवावे लागले. राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी या दोन्ही नेत्यांशी आधी वेगवेगळी आणि नंतर एकत्र चर्चा केली समजते. शिवकुमार जिद्दीला पेटल्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपद सोडण्याचे निर्देश दिले असल्याची चर्चा आहे.



चर्चा यासाठी म्हणायचे की याला सिद्धरामय्या, शिवकुमार वा काँग्रेसच्या नेतृत्वाने दुजोरा दिला नाही. काँग्रेसचे संघटन महासचिव वेणुगोपाल यांनी राज्यसभा निवडणुकीच्या मुद्यावर आमची चर्चा झाल्याचे सांगितले. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी सिद्धरामय्या यांचे मन वळवण्यात काँग्रेसच्या नेतृत्वाला यश आले की नाही, ते समजू शकले नाही. मात्र, त्यांच्यासमोर दिल्लीत म्हणजे राष्ट्रीय राजकारणात येण्याचा तसेच राज्यसभेवर घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. शिवकुमार यांचे पुत्र डॉ. यतिंद्र सिद्धरामय्या यांना कर्नाटकात मंत्रिमंडळात घेण्यालाही काँग्रेसच्या नेतृत्वाने सहमती दर्शवली आहे. त्यामुळे हा प्रस्ताव स्वीकारण्याशिवाय सिद्धरामय्या यांच्यासमोर पर्याय दिसत नाही.

सिद्धरामय्या यांनी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला तर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची काँग्रेस नेतृत्वाची सूचना त्यांनी मान्य केल्याचे स्पष्ट होईल. त्या परिस्थितीत शिवकुमार प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा देत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, असे दिसते. विशेष म्हणजे शिवकुमार यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपदासोबत प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद कायम ठेवण्यात आले होते. कर्नाटक काँग्रेसमधील या राजकीय घडामोडीचा बिहारमधील नितीशकुमार यांच्या राजीनाम्याशी दूरदूरपर्यंत कोणताच संबंध नसला, तरी त्यात काही साम्य दिसून येते. दोन्ही नेत्यांचे वय ७५ पेक्षा जास्त आहे. नितीशकुमार यांनीही मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत दिल्लीत येण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला होता.

या निर्णयानंतरच नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार यांचा बिहारमधील सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश झाला आहे. या घटनाक्रमात फरक म्हणजे नितीशकुमार यांच्यावर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी कोणाचा दबाव नव्हता, त्यांनी स्वेच्छेने मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत राज्यसभेत जाण्याचे मान्य केले तर सिद्धरामय्या यांना मात्र काँग्रेस नेतृत्वाच्या दबावामुळे मुख्यमंत्रिपद सोडावे लागत आहे. सिद्धरामय्या यांनी हा निर्णय मान्य करत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला तर कर्नाटकमध्ये शांततेत सत्तेचे हस्तांतरण होऊ शकते. त्यांनी राजीनामा देण्यास नकार दिला तर मात्र काँग्रेस नेतृत्वाची डोकेदुखी वाढू शकते. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हे कर्नाटकचे असल्यामुळे काँग्रेससाठी हे राज्य अतिशय महत्त्वाचे आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत कर्नाटकातून काँग्रेसला तीन



जागा मिळण्याची शक्यता आहे. यातील एका जागेवर खडगे निवडून आले होते. काँग्रेस यावेळी पुन्हा एकदा खडगे यांना राज्यसभेत पाठवणार आहेत. सिद्धरामय्या राज्यसभेत जाण्यास तयार असतील तर दुसरे उमेदवार ते राहू शकतात. तिसरा उमेदवार काँग्रेसला निवडावा लागेल. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी २८ मेला आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत ते मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देतील, असा अंदाज आहे. तसेच झाले तर शिवकुमार यांचे मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. आतापर्यंत शिवकुमार यांनी बराच संयम धरला होता, प्रत्येकवेळी काँग्रेस नेतृत्वाच्या शब्दाला मान दिला होता. त्यामुळे यावेळी 'अभी नहीं तो कभी नहीं' या जिद्दीने ते भिडले होते. यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाने शिवकुमार यांच्या तोंडाला पाने पुसली असती तर शिवकुमार यांनी काँग्रेस नेतृत्वाला त्यांची जागा दाखवून दिली असते.

आतापर्यंत काँग्रेससाठी संकटमोचकांची भूमिका बजावणारे शिवकुमार यावेळी काँग्रेससाठी नवे संकट निर्माण करण्याची शक्यता होती, पण काँग्रेसच्या नेतृत्वाने यावेळी राजकीय शहाणपण दाखवत पक्षासमोरचे संभाव्य संकट टाळले, असे म्हणता येईल. सिद्धरामय्या यांनी दोन वेळा कर्नाटकचे मुख्यमंत्रिपद भूषविले. पहिल्यांदा ते १३ मे २०१३ ते १७ मे २०१८ पर्यंत मुख्यमंत्री होते.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. दुसऱ्यांदा ते २० मे २०२३ ला मुख्यमंत्री झाले. यावेळी मुख्यमंत्रिपदाची तीन वर्षे त्यांनी पूर्ण केली. जनता दल धर्मनिरपेक्षमध्ये असताना सिद्धरामय्या यांनी दोन वेळा उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. सिद्धरामय्या हे मूळ काँग्रेसी नाहीत. लोकदल, जनता पक्ष आणि जनता दल धर्मनिरपेक्ष असा प्रवास करीत ते २००६ मध्ये काँग्रेसमध्ये आले. काँग्रेसमध्ये त्यांना चांगली संधी मिळाली. दोनदा ते राज्याचे मुख्यमंत्री झाले. उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी मात्र मुख्यमंत्री होता येत नसल्यामुळे त्यांच्यासमोर वारंवार आव्हान उभे केले. मात्र तरीही त्यांनी मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कार्यकाळातील तीन वर्षे पूर्ण केली. २०२८ च्या विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवत काँग्रेसने राज्यात नेतृत्वबदलाचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय काँग्रेसला राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरणार की अडचणीत आणणार, याचे उत्तर येत्या काही दिवसात मिळणार आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्र

### पर्यटनाचा आनंद घ्या, पण नियम पाळून

निसर्गाच्या सान्निध्यात आनंद उपभोगता यावा यासाठी केलेले नियोजन म्हणजे पर्यटन! परंतु अतिउत्साही मंडळी आपल्या जीवाची पर्वा न करता साहस करायला जातात अन् मग संकटात सापडतात. कधी कधी या मंडळींचा अतिउत्साह स्वत:च्या जीवावर बेततो. असं म्हणायचे कारण पर्यटक कुठेतरी धबधब्याखाली, दरीमध्ये चार तास अडकून पडतात. हे पर्यटनाला गेलेल्या पर्यटकांना जसे अस्वस्थ करणारे आहे तसेच घरातील मंडळींना, पोलिस व सुरक्षारक्षक यंत्रणांवरही ताणतणाव निर्माण करणारे आहे, याचा विचार करायला हवा. निसर्गाच्या सान्निध्यात नक्कीच पर्यटनासाठी जायला हवे, परंतु होणाऱ्या गर्दीचा मागोवा घेऊनच! विशेष करून पावसाळ्यात निसर्गातील अनेक स्थळे, नयनरम्य दृश्य आपल्याला खुणावत असतात. पडणारा पाऊस, हिरवा शालू पांघरलेल्या डोंगराच्या रांगा, हिरवीगार झाडे आपले मन मोहून जाते, उंचावरून पडणारे पाण्याचे धबधबे, उडणारे तुषार अंगावर झेलण्यात एक वेगळा आनंद देऊन जातात. या नयनरम्य निसर्गाच्या सान्निध्यात खवय्येगिरी तर आलीच. गरमागरम भुट्टे अर्थात मक्याचे कणीस, गरमागरम भजी, वाफाळलेला चहा याचा आपण नक्कीच आनंद घ्यायला हवाच. हा आनंद द्विगुणित करताना मात्र याला आपल्या अतिउत्साहामुळे कुठेही गालबोट लागू नये असे वाटते. चला तर आपण पर्यटनाचा, नयनरम्य निसर्गाचा आनंद घेऊ या तोही सर्व सुरक्षिततेचे नियम पाळून.

**सुधीर मेथेकर**/पुणे, ९७३००६५४८५

CMYK


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### कुर्डुवाडीत उद्या पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत कुस्त्यांचे मैदान

**कुर्डुवाडी, दि. २७ मे-**

कुर्डूवाडी शहरात शुक्रवार दि.२९ रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आ. संजयमामा शिंदे व माजी आ.राजेंद्र राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत कुर्डूवाडीच्या इतिहासात प्रथमच जिल्ह्यातील सर्वात मोठे भव्य जंगी कुस्त्याचे मैदान आयोजित करण्यात आले असल्याची माहीती छत्रपती शिवाजी महाराज तालीम संकुलनाचे प्रमुख आयोजक अस्लम काझी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी यासिन बहामद, अमोल रचपूत उपस्थीत होते.





पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्यातून हे कुस्ती मैदानाचे आयोजन केले असून कुर्डूवाडी परीसरासह संपुर्ण तालुक्यातील आजच्या तरूणाईत वाढत चाललेली व्यसनाधिनता, मोबाईलचे वेड, संपत चाललेले मैदानी खेळ, याबरोबरच महाराष्ट्राची कुस्तीची व लाल मातीची संस्कृती जपण्यासाठी मैदान भरवल्याचे काझी यांनी स्पष्ट केले. गरीबाच्या घरीच कुस्ती जन्म घेते, असे मानून यातुन मिळणारे उत्पन्न गरीब मुलांना कुस्ती शिकवण्यासाठी उपयोगात आणले जाणार आहे. कुर्डूवाडी येथील संकुलनात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून दोनशेपेक्षा जास्त मल्ल तयार करण्याचे काम चालु असून यासाठी महाराष्ट्रासह हरीयाणातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे वस्ताद मुलांना शिकवण्यासाठी आहेत. कुर्डूवाडी व अकुलगाव (ता. माढा) हे परंपरागत कुस्तीसाठी प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील एक नामवंत पैलवान चांदीच्या बावन्न गदेचे मानकरी पै. अस्लमभाई काझी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित या कुस्ती फडात महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख, पृथ्वीराज पाटील आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल पुणेचे वैभव माने, महारुद्र काळेल यांचा समवेश आहे. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार संजयमामा शिंदे, नगराध्यक्ष जयश्री भिसे, शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. छत्रपती शिवराय कुस्ती संकुल येथे आयोजित या स्पर्धेत २०० पेक्षा जास्त कुस्त्या होणार आहेत.

# राज्यस्तरीय महिला खो-खो, कबड्डी स्पर्धा आजपासून सोलापुरात

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे-**

हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने राज्यस्तरीय महिला खो-खो आणि कबड्डी स्पर्धेचे आयोजन २८ ते ३० मे दरम्यान येथील नॉर्थकोट प्रशाला मैदानावर करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र आणि जिल्हा खो-खो व कबड्डी संघटनेच्या मान्यतनेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत प्रत्येकी आठ संघ सहभागी होणार आहेत. दोन्ही स्पर्धांचे मिळून सुमारे ३०० खेळाडू उपस्थित राहणार आहेत. कबड्डी स्पर्धा या सायंकाळच्या सत्रात होतील तर सकाळ व संध्याकाळच्या सत्रात खो-खोचे सामने होणार आहेत. या दोन्ही स्पर्धे साठी प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास ५१, ३१ व १५ हजार रुपये आणि स्मृती चषक असे बक्षिसाचे स्वरूप आहे. प्रत्येक तीन वैयक्तिक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विधानसभेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, महापौर विनायक कोंड्याल आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. या स्पर्धेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर आणि उत्सव अध्यक्ष विकी डोंबाळे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस नागेश खरात, अक्षय वाकसे, सचिन हक्के, शंकर नरोटे, अतुल माशाळ, समर्थ मोटे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



## जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन निवड चाचणीत ६० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

सोलापूर जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १९ वर्षांखालील मुला-मुलींची निवड चाचणीत शहर व जिल्ह्यातील ६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

येथील ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मैदानावर झालेल्या या चाचणीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वजीत पोतदार यांच्या हस्ते झाले. यावेळी अश्विन सावळगी, प्रा. नरेश पाटील, क्रीडा संचालक प्रा. शिवशरण कोरे उपस्थित होते.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची ४ ते ६ जून दरम्यान उदगीर (जि. लातूर) येथे होणाऱ्या राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांसाठी निवड करण्यात येणार असल्याची माहिती निवड समिती प्रमुख सुहास छंचुरे यांनी दिली. चाचणी यशस्वी करण्याकरिता प्रा. प्रमोद चुंगे, क्रीडा शिक्षक धर्मराज कट्टीमनी, प्रथमेश जाधव, गणेश जाधव, यश दिंडोरे, चंद्रकांत हन्नूरे व गणेश राऊत यांनी परिश्रम घेतले.

## ‘करिअर’ संघाचा केपीसीए क्लबवर शानदार विजय

### विजय ट्रॉफी क्रिकेट

**सोलापूर, दि. २७ मे-**

येथील विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत बुधवारी झालेल्या चुरशीच्या सामन्यात 'करिअर' संघाने केपीसीए क्लबचा ४८ धावांनी पराभव करत शानदार विजय मिळवला. 'करिअर' संघाच्या झैद नदाफने फलंदाजी आणि गोलंदाजी उत्कृष्ट कामगिरी करत वर्चस्व गाजवले. तो सामन्याचा मानकरी ठरला.



झैद नदाफ

इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 'करिअर' संघाने निर्धारित ४० षटकांत ९ बाद २०६ धावांचे आव्हानात्मक आव्हान उभे केले. यामध्ये नादाफ झैदने ५७ धावांची तर तनवीर शेखने ४४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. केपीसीए क्लबकडून गोलंदाजीत श्रेयस सुरवेसे आणि हुचेश्वर कांबळे यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले, तर सनी पोल व मायंक पात्रे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

२०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केपीसीए क्लबचा डाव ३१.५ षटकांत सर्वबाद १५८ धावांवर आटोपला. केपीसीए कडून मायंक पात्रेने २८ धावा केल्या, तर हर्षवर्धन २४ धावांवर नाबाद राहिला. करिअर संघाकडून भेदक गोलंदाजी करताना झैद नादाफने ५ बळी घेत केपीसीएच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले, त्याला खिझर शेखने ३ बळी घेत उत्तम साथ दिली. या सामन्यासाठी पंच म्हणून अनिल सलगर आणि सूरज गायकवाड यांनी तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तुर यांनी काम पाहिले.

## पुष्प जिमखाना व टाईम्स इलेव्हनची घोडदौड

### रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### प्रशांत काशीद, अमरदीप शिंदे सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**




रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत पुष्प जिमखाना संघाने एम. एस. रायडर्सवर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. प्रशांत काशीद सामन्याचा मानकरी ठरला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरु असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात टाइम्स ११ संघाने ग्लोबल क्रिकेट क्लबव १३१ धावानी मात केली. अमरदीप शिंदे सामनावीर ठरला.

सामनावीर पुरस्कार इस्माईल नाकेदार, वासुदेव दोरनाल, लियाकत शेख, अतुल बांदेवाडीकर, नवीन माने, विक्रांत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला. सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहे.पंच म्हणून मजहर मंगोली, दया नवले, महेश सोनवणे व चिराग शाह तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**एम एस रायडर्स :** १५.४ षटकांत सर्व बाद ८६ (गफूर १६, शुभम तिवारी १५, जावेद नाईकवाडी १४, प्रशांत काशीद ३-१६, मयूर राठोड ४-८, अजय माने २-३) **पराभूत विरुद्ध पुष्प जिमखाना :** ११ षटकांत ३ बाद ८७ (मारुती कांबळे ४८, सत्यजित गवळी १५, वकील शेख १-१९, दिलीप छत्री १- १२)

**टाइम्स इलेव्हन :** २० षटकांत ८ बाद १८६ (अमरदीप शिंदे ८३, आनंद खमितकर ४१, अयुब पट्टेवाले १४, सिराजअहमद २- २४ धावा, वसीम २-३०, इम्तियाज शेख २-१६, मल्लिकार्जुन आवटे, जावेद पटेल प्रत्येकी एक बळी) **विजयी विरुद्ध ग्लोबल क्रिकेट क्लब :** १४ षटकांत सर्व बाद ५५ (सिराजअहमद शेख १४, मल्लिकार्जुन आवटे ११, अमरदीप शिंदे २-५, सचिन गायकवाड, मकरंद बसवंती, प्रवीण कालकोटे, अयुब पट्टेवाले प्रत्येकी एक बळी

**आजचा सामना**

**सकाळी :** सोलापूर स्पोर्टस् इन्स्टिट्यूट विरुद्ध क्रिकेट ॲकॅडमी **दुपारी :** सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट ब विरुद्ध सिंधी क्रिकेट क्लब.

# ईगल्स व पँथर्स संघांची विजयी सलामी

## निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी आंतरक्लब स्पर्धेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. २७ मे -**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित इंटर क्लब क्रिकेट स्पर्धेचा पुष्प जिमखाना, डोणगाव रोड या क्रीडांगणावर उत्साहात शुभारंभ झाला. या स्पर्धेत १४ वर्षांखालील आणि १६ वर्षांखालील वयोगटातील एकूण ७ संघांचा समावेश असून, ८४ खेळाडू रंगीत पोषाखात सहभागी झाले आहेत.



स्पर्धेचे उद्घाटन १४ वर्षांखालील जिल्हा क्रिकेट संघटना निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे आणि दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष विकेश गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाची माहिती निलेश गायकवाड यांनी दिली. सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले. आभार विनोद पाटील यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राहुल मित्रे, दीपक सुरवसे, वाल्मिक कीर्तीकर व आनंद पाटील परिश्रम घेत आहेत.

**ईगल्सचा २ गडी राखून विजय**

सकाळच्या सत्रातील पहिला सामना एनजीसीए लॉयन्स विरुद्ध एनजीसीए ईगल्स यांच्यात झाला. ईगल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. लॉयन्स संघाने प्रथम फलंदाजी करताना ३० षटकांत सर्वबाद २१७ धावा केल्या. यामध्ये हर्ष राऊतने ६१, रणवीर सिंग बुमराने ५४, सुरज थोरातने ३१ आणि सुजल गायकवाडने १५ धावा केल्या. ईगल्सकडून गोलंदाजी करताना अनुज वाल्मिकी आणि विराज टकले यांनी प्रत्येकी ३, तर सोहम कुलकर्णीने २ बळी घेतले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना एनजीसीए ईगल्स संघाने २६.१ षटकांत ८ बाद २१८ धावा करत विजय मिळवला. ईगल्सकडून अनुज मुंदडाने ८५, श्रवण मेत्रेने ३८, आर्यन हंगेने २४, पार्थ राठोडने १६ आणि श्लोक आनंदने १३ धावा केल्या. लॉईन्सकडून गोलंदाजी करताना सार्थक कन्ना याने ५२ धावा देत ३ बळी घेतले. सुरज थोरातने ३, तर आर्यन भुमकर आणि आशिष बाबरे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. एनजीसीए ईगल्स संघाने हा सामना २ गडी राखून जिंकला. या सामन्यात अनुज मुंदडा याला सामनावीर व उत्कृष्ट फलंदाज, तर सार्थक कन्ना याला उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरवण्यात आले.

**डीएल मेथडनुसार पँथर्स ५८ धावांनी विजयी**

दुसरा सामना एनजीसीए पँथर्स विरुद्ध एनजीसीए रायडर्स यांच्यात झाला. पँथर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २५ षटकांत सर्वबाद १७० धावा केल्या. यामध्ये कबीर कीर्तीकर याने ५८, अधिराज कोनापुरे याने ३२ आणि आराध्या आर. याने २० धावा केल्या. रायडर्सकडून गोलंदाजी करताना व्यंकटेश घाडगे याने २२ धावांत ४ बळी आणि स्वप्निल चव्हाण याने १३ धावांत २ बळी घेतले. तर अथर्व हलकुरकी व मल्हार गायकवाड यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. प्रत्युत्तरादाखल खेळताना रायडर्स संघाला २० षटकांत ८ बाद ११२ धावाच करता आल्या. यामध्ये स्वप्निल चव्हाणने नाबाद २७, व्यंकटेश घाडगेने १६ आणि बालाजी रातुलने १५ धावा केल्या. पँथर्स संघाकडून घातक गोलंदाजी करताना अथर्व पाटील याने १३ धावांत ५ बळी आणि शांभवी शिंदकर याने २६ धावांत ३ बळी घेतले. खराब हवामानामुळे हा सामना डीएल मेथड (डकवर्थ-लुईस नियम) नुसार पँथर्स संघाने ५८ धावांनी जिंकला. या सामन्यात अथर्व पाटील याला सामनावीर व उत्कृष्ट गोलंदाज, तर कबीर कीर्तीकर याला उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरवण्यात आले.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. संबंधित कर्जदारांच्या आणि सह-कर्जदारांच्या कर्जासाठी त्यांची संबंधित मालमत्ता तारण (गहाण) ठेवून सुरक्षित करण्यात आली आहे. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआय च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम, जारी करण्यात आलेल्या संबंधित नोटिसींनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. तसेच सदर रक्कमेवर त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील दरानुसार पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 143067303 | मालमत्तेवर कर्ज | १. अक्षय मधुकर लेंडवे<br>२. पारुबाई मधुकर लेंडवे | 18/02/2026 | INR 8,29,608.92/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नं. ४१८ मधील आणि त्यावरील संपूर्ण जागा/भूखंड, एकूण क्षेत्रफळ २०८४ चौ. फूट, मौजे : एकलासपूर, ग्रामपंचायत एकलासपूरच्या हद्दीत, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४ आणि चतु:सीमा :- पूर्व : स्वतः ची मालमत्ता, उत्तर : मच्छिंद्र दगडू जाधव पश्चिम: हायवे रोड दक्षिण : परमेश्वर रघुनाथ यादव.

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, तुम्ही वर दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी बँक लिमिटेडला** थकीत रक्कम, तिच्या संबंधित तारखेपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी, या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. तसे न केल्यास, थकबाकी वसूल करण्यासाठी गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास बंधनकारक असेल. तसेच, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला सदर सुरक्षित तारण मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीझ) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)

दिनांक : 28/05/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**सिग्नलिंगचे काम**

**ई-निविदा सूचना (पुन्हा-आमंत्रित)**
**निविदा सूचना क्रमांक: SUR-N-T-2026-27-14**
**दिनांक: 25/05/2026**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी डीआरएम (S&T) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे सक्षम, नामांकित संस्था / कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वरून ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहे. कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील मिरज-लातूर रोड सेक्शनमध्ये आरओबी / आरयूबी / सबवे कामांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने एस अँड टी केबल्स / गिअर्सचे संरक्षण / स्थलांतरण करणे. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-14. कामाची किंमत: रु. 52,07,842.43. निविदा फॉर्मची किंमत: निरंक. भरावयाची इसारा रक्कम: रु. 1,04,200.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने . www.ireps.gov.in वर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 25/06/2026 रोजी 15:30 वाजता. याचा सविस्तर तपशील ireps वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर काही शुद्धिपत्रक किंवा दुरुस्ती असेल, तर ते फक्त वरील ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईटवरच अपलोड केले जाईल. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल, पोस्टाद्वारे, ई-मेल, फॅक्स किंवा हस्तक डिलिव्हरीद्वारे आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बिडर्सना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in वर करावी. बयाणा रकमेचा (EMD) भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल. मूळ बँक गॅरंटी, बिड्स सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी (म्हणजेच बिड्स सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविलेल्या नामांकित अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम एस अँड टी शाखा / सोलापूर**

**रेल्वे लाईन अनधिकृतपणे ओलांडणे हा एक दंडनीय गुन्हा आहे.**

**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर**
**श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शेळगी सोलापूर**

**जावक क्र झेड नोटीस/२०२६-२७ दिनांक १३/०८/२०२५**

**नमूना ‘झेड' (Z notice)**

**म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ मधील (नियम क्र. १०७(११)(ड-१)**

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शेळगी सोलापूर या पतसंस्थेच्या खालील थकबाकीदारास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ खालील नियम अन्वये दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मागणी नोटीसद्वारे वसुली दाखल्याप्रमाणे रक्कम भरण्याबाबत कळविले होते. तरी त्यांनी रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केले आहेत. ऋणकोना नोटीस देण्यात येत आहे की, खालील निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(११)(ड -१) अन्वये रीतसर बोजा नोंद करून झेड नोटीसाद्वारे ताबा घेतलेला आहे.

विशेष करून थकबाकीदारांना आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शेळगी सोलापूर यांच्या दिनांक २७/०१/२०२५ आणि २६/०३/२०२५ रोजी जप्ती आदेशातील बोजाची रक्कम रु २१,७४,२९३/- व दिनांक २८/०१/२०२४ पासून रु २०,००,०००/- वर १६ टक्केप्रमाणे खाते बार होईपर्यंतचे व्याज याला अधिन राहावे लागेल.

| अ. क्र. | प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराच्या विरुध्द उक्त प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्यांचे नाव | गावाचे नाव व तालुका | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकारणी | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/४०/२०२४ दिनांक २९/०७/२०२४ | सुधीर सुभाष मरगुरे | मजरेवाडी (९४४१७५) PU-ID : १२०८३८०१७९७ | १०१/२/३ प्लॉट नं. ११२ | १,१२,२० | ०.०० | पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |
| २ | १०१/४०/२०२४ दिनांक २९/०७/२०२४ | सुधीर सुभाष मरगुरे | मजरेवाडी (९४४१७५) UL-PIN : १२०८०१२२७०० | १०१/२/३ प्लॉट नं. ११३ | १,७२,२५ | ०.०० | पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |

ताबा नोटीस दिली असे : १३/०८/२०२५.

शिक्का

**सही/-**
**हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सह. पत. फेड. मर्या., सोलापूर**




## महत्त्वाचे

### निहाल सरीन ई-स्पोर्ट्स विश्व बुद्धिबळसाठी पात्र



**मुंबई** : ई-स्पोर्ट्स आणि गेमिंग क्षेत्रातील एस८यूएल या संस्थेचे प्रतिनिधित्व करणारा भारतीय ग्रॅण्डमास्टर निहाल सरीन याने, चॅम्पियन्स चेस टूरच्या गुणतालिकेच्या माध्यमातून पॅरिसमध्ये होणाऱ्या आगामी ई-स्पोर्ट्स विश्वचषक बुद्धिबळ (ईडब्ल्यूसी) स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तो आपला सहकारी खेळाडू अरविंद चिदम्बरम् याच्या पंक्तीत सहभागी झाला असून, या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी पात्रता मिळवणारा तो आतापर्यंतचा केवळ दुसरा भारतीय खेळाडू ठरला आहे. या वर्षीच्या ईडब्ल्यूसी बुद्धिबळ स्पर्धेसाठी १.५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे (१४.३ कोटी रुपये) बक्षीस असेल आणि ही स्पर्धा ११ ते १५ ऑगस्ट या कालावधीत पार पडेल.

एकंदरीत पाहता, ईडब्ल्यूसी स्पर्धा ६ जुलै ते २३ ऑगस्ट या कालावधीत आयोजित केली जाणार असून, यामध्ये १०० हून अधिक देशांमधील २०० क्लबचे २००० हून अधिक खेळाडू ७५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या (७१८ कोटी रुपये) विक्रमी बक्षीस रकमेसाठी एकमेकांशी स्पर्धा करतील.

### भारतीय हॉकी संघाचे नेतृत्व हरमनप्रीत सिंगकडे



**नवी दिल्ली** : कर्णधार आणि आघाडीचा ड्रॅग-फ्लिकर हरमनप्रीत सिंग याने बुधवारी, पुढील महिन्यात होणाऱ्या एफआयएच प्रो-लीगच्या युरोपियन टप्प्यासाठीच्या २४ सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्व करण्यासाठी पुनरागमन केले. ऑगस्टमध्ये होणाऱ्या विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. वैयक्तिक कारणांमुळे हरमनप्रीतने फेब्रुवारीमध्ये झालेल्या प्रो-लीगच्या होबार्ट टप्प्यात सहभाग घेतला नव्हता. भारतीय संघ सर्वप्रथम ७ ते ९ जून या कालावधीत सराव आणि एका मैत्रीपूर्ण सामन्यासाठी ब्रसेल्सला रवाना होईल. या संक्षिप्त शिबिरानंतर, संघ १० जूनपासून नेदरलँड्समधील रॉटरडॅम येथे दाखल होईल. तिथे १४ ते २१ जून या कालावधीत जर्मनी आणि नेदरलँड्सविरुद्ध होणारे प्रो लीगचे सामने खेळले जातील. त्यानंतर, भारतीय संघ लंडनला रवाना होईल; जिथे २३ ते २८ जून या कालावधीत प्रो-लीगमध्ये त्यांचा सामना पाकिस्तान आणि इंग्लंडशी होईल. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या विश्वचषकासाठी संघाचा गाभा अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने, या संघात अनुभवी दिग्गज आणि युवा प्रतिभावान खेळाडूंचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे. भारताचा कर्णधार आणि बचावफळीचा मुख्य आधार असलेल्या हरमनप्रीतला, अमित रोहिदास, जरमनप्रीत सिंग, जुगराज सिंग आणि युवा बचावपटू अमनदीप लाक्रा यांचा समावेश असलेल्या एका भक्कम बचावफळीची साथ लाभेल. मध्यफळीची धुरा अनुभवी जोडी - हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग आणि विवेक सागर प्रसाद - यांच्यासह राज कुमार पाल हे सांभाळतील.

# सूर्यवंशी, ध्रुव जुरेलची जबरदस्त खेळी

### राजस्थान रॉयल्स ८ बाद २४३







**मुल्लानपूर, २७ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात बुधवारी येथे सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात वैभव सूर्यवंशी (९७) व ध्रुव जुरेलच्या (५०) जबरदस्त फलंदाजीच्या बळावर राजस्थान रॉयल्सने २० षटकांत ८ बाद २४३ धावा उभारल्या आणि सनरायझर्स हैदराबादसमोर विजयासाठी २४४ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले.

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून राजस्थान रॉयल्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशीने तडाखेबंद फलंदाजी करत ४८ चेंडूंत १२५ धावांची सलामी भागीदारी करून राजस्थानला दणकेबाज सुरुवात करून दिली. विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगेने वैभव सूर्यवंशीला रोखले. सूर्यवंशीने २९ चेंडूंत ५ चौकार व १२ षट्कारांसह ९७ धावांची खेळी केली. पुढे जयस्वालने ध्रुव जुरेलच्या साथीने संघाच्या खात्यात १२ धावांची भर घातली असताना शिवांग कुमारने जयस्वालला (२९) बाद केले. ध्रुव जुरेलने कर्णधार रियान परागच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व संघाला दोनशे धावांच्या जवळपास आणले, मात्र याचवेळी प्रफुल्ल हिंगेने ध्रुव जुरेलला बाद करत आपला दुसरा बळी मिळविला. ध्रुव जुरेलने २१ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह ५० धावांची अर्धशतकी खेळी केली.

नंतर रियान पराग (२६), डोनोव्हन फरेरा (१२), जोफ्रा आर्चर (४), नांद्रे बर्गरने (१) थोडे फार योगदान दिले. रवींद्र जडेजा (१२) व सुशांत मिश्राने (१) नाबाद खेळी करत राजस्थानला २० षटकांत ८ बाद २४३ धावांचा टप्पा गाठून दिला.

हैदराबादकडून प्रफुल्ल हिंगेने ५४ धावांत ३ बळी मिळविले, तर ईशान मलिंगा, शिवांग कुमार व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

### सूर्यवंशीचा सर्वाधिक षट्कारांचा विक्रम

आयपीएलमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम ३० चेंडूंचा आहे. २०१३ मध्ये पुणे वॉरियर्सविरुद्ध १७५ धावांची खेळी करताना ख्रिस गेलने हा विक्रम प्रस्थापित केला होता. सूर्यवंशी हा विक्रम मोडण्याच्या अगदी उंबरठ्यावर पोहोचला होता; मात्र विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगेच्या चेंडूवर बाद झाल्यामुळे वैभव सूर्यवंशी आयपीएलच्या विक्रमापासून थोडक्यात हुकला. मात्र, एकाच टी-२० स्पर्धेत सर्वाधिक षट्कार मारण्याच्या बाबतीत वैभव सूर्यवंशीने ख्रिस गेल व आंद्रे रसेलला मागे टाकले आहे. वैभवने प्रफुल्ल हिंगेच्या एकाच षटकात तुफान फटकेबाजी करत त्याची अक्षरशः धुलाई केली होती. त्यानंतर,२८ चेंडूंमध्ये ९७ धावांवर फलंदाजी करत असताना, त्याने आपल्या दिशेने आलेल्या एका बाउन्सर चेंडूवर अपरकट मारण्याचा प्रयत्न केला; परंतु चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागला आणि तो डीप थर्ड मॅन क्षेत्रात झेलबाद झाला. आता आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक षट्कारांचा विक्रम वैभव सूर्यवंशीच्या नावावर झाला. वैभवने आयपीएल २०२६ मध्ये सर्वाधिक ६५ षट्कार ठोकलेत, यापूर्वी आयपीएल २०१२ मध्ये ख्रिस गेलने ५९ षट्कार ठोकले होते.

# विश्वचषकासाठी भारतीय महिला संघाची जय्यत तयारी

### इंग्लंडविरुद्धची मालिका आजपासून



**चेल्म्सफोर्ड, २७ मे**

गुरुवारपासून चेल्म्सफोर्ड येथे भारत आणि यजमान इंग्लंड यांच्यादरम्यान तीन सामन्यांच्या मालिकेला प्रारंभ होणार आहे. या मालिकेच्या माध्यमातून पुढील महिन्यात होणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषकासाठीच्या अंतिम रंगीत तालमीमध्ये भारतीय संघ आपली कामगिरीतील सातत्य पुन्हा प्राप्त करण्याचा व संघाची अंतिम बांधणी निश्चित करण्याचा प्रयत्न करेल.

१२ जूनपासून जागतिक स्तरावरील हा महत्त्वाचा स्पर्धेचा महाकुंभ सुरू होणार असल्याने, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासाठी ही मालिका विशेष महत्त्वाची ठरते. गेल्या वर्षभरात या संघाने आपल्या खेळातील काही उत्कृष्ट झलक दाखवल्या असल्या, तरी कामगिरीतील सातत्य टिकवून ठेवण्यासाठी त्यांना काही प्रमाणात संघर्ष करावा लागला आहे.

टी-२० विश्वचषकासाठी भारताने केलेली तयारी संमिश्र स्वरूपाची राहिली आहे. गत डिसेंबरमध्ये मायदेशात श्रीलंकेचा ५-० ने धुव्वा उडवत त्यांनी आपल्या तयारीची दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन त्यांनी २-१ ने टी-२० मालिका जिंकत इतिहास घडविला. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर मिळवलेला हा त्यांचा गत दहा वर्षांतील पहिलाच द्विपक्षीय मालिका विजय होता. ऑस्ट्रेलियातील हा विजय अशा एका संघासाठी मोठी प्रगती मानला गेला, ज्या संघाला परदेशातील दौऱ्यांवर, विशेषतः दडपणाच्या प्रसंगी, अनेकदा संघर्ष करावा लागला होता. विश्वचषकाच्या तोंडावर फलंदाजांचा आक्रमक दृष्टिकोन व गोलंदाजांची शिस्तबद्ध कामगिरी, या दोन्ही गोष्टींनी संघासाठी अत्यंत उत्साहवर्धक संकेत दिले आहेत.

तथापि, त्यानंतरच्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यादरम्यान संघाची गती मंदावली. या दौऱ्यात भारताला १-४ अशा निराशाजनक पराभवाला सामोरे जावे लागले तसेच येथील परिस्थितीने आगामी महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी संघातील अनेक उणिवा आणि चिंतेचे विषय समोर आणले. फलंदाजीमध्ये सातत्याचा अभाव दिसून आला, मधल्या फळीला सामने निर्णायक टप्प्यापर्यंत नेऊन पूर्ण करण्यात संघर्ष करावा लागला; परिणामी, संपूर्ण मालिकेत भारतीय संघ बऱ्याच अंशी लयीबाहेर असल्याचे दिसून आले.

वेगवान गोलंदाजीची जबाबदारी प्रामुख्याने रेणुका सिंग ठाकूर, क्रांती गौड आणि अरुंधती रेड्डी यांच्या खांद्यावर असेल अशी अपेक्षा आहे. संघ व्यवस्थापन नवोदित खेळाडू नंदिनी शर्माला खेळण्याची संधी देण्याचा विचार करू शकते. (वृत्तसंस्था)

# ज्येष्ठ क्रीडा प्रशासक रणधीर सिंग यांचे निधन

**नवी दिल्ली, २७ मे**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक विजेते आणि ज्येष्ठ क्रीडा प्रशासक आणि माजी नेमबाज रणधीर सिंग यांचे, वयोमानानुसार उद्भवलेल्या प्रदीर्घ आजाराशी लढा दिल्यानंतर, बुधवारी वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले.



गत काही दिवसांपासून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; त्यानंतर ते घरी परतले आणि तिथेच त्यांनी आपल्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला.

क्रीडा आणि क्रीडा प्रशासनाच्या क्षेत्रातील देशातील अत्यंत आदरणीय नावांपैकी एक असलेल्या रणधीर सिंग यांनी, प्रकृतीच्या कारणास्तव नुकतेच ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला होता. या पदावर त्यांची २०२४ मध्ये निवड झाली होती.

१९७८ मध्ये बँकॉक येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक जिंकून, या स्पर्धेत नेमबाजीमध्ये सुवर्णपदक मिळवणारे देशाचे पहिले खेळाडू ठरत त्यांनी इतिहास रचला होता. आपल्या कारकिर्दीत सिंग यांनी पाच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आणि त्यांच्या या कामगिरीसाठी त्यांना अर्जुन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यांनी २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले होते आणि २०२४ मध्ये, ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाचे अध्यक्षपद भूषवणारे ते पहिले भारतीय ठरले होते. (वृत्तसंस्था)

# ख्रिस्टीवर मात करीत प्रणॉयची आगेकूच

**सिंगापूर ओपन बॅडमिंटन**



**सिंगापूर, २७ मे**

भारताचा स्टार बॅडमिंटनपटू एच.एस. प्रणॉयने बुधवारी येथे सुरू असलेल्या सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. त्याने इंडोनेशियाच्या पाचव्या मानांकित जोनाथन ख्रिस्टीवर तीन गेममध्ये (सेटमध्ये) शानदार विजय मिळविला.

२०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता असलेल्या या ३३ वर्षीय भारतीय खेळाडूने अत्यंत संयमी खेळाचे प्रदर्शन करत, जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या या इंडोनेशियन प्रतिस्पर्ध्याचा अवघ्या एका तासाहून काहीशा अधिक कालावधीत १०-२१, २१-१२, २१-१८ अशा गुणांनी पराभव केला.

ख्रिस्टीवर मिळवलेला हा त्याचा गेल्या पाच वर्षांतील पहिलाच विजय होता. यापूर्वी त्याने २०२१ च्या इंडोनेशिया ओपन स्पर्धेत ख्रिस्टीचा पराभव केला होता.

**प्रणॉयच्या विजयातील महत्त्वाचे क्षण**

भारताच्या २०२२ च्या थॉमस कप विजयात आणि नुकत्याच डेन्मार्कमध्ये मिळवलेल्या कांस्यपदक यशात मोलाची भूमिका बजावणाऱ्या प्रणॉयचा पुढील सामना सिंगापूरचा माजी विश्वविजेता लोह कीन यू याच्याशी होईल.

भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या मिश्र दुहेरी जोडीनेही, आपल्या पहिल्याच सामन्यात मलेशियाच्या वोंग टिएन सी आणि लिम च्यू सिएन यांचा २१-१४, २०-२२, २१-१३ अशा गुणांनी पराभव करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

मात्र, किदाम्बी श्रीकांत आणि मालविका बन्सोड यांना पहिल्या फेरीचा अडथळा पार करता आला नाही. (वृत्तसंस्था)

# राज्यस्तरीय महिला खो-खो, कबड्डी स्पर्धा सोलापुरात आजपासून

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळातर्फे आयोजन

**सोलापूर, २७ मे**

हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने राज्यस्तरीय महिला खो-खो आणि कबड्डी स्पर्धेचे आयोजन २८ ते ३० मे दरम्यान येथील नॉर्थकोट प्रशाला मैदानावर करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र आणि जिल्हा खो-खो व कबड्डी संघटनेच्या मान्यतनेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत प्रत्येकी आठ संघ सहभागी होणार आहेत. दोन्ही स्पर्धांचे मिळून सुमारे ३०० खेळाडू उपस्थित राहणार आहेत. कबड्डी स्पर्धा या सायंकाळच्या सत्रात होतील तर सकाळ व संध्याकाळच्या सत्रात खो-खोचे सामने होणार आहेत. या दोन्ही स्पर्धेसाठी प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास ५१ हजार, ३१ हजार व १५ हजार रुपये आणि स्मृती चषक असे बक्षिसाचे स्वरूप आहे. प्रत्येक तीन वैयक्तिक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विधानसभेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, महापौर विनायक कोंड्याल आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. या स्पर्धेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर आणि उत्सव अध्यक्ष विकी डोंबाळे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस नागेश खरात, अक्षय वाकसे, सचिन हक्के, शंकर नरोटे, अतुल माशाळ, समर्थ मोटे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

# सांघिक ताकदीने बंगळुरू ‘परिपूर्ण संघ’ः बोबट

**धर्मशाला, २७ मे**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची (आरसीबी) सांघिक ताकद त्यांना एक ‘परिपूर्ण संघ’ बनवते, असे प्रतिपादन आरसीबीचे क्रिकेट संचालक मो बोबट यांनी केले.

गतविजेत्या आरसीबी संघाने क्वलिफायर १ सामन्यात गुजरात टायटन्सचा धुव्वा उडवून सलग दुसऱ्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत धडक मारली. त्यांनी आरसीबी संघाच्या यशाचे श्रेय त्यांच्या सामूहिक योगदान व निर्भीड वृत्तीला दिले.


मंगळवारी झालेल्या सामन्यात, आरसीबीने ५ गड्यांच्या मोबदल्यात विशाल २४५ धावांचा डोंगर उभारला आणि त्यानंतर गुजरात टायटन्सला १६२ धावांवर गुंडाळले. आरसीबीने ९२ धावांनी विजय नोंदविला. कर्णधार रजत पाटीदारने ३३ चेंडूंत केलेल्या ९३ धावांच्या (नाबाद) स्फोटक खेळीने आणि गोलंदाजांच्या सांघिक कामगिरीने आरसीबीच्या या विजयात मोलाचा वाटा उचलला. गत दोन हंगामांतील आरसीबीच्या वर्चस्वपूर्ण कामगिरीतून शिकण्यासारखी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दबावाच्या परिस्थितीतही अनेक खेळाडू सातत्याने पुढे येऊन जबाबदारी स्वीकारत आहेत, असे बोबट म्हणाले. आमच्या विजयांमध्ये अनेक खेळाडू योगदान देत आहेत. आम्ही फलंदाजीसाठी केवळ एक-दोन खेळाडूंवर किंवा गोलंदाजीसाठीही केवळ एक-दोन खेळाडूंवर जास्त अवलंबून नाही आहोत. (वृत्तसंस्था)



कोनेरू हम्पीविरुद्ध चाल खेळताना दिव्या देशमुख

# सिनर, गॉफ, ओसाकाची आगेकूच

### फ्रेंच ओपन टेनिस



**पॅरिस, २७ मे**

येथे सुरू असलेल्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत जॅनिक सिनरने शानदार विजय नोंदवित आपली आगेकूच कायम राखली. तसेच महिला गटात आर्यना सबपालेन्का, नाओमी ओसाका व कोको गॉफने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदवून पुढील फेरीत प्रवेश केला.

अव्वल क्रमांकाच्या जॅनिक सिनरने १७१ व्या क्रमांकावरील फ्रेंच वाईल्ड कार्ड खेळाडू क्लेमेंट टॅबुरचा ६-१, ६-३, ६-४ असा धुव्वा उडवला आणि आपल्या टेनिस कारकिर्दीतील एकमेव मोठ्या विजेतेपदाच्या शोधात आपली सलग विजयांची मालिका ३० सामन्यांपर्यंत वाढविली.

स्टिफनोस सितसिपास ६-२, ३-० ने आघाडीवर असताना त्याचा फ्रेंच प्रतिस्पर्धी अलेक्झांद्र मुलरने उजव्या पोटरीला दुखापत झाल्यामुळे माघार घेतली. नववे मानांकित अलेक्झांडर बुब्लिक, जॅन-लेनार्ड स्ट्रफकडून ७-५, ६-७ (६), ६-४, ७-५ ने पराभूत झाला.

**मेदवेदेव लवकर पराभूत**

वाईल्ड कार्डधारी ऑस्ट्रेलियाच्या ॲडम वॉल्टनने रशियाच्या अनुभवी डॅनियल मेदवेदेवचा ६-२, १-६, ६-१, १-६, ६-४ असा पराभव केला. येथे मेदवेदेवचे हे सलग दुसरे आणि चार वर्षांतील तिसरे पहिल्या फेरीतील आव्हान होते.

**कोको गॉफचा किरकोळ अपघात; तरीही मिळविला विजय**

फ्रेंच ओपन विजेतेपदाचे रक्षण करण्यासाठीच्या पहिल्या सामन्यासाठी रोलँड गॅरोसकडे जाताना अमेरिकेच्या कोको गॉफच्या कारला अपघात झाला. या अपघातात तिला कोणतीही दुखापत झाल्याचे दिसून आले नाही. कोको गॉफने आपल्याच देशाची खेळाडू असलेल्या टेलर टाउनसेंडचा ६-४, ६-० अशा फरकाने पराभव केला. दुसरीकडे चार वेळा मेजर विजेतेपद पटकावणाऱ्या नाओमी ओसाकाने लॉरा सीगेमुंडचा ६-३, ७-६ (३) अशा फरकाने पराभव केला. फ्रान्सच्या लोईस बॉइसनला २२ वी मानांकित ॲना कालिन्स्कायाकडून ६-२, ६-२ ने पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

### विजयादरम्यान आर्यना सबालेन्काचा हिऱ्याचा हार उन्हात लखलखला

उष्णतेने व्यापलेल्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीतील विजयादरम्यान बेलारूसच्या आर्यना सबालेन्काचा हिऱ्यांचा हार उन्हात लखलखत होता. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या सबालेन्काने जेसिका बुझास मानेरोविरुद्ध ६-४, ६-२ अशा फरकाने विजय मिळवला. दोन जाड हार परिधान केलेले असूनही, कोर्ट फिलिप-चॅट्रियरवर सबालेन्काची हालचाल अत्यंत चपळ आणि सहज वाटत होती. हे हिरे आहेत; मला त्यांचे वजन फारसे जाणवत नाही, पण बाहेरून पाहताना ते कसे दिसत असतील, याची मी कल्पना करू शकते, असे सबालेंका म्हणाली. चार वेळा मेजर विजेतेपद पटकावणाऱ्या सबालेन्काला गत वर्षीच्या स्पर्धेत कोको गॉफकडून पराभूत होऊन उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



# दिव्या देशमुखचा कोनेरू हम्पीवर विजय

### नॉर्वे बुद्धिबळ

**ओस्लो, २७ मे**

नागपूरची ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुख आपल्या पहिल्याच नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहे. गत वर्षीच्या महिला विश्वचषकात दोन वेळा जागतिक रॅपिड विजेत्या ठरलेल्या कोनेरू हम्पीवर मिळवलेल्या तिच्या अविस्मरणीय विजयाप्रमाणेच, तिने पुन्हा एकदा आर्मागेडन फेरीत या अनुभवी भारतीय खेळाडूवर मात केली. या विजयासह तिने आपला आत्मविश्वास वाढवणारा आणखी एक विजय नोंदविला व ३ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

दरम्यान, कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवा हिने ४.५ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान कायम राखत आपली स्वप्नवत कामगिरी सुरूच ठेवली आहे.

नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे, त्यामुळे हा अनुभव खरोखरच खूप रोमांचक ठरत आहे, असे दिव्या म्हणाली.

**गुकेश, प्रज्ञानंदचा निराशाजनक दिवस**

क्लासिकल प्रकारात आपले आश्वासन पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने डी. गुकेश आर्मागेडॉन फेरीत वेस्ली सो विरुद्ध पराभूत झाला, तर दुसरीकडे जबरदस्त फॉर्मात असलेल्या फ्रेंच खेळाडू अलीरेझा फिरौजाने आर. प्रज्ञानंदवर सहज विजय मिळवत अव्वल स्थान पटकावले. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेतील भारतीयांसाठी हा दुसरा दिवस अत्यंत चुरशीचा ठरला.

गतविजेता मॅग्नस कार्लसेनला जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरने पुन्हा एकदा पराभवाच्या उंबरठ्यावर आणले होते, पण अखेरीस सात वेळच्या या विजेत्याने आर्मागेडॉन प्रकारात विजय मिळविला व आणखी एका कडव्या लढतीनंतर स्पर्धेतील आपले पहिले गुण मिळविले.

गुकेश २.५ गुणांसह सो सोबत संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर कायम आहे, तर फिरौजाने सलग दोन विजय मिळवून सहा गुणांसह आघाडी घेतली आहे. दरम्यान, प्रज्ञानंद व कार्लसेन या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रत्येकी १.५ गुणांसह तळाशी राहिले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### इच्छापूर्ती पदयात्रा सेवाभावी संस्थेतर्फे महेश इंगळे यांचा सन्मान

**अक्कलकोट, दि.२७ मे-**

चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांचा इच्छापूर्ती पदयात्रा सेवाभावी संस्थेच्या वतीने अध्यक्ष सुहास पाटील व सामाजिक कार्यकर्ते सत्यजित कदम यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रारंभी भक्तांकडून महेश इंगळे यांचे औक्षण करून पाकळ्यांची उधळण करत स्वागत करण्यात आले. सुहास पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाची सुरुवात महेश इंगळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते सत्यजित कदम, उद्योजक नितीन वाडीकर, कृपासिंधु चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष संदीप पाटील, करवीर पंचायत समितीचे सदस्य रविंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित हजारो भाविकांच्या वतीने अखंड नामजप, टाळ-मृदुंगाचा निनाद, स्वामी भक्तांची प्रचंड गर्दी आणि श्री स्वामी समर्थ या जयघोषाने परिसर भक्ती रसात न्हाऊन निघाला होता. कार्यक्रमात सामाजिक, सेवाभावी आणि आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी भक्तांचा महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पदयात्रेचे कार्याध्यक्ष सुहास पाटील यांनी महेश इंगळे यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत महेश इंगळे यांनी अक्कलकोट येथील वटवृक्ष देवस्थानाचे महत्त्व, श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अद्भुत लीला, नामस्मरणाची शक्ती आणि भक्तीमधील सातत्य याविषयी अत्यंत हृदयस्पर्शी मार्गदर्शन केले. महिलांनी व पुरुषांनी भजनाच्या तालावर स्वामी नामात तल्लीन होऊन आनंदोत्सव साजरा केला. महेश इंगळे आणि सुहास पाटील यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले. कार्यक्रमामुळे कोल्हापूर परिसरात भक्ती, सेवा आणि अध्यात्माचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाचे नियोजन चोपदार नारायण यादव, मनोज माने, रमेश माने, वेणू सुतार, यशवंत चव्हाण आदींनी केले. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष सुहास पाटील, सामाजिक कार्यकर्ते सत्यजित कदम, रविंद्र पाटील, महेश मालक इंगळे मित्र परिवारातील प्रा.शिवशरण अचलेर, अंकुश केत, ज्ञानेश्वर भोसले, सागर गोंडाळ, श्रीशैल गवंडी, बाळासाहेब एकबोटे, सुनील पवार, सोमनाथ सुतार, सागर गोंडाळ, श्रीकांत झिपरे, मनोज जगताप, विश्वनाथ देवरमनी, कुमार हत्तुरे, कलशेट्टी, विद्याधर गुरव, रमेश शिंदे, सुनिल पवार, काका सुतार, सुरेश वाले, ओमकार उटगे, स्वामीनाथ मुसळे, अमर पाटील, संदीप पंडीत, नामदेव माने उपस्थित होते.

# पंढरपुरात दादा मंडळींवर पोलिसांचा कारवाईचा बडगा

## दहशतीचे वातावरण संपल्याने सामान्य नागरिकांत समाधानाची भावना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ मे-**

शहरात भुरट्यासुरट्या दादामंडळींची तसेच महिलामुलींचीछेड काढणाऱ्या रोडरोमिओंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपसुकच या मंडळींचा त्रास शहरातील महिला व सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. याची दखल येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी घेतली असून रोडरोमिओ व भुरट्यासुरट्या दादामंडळींवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

यामुळे महिला तसेच नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांपासून पंढरपूर शहरामध्ये भुरट्यासुरट्या दादामंडळींनी डोके वर काढले होते.विशेषत: अवैध वाळू चोरुन, बड्या किंमतीच्या गाड्या, चित्रविचित्र गॉंगल्स,शे,दीडशेरुपयांचे शर्ट आणि फाटक्यातुटक्या जिन्स, वेडेवाकड्या कटींग मधील स्वत: एखादा गल्लीतीलडॉंन समजत गब्बर होत असलेल्या तरुणमंडळींकडून कोयत्यांचा वापर करून हाणामारी करण्यास सुरुवात केल्याच्या घटना देखील सातत्याने घडत होत्या. अशा भुरट्यासुरट्या



मंडळींच्या फालतूच्या वागण्यामुळे (कृतीमुळे) शहरातील नागरिकांमध्ये एकप्रकारे दहशतीचे किंवा भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान सध्या अधिक महिना देखील सुरु झालेला आहे. त्यामुळे विठ्ठलाच्यादर्शनाला येणाऱ्या भाविकांची संख्या सुध्दा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासाठी पंढरपुरात शांतता व सुव्यवस्था राहावी, यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी भुरट्यासुरट्या दादामंडळींवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. यामुळे नागरिक भाविक व महिला वर्गातूनसमाधान व्यक्त केले जात आहे. उपविभागीय प्रशांतडगळे यांनी ही कारवाई कायमस्वरूपी सुरू ठेवावी, अशी मागणी शहरातील सर्वसामान्य नागरिकांबरोबरच विशेषत: महिला तसेच तरुण मुलींमधून केली जाऊ लागली आहे.

**रोडरोमिओंना देखील पोलिसी खाक्याचा प्रसाद**

या बरोबरच शहरातील वर्दळीच्या प्रमुख रस्त्यावर किंवा क्लासेसच्याभागात उभा राहून महिला व तरुणींची छेड काढणाऱ्या रोडरोमिओंना देखील येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे आणि त्यांच्या पथकाने पोलिसी खाक्याचा प्रसाद देण्यास सुरुवात केली आहे.

### कायदेशीर देणे रकमेपेक्षा जास्त रकमेचा चेक बाउंस झाल्यास गुन्हा नाही

**कर्जदाराची २० वर्षानंतर निर्दोष मुक्तता**

**सोलापूर, दि. २७ मे-**

कर्जाच्या देणे रकमेपेक्षा जास्त रकमेचा धनादेश कर्जदाराकडून घेऊन तो धनादेश अनादरीत अर्थात बाउन्स झाल्यास कर्जदार आरोपीस शिक्षा देता येणार नसल्याचा महत्वपूर्ण निष्कर्ष प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी.डी.चव्हाण यांनी निकालपत्रातून नोंदवत कर्जदार आरोपी विजय विठ्ठल होमकर (रा. भवानी पेठ) याची निर्दोष मुक्तता केली. आरोपी विजय विठ्ठल होमकर यांनी येथील ललितराज नागरी सहकारी पतसंस्थेतून सन २००१ मध्ये कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या देणे असलेल्या रकमेकरिता होमकर यांनी पतसंस्थेस दिलेल्या रक्कम रु. ३०,२८५/- चा दि. २९/११/२००५ चा धनादेश आरोपीने त्याचे जनता सहकारी बँक, शेळगी शाखेतील खातेच बंद केल्याच्या कारणावरून न वटता पतसंस्थेस परत आला. त्यानंतर पतसंस्थेने कायदेशीर नोटीस देऊनही आरोपी होमकर यांनी चेकची रक्कम पतसंस्थेस दिली नाही. त्यामुळे ललितराज नागरी सहकारी पतसंस्थेचे तत्कालीन चेअरमन दिलीप पतंगे यांनी आरोपीविरुद्ध थेट न्यायालयात २०/०१/२००६ रोजी फिर्याद देऊन आरोपी होमकर यांनी धनादेश देऊन तो न वटविता पतसंस्थेची फसवणूक केल्याचा आरोप केला होता. या खटल्याचा न्यायालयात निकाल होण्यास २० वर्षे, २ महिने, २६ दिवस लागले. आरोपीने देणे असलेल्या कर्जाची रक्कम पाहता धनादेशावरील रक्कम जास्त असल्यामुळे आरोपीने त्याच्या कायदेशीर देण्यापोटी धनादेश दिला असल्याचे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपी विरुद्ध गुन्हा शाबीत होत नसल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकील आल्हाद अंदोरे यांनी केला. तो युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीचा बचाव ॲड.आल्हाद अंदोरे, ॲड.अथर्व अंदोरे, ॲड.सुयश पुळूजकर यांनी केला. तर फिर्यादी पतसंस्थेच्या वतीने ॲड.आजमोद्दीन शेख यांनी काम पाहिले.

# संत तुकाराम महाराज पालखी महामार्गात कोट्यवधींचा भ्रष्टाचार

## स्वाभिमानी संघटनेचा आरोप; काम न करताच ठेकेदाराने लाटली बिले

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ मे-**

संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामात ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठा भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काम पूर्ण न करताच कागदोपत्री काम झाल्याचे दाखवून कोट्यवधी रुपयांची बोगस बिले काढल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे. याबाबत संघटनेच्या वतीने प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या आषाढी वारीची लगबग सुरू असून वारकऱ्यांच्या सोयीसाठी या महामार्गाचे काम निकृष्ट आणि अपूर्ण असतानाही ठेकेदाराने अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून पैसे उचलले आहेत. तरंगवाडी (वेताळबाबा मंदिर): येथे ७०० मीटर रस्त्याचे



डांबरीकरण पूर्ण झाल्याचे दाखवून पैसे लाटले आहेत, मात्र प्रत्यक्ष काम झालेले नाही. या रस्त्यामुळे अनेक अपघातांत नागरिकांना जीव गमवावा लागला असून, शालेय विद्यार्थी जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.

शेळगाव ब्रिज येथील पुलाचे काम १०० टक्के पूर्ण झाल्याचे दाखवून त्याचे पूर्ण पेमेंट उचलले आहे. इंदापूर (पुणे-सोलापूर हायवे) बारामती चौक येथील १६०० मीटर रस्त्याचे काम न करताच ठेकेदाराने पैसे काढले आहेत. अशा अनेक ठिकाणी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचे काम कागदोपत्री दाखवून सरकारी तिजोरीवर डल्ला मारल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संबंधित भ्रष्ट अधिकारी आणि ठेकेदारांवर दोन दिवसांत प्रत्यक्ष स्थळपाहणी करून कडक कारवाई करावी, अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने संबंधित कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते मगन काळे, तालुकाध्यक्ष अजित बोरकर उपस्थित होते.

> दोन दिवसांत या प्रकरणाची दखल घेऊन न्याय मिळाला नाही, तर दोषी अधिकाऱ्यांना काळे फासले जाईल. आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.
> **- अजित बोरकर,** तालुकाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना.

### सोलापुरात वीज चोरी प्रकरण दडपल्याचा आरोप


**कारवाईऐवजी नवीन कनेक्शन दिल्याने संशय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

अक्कलकोट रोडवरील रविवार पेठ परिसरातील स्वप्नशिल्प अपार्टमेंटमध्ये घरगुती वीज पुरवठ्यावरुन थेट दुकानाला वीज पुरवठा करुन मोठ्या प्रमाणात वीज चोरी होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात महावितरणकडे तक्रार करुनही संबंधितांवर कठोर कारवाई न करता उलट नवीन वीज कनेक्शन दिल्याने संशय व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दुकानाला महावितरणचे स्वतंत्र मीटर नव्हते. घरगुती मीटरवरुनच पुर्णपणे कमर्शियल वापरासाठी वीज घेतली जात होती. दुकान मुख्य रस्त्यावर असल्याने हा प्रकार नागरिकांच्या सहज नजरेस पडत होता. याबाबतची माहिती महावितरण कंपनीला दिल्यानंतर कविता नगरी उपविभागातील अभियंता गुरव व इतर कर्मचाऱ्यांनी दि. १२ मे रोजी स्वप्नशिल्प अपार्टमेंट येथे भेट देऊन पाहणी केली होती.

पाहणी दरम्यान संबंधित ठिकाणी तीन ग्राहकांची वीज चोरी आढळून आल्याचे सांगितले जात आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस दंडात्मक कारवाई केलेली नाही. उलट संबंधित ग्राहकाला नवीन अधिकृत वीज कनेक्शन देऊन जागेवर मीटर बसवल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



**कारवाई चालू आहे : गुरव**

महावितरणचे कवितानगरचे कनिष्ठ अभियंता राजशेखर गुरव यांना याबाबत मोबाईलवरुन विचारणा केली असता यावर कारवाई चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

वीज चोरी प्रकरण दाबले का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. परिसरात संबंधित ग्राहकाकडून महावितरण कर्मचाऱ्यांना पैसे देऊन विषय मिटवला असून आमचं कोणी काही बिघडवू शकत नाही, अशा प्रकारची उघड चर्चा होत असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. १५ दिवसांपुर्वी हा प्रकार उघडकीस आला असताना संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करावी, तसेच वीज चोरी प्रकरण दडपण्यामागील नेमके कारण शोधावे, अशी मागणी होत आहे.

### कल्याण नगरात ‘एक्स मिल्ट्रीमॅन’चे घर फोडले

**२२ तोळ्यांच्या दागिन्यांसह साडे १६ लाखांचा ऐवज चोरीस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील २२ तोळे सोन्याच्या दागिन्यासह साडे १६ लाखाचा ऐवज चोरून नेल्याची खळबळजनक घटना मंगळवारी पहाटे सहा वाजता उघडकीस आली. चोरीच्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



याबाबत सेवानिवृत्त मिलिटरी अधिकारी चंद्रकांत शिवबाळा भांजे (वय-६७ वर्ष, रा.कल्याण नगर भाग २, म्हेत्रे टावर जवळ, जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिली असून याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे पुणे येथे मुलीच्या घरी गेले होते. त्यांचा मुलगाही जळगाव येथे नोकरीनिमित्त गेला होता. दरम्यान फिर्यादीची सून ही घरचे काम करून २५ मे रोजी रात्री साडेआठ वाजता घराला कुलूप लावून आईकडे झोपण्यास गेली होती. ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी फिर्यादीच्या बंद घराचा सेफ्टी दरवाजा व मुख्य दरवाज्याचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला. बेडरूममधील कपाटाचे लॉक तोडून आतील १ लाख २० हजाराची रोख रक्कम व बिलवर ,पाटल्या, नेकलेस, लॉंग गंठण, सोनसाखळी, अंगठ्या, झुबे, टॉप्स, वेल असे २२ तोळ्याचे सोन्याचे दागिने मिळून १६ लाख ३९ हजारांचा ऐवज चोरून नेला.

दरम्यान मंगळवारी पहाटे यातील फिर्यादी चंद्रकांत भांजे यांचा मुलगा सोलापुरातील आपल्या घरी आला असता त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता घरातील कपाट फोडून चोरी झाल्याचे लक्षात आले. लागलीच त्यांनी याची माहिती वडील चंद्रकांत भांजे यांना दिली. त्यानंतर फिर्यादी चंद्रकांत भांजे यांनी सोलापुरात येऊन याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार गायकवाड हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### चालत्या रेल्वेतून पडून तरुण प्रवाशाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२७ मे-**

चालत्या रेल्वे गाडीतून पडून एका तीस वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन जवळ घडली. त्याची अद्याप ओळख पटू शकलेली नाही. सदर मयत प्रवासी हा मंगळवार रोजी कर्नाटक एक्सप्रेसने प्रवास करत असताना कुर्डुवाडी जवळ रेल्वेतून पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला कुर्डुवाडीच्या सरकारी दवाखान्यात उपचार करुन कुर्डवाडी लोहमार्गचे सहाय्यक फौजदार एम.एस. पाटील यांनी येथील शासकीय रुग्णालयात २६ मे रोजी दाखल केले होते. मात्र उपचारादरम्यान आज बुधवारी पहाटे दोन वाजता मृत्यू झाला.

### नग्नावस्थेत फिरणाऱ्या मनोयात्रीला मिळाला माणुसकीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर अर्थात छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून एक मनोयात्री अर्धनग्न आणि विद्रूप अवस्थेत फिरत होता. भर उन्हात, धुळीत, भुकेनं व्याकूळ झालेला तो चेहरा अनेकांच्या नजरेस पडत होता; पण भाषेची अडचण, मानसिक अस्थिरता आणि त्याची भयावह अवस्था यामुळे लोक त्याच्यापासून दूर राहत होते. अशावेळी एका कनवाळू व्यक्तीने केलेल्या सत्कृत्यामुळे त्याला माणुसकीचा हात मिळाला आहे.

संबंधित मनोयात्री पोटाच्या भुकेनं बाजारपेठेतील दुकानांसमोर थांबून खाद्यपदार्थांकडे एकटक पाहत असे. अनेकदा भूक आणि मानसिक अस्वस्थतेमुळे तो लोकांच्या अंगावर धावून जात होता. परिसरात महिला, मुली आणि नागरिकांची मोठी वर्दळ असल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली होती. लोकांच्या मनात भीती होती; पण त्या माणसाच्या डोळ्यांत फक्त उपासमार आणि हरवलेपण दिसत होतं.

याच दरम्यान परिसरातील सामाजिक भान जपणारे राजकुमार माने यांनी संभव फाऊंडेशनचे सामाजिक कार्यकर्ते आतिश लक्ष्मण यांच्याशी संपर्क साधून या मनोयात्रीची माहिती दिली. आतिश यांनी तात्काळ त्या व्यक्तीची भेट घेतली. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या त्या माणसाच्या अंगावर मळकट कपडे, विस्कटलेले केस आणि चेहऱ्यावर भीतीचं सावट होतं. लोकांच्या नजरेत तो ‘वेडा’ होता; पण आतिश यांनी त्याच्यातील माणूस शोधण्याचा प्रयत्न केला. शांतपणे संवाद साधत, सुमोउपदेशन करत त्यांनी त्या मनोयात्रीला बोलतं केलं. अनेक दिवस उपाशी असलेल्या त्या व्यक्तीला पोटभर



जेवण दिलं. उघड्या अंगावर कपडे घातले. त्याक्षणी त्याच्या डोळ्यांत दिसलेला समाधानाचा भाव उपस्थितांना अंतर्मुख करून गेला. मात्र प्रश्न इथेच संपणारा नव्हता. त्या मनोयात्रीचं पुढे काय? त्याच्यावर उपचार कोण करणार? त्याला सुरक्षित आसरा कुठे मिळणार? या प्रश्नांनी परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. तेव्हा आतिश लक्ष्मण यांनी अहिल्यानगर येथील स्नेहश्रद्धा मनोरुग्ण पुनर्वसन केंद्र येथे संपर्क साधला. या मनोयात्रीला उपचार आणि पुनर्वसनासाठी दाखल करून घेण्याची विनंती केली. सामाजिक बांधिलकी जपत रमा दोड्डी यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी फौजदार चावडी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांनी आवश्यक ती मदत केली. तर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरविंद माने यांनी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली. या कार्यात सुबोध भुतडा आणि प्रा.रेखा ओव्हाळ यांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. अखेर त्या मनोयात्रीला स्नेहश्रद्धा पुनर्वसन केंद्रात सुरक्षितपणे दाखल करण्यात आले. प्राथमिक संवादात तो तामिळनाडू राज्यातील असल्याचं सांगत आहे. एका अनोळखी राज्यातून भरकटत आलेल्या त्या जीवाला अखेर सोलापूरच्या मातीत माणुसकीचा आधार मिळाला.

> समाजात वाढत चाललेल्या असंवेदनशीलतेच्या काळात सोलापूरमध्ये घडलेली ही घटना माणुसकी अजूनही जिवंत असल्याचं अधोरेखित करते. एका मनोयात्रीला फक्त अन्न आणि कपडेच नाही, तर जगण्याची नवी संधी देण्याचं काम संभव फाऊंडेशन करत आहे.
> **- आतिश लक्ष्मण,** संभव फाऊंडेशन, सोलापूर.

# रेल्वेत नोकरी लावण्याच्या आमिषाने १२ लाखांची फसवणूक

## टी.सी. पदावर नोकरी देतो म्हणत बार्शी, पुणे येथील तिघांकडून मोठा घोटाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मे-**

रेल्वेत टी.सी. पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बार्शी व पुणे येथील तिघांनी संगनमत करून तब्बल ११ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुभाष बाबु डेंगळे (वय ६२, रा. पानगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा चंद्रकांत डेंगळे हा सिव्हील डिप्लोमा शिक्षित आहे. मागील दहा वर्षांपासून ओळख असलेले सुरेंद्र व्ही. कुलकर्णी (झरेगांवकर), रा. ढगे मळा, कुर्डुवाडी रोड, बार्शी यांनी जानेवारी २०२५ मध्ये ङ्गरेल्वेत टी.सी. पदावर नोकरी लावतोङ्ग असे आमिष दाखवले होते.

त्यासाठी सुरुवातीला चंद्रकांतची शैक्षणिक कागदपत्रे घेतल्यानंतर नोकरीसाठी ८ लाख रुपये लागतीलङ्ग असे सांगण्यात आले. त्यापैकी ४ लाख रुपये ॲडव्हान्स स्वरुपात द्यावे लागतील, असे सांगून सुभाष डेंगळे यांच्याकडून टप्प्याटप्प्याने २० मार्च २०२५ पर्यंत ४ लाख रुपये रोख स्वरुपात घेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर सुरेंद्र कुलकर्णी यांनी पुणे येथील संकेत खंडेराव पायगुडे यांच्याशी संपर्क करुन दिला. पुढील सर्व प्रक्रिया संकेत पायगुडे करणार असल्याचे सांगण्यात आले. दोघांकडून वारंवार फोन करुन ङ्गनोकरी निश्चित होणारङ्ग अशी खात्री दिली जात होती. दरम्यान, आणखी दोन जागा उपलब्ध असल्याचे सांगत इतर उमेदवार शोधण्यास सांगण्यात आले. त्यानुसार आजिनाथ नवनाथ मोहिते (रा. रस्तापूर) व रशीद इसामुद्दीन इनामदार (रा. पानगाव) यांनाही रेल्वेत नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले.

एप्रिल २०२५ मध्ये बार्शीतील राणी लक्ष्मीबाई उद्यान येथे बैठक घेऊन प्रत्येकी दोन लाख रुपये ॲडव्हान्स मागण्यात आले. रोख पैसे नको असल्याचे सांगितल्यानंतर पुणे येथील नितीन नागेश मोहिरे यांच्या खउ्रख बँक खात्यावर ठढॠड द्वारे पैसे पाठवण्यास सांगण्यात आले. नितीन मोहिरे हे रेल्वेतील मोठे अधिकारी असून त्यांच्या सहीशिवाय ऑर्डर निघत नाही,ङ्ग असे सांगून विश्वास संपादन करण्यात आला.

त्यावर विश्वास ठेवून आजिनाथ मोहिते यांनी वेळोवेळी ठढॠड द्वारे ३ लाख ८० हजार रुपये पाठवले. तसेच रशीद इनामदार व त्यांचा मुलगा नदीम इनामदार यांनी मिळून ४ लाख रुपये संबंधित खात्यावर जमा केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

दरम्यान, वारंवार विचारणा करुनही नोकरीची ऑर्डर मिळाली नाही. संबंधित आरोपींकडून सतत टाळाटाळ केली जात होती. काही दिवसांनी नितीन मोहिरे यांचा मोबाईल बंद लागण्यास सुरुवात झाली. त्यानंतर तक्रारदारांनी सुरेंद्र कुलकर्णी यांच्याकडे पैसे परत मागितले असता त्यांनी उलट दम दाटी करत मी तुम्हाला ओळखत नाही, कुठे जायचे तिथे जा, अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार सुरेंद्र व्ही. कुलकर्णी (झरेगांवकर), (रा. बार्शी), संकेत खंडेराव पायगुडे, (रा. पुणे), नितीन नागेश मोहिरे, (रा. सदाशिव पेठ, पुणे) या तिघांनी संगनमत करून रेल्वेत नोकरी लावण्याच्या नावाखाली एकूण ११ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फसवणूक प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## निधन वृत्त...

### जलसाबाई पोळ



**जेऊर, दि. २७ मे-**

शेटफळ (ता. करमाळा) येथील जलसाबाई भागवत पोळ (वय ९३) यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील प्रगतशील शेतकरी वसंत पोळ यांच्या त्या मातोश्री होत्या तर मकाई कारखान्याचे माजी संचालक किरण पोळ व उद्योजक वैभव पोळ यांच्या त्या आजी होत्या.

# विनापरवाना ११८ वृक्षतोड करणाऱ्यावर कारवाई करणार

## दोन दिवस सर्वे करून वृक्षतोडीचा पंचनामा पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ मे-**

सोलापूर मनपा हद्दीतील ५४ मीटर रस्त्यालगत असणाऱ्या गट क्रमांक चार मधील वृक्षतोडीचा दै. तरुण भारत चे प्रतिनिधी यांनी उघडकीस आणली. प्रत्यक्ष वृक्ष तोड घटना असता लगेच याची कल्पना मनपा उद्यान प्रमुख व वरिष्ठ अधीकारी यांना देऊन घटनेचा रीतसर पंचनामा व करायदेशीर कार्यवाही करिता पाठपुरावा केला. त्यासोबत पर्यावरण प्रेमी महेश देवकर यांनीही या घटनेचा पाठपुरावा केला. गेल्या दोन दिवसांत उद्यान विभाग प्रमुख कोमल कासीद व मार्गदर्शनाखाली पूर्ण झाला आहे. सदर सर्वे मध्ये एकूण ११८ वृक्ष तोडीची घटना समोर आलेली आहे. यामध्ये लिंब जातीची ११२ झाडे, पिंपळ १,,शमी १,बाभूळ २ झाडे अशी संख्या निदर्शनासा आली आहे. या टीमने अशी पहाणी करून वस्तुनिष्ठ अहवाल पूर्ण केला व वरिष्ठ अधीकारी यांना कळवून कायदेशीर गुन्हा दाखल करणेसाठी सलगरवाडी पोलीस स्टेशनला गेले.

आज सायंकाळी पंचनामा पूर्ण होताच घटनास्थळी भाजपा गटनेते नरेंद्र काळे, उपम हापौर, ज्ञानेश्वरी देवकर व महापालिकेतील इतर अधिकारी वर्ग यांनी भेट दिली व पाहणी केली असता संबंधित घटनेचे गांभीर्य ओळखून नरेंद्र काळे यांनी सहाय्यक उपायुक्त शशिकांत भोसले व आयुक्त डॉ. सचिन उओम्बाशे यांना रीतसर सर्व कल्पना दिली. दोन दिवस उद्यान विभाग मार्फत सुरू असलेल्या मोजणी मध्ये सहाय्यक आयुक्त भोसले यांनी साधी पहाणी केली नसल्याचे खंत व्यक्त केली.सोलापूर शहरात आज पर्यंत एवढी मोठी घटना घडलेली असताना संबंधित अधिकारी

### कायदेशीर बाजू अभ्यास करून गुन्हा दाखल होणार



कालपासून मी या ठिकाणी दोन वेळा एकूण प्रत्यक्ष पहाणी केली आहे. उद्यान प्रमुख काशीद व सहकारी वर्ग इथे व्यवस्थित काम करतोय. बेकायदेशीर व विना परवाना वृक्ष तोडणाऱ्यांना नियमाप्रमाणे कठोरात कठोर शासन होईपर्यंत शांत बसणार नाही.

– **ज्ञानेश्वरी देवकर**, उपमहापौर

सोलापूरात एव्हड्या मोठया प्रमाणात वृक्ष तोडीची घटना मी पहिल्यांदाच पहातोय. वरिष्ठ अधिकारी यांनी घटना गांभीर्याने घेणे आहेंत. सरकारी वकील यांचा सल्ला घेऊन संबधितावर कठोरात कठोर कार्यवाही साठी सूचना दिल्या आहेंत. तोडलेल्या झाडाची लाकडे मनपा उद्यान विभागास जप्त करणेस सूचना दिल्यात. असा प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी सर्व बाबींचा अभ्यास करून गुन्हा नोंद होईल.

– **नरेंद्र काळे**, गटनेते भाजपा

# स्वा. सावरकरांची जन्मठेप हा न्यायाचा खूनच





– **ॲड. धनंजय माने**
अध्यक्ष,अधिवक्ता परिषद सोलापूर
मोबा. ९८२२२८२९२५

**स्वा**तंत्र्यवीर सावरकरांचा ब्रिटिश राजसत्तेने धसकाच घेतला होता. कोणत्याही परिस्थितीत त्यांना जन्मभर जेलमध्ये खितपत टाकायचे असे ब्रिटिश राजसत्येने ठरवलेलेच होते. सावरकरांविरुद्ध चाललेला खटला, हे खटल्याचे नाटकच होते. त्यांना दिलेली काळ्यापाण्याची शिक्षा हा एक जुडिशिअल मर्डरच आहे, न्यायाची हत्याच होती. ब्रिटिश न्यायव्यवस्थेचे अनेक जण कौतुक करतात. ब्रिटिश न्यायाधीश बुद्धिमान व निपक्ष:पाती होते अशी स्तुतिसूमने केली जातात. परंतु ब्रिटिश न्यायव्यवस्था ही डबल स्टँडर्ड होती. जे जे त्यांच्या सत्तेला विरोध करत होते असे क्रांतिकारी यांच्याबाबत ती पूर्णपणे ब्रिटीश राजसत्तेच्या बाजूने कललेली होती. आपल्या ब्रिटीश साम्राज्याला सुरुंग लावणाऱ्या क्रांतिकारकांना एकतर फासाला लटकवायचे अगर आयुष्यभर जेलमध्ये खितपत ठेवायचे अशी त्यांची कुटील निती होती. सर्व भारतीय समाजाला भितीच्या वातावरणात ठेवायचे, दहशतवादी वातावरण निर्माण करून भारतीय स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकायची हा कुटील हेतू ब्रिटिश राज्यकर्त्यांनी न्याय व्यवस्थेच्या माध्यमातुन पध्दतशीरपणे साध्य केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले 'माझी जन्मठेप' हे पुस्तक वाचताना लहानपणी मी रडत असायचो. अजूनसुद्धा ते पुस्तक वाचताना डोळ्यात अश्रू येतात. सन २००९ मध्ये आमचे मित्र अनिल पंधे यांनी आमच्या सर्व मित्रांना अंदमानला येण्याचे आमंत्रण दिले होते, त्याप्रमाणे मी, ज्येष्ठ विधीज्ञ विजय मराठे, तात्यासाहेब नेर्लेकर, कै.एस के. जहागीरदार, भगवानराव वैद्य असे आम्ही सर्वजण अंदमानला गेलो होतो. अंदमान सेल्युलर जेलमधील १२३ नंबरच्या सावरकरांच्या कोठडीत जाऊन त्या कोठडीला वंदन करून, तेथील माती कपाळाला लावायची तीव्र इच्छा होती त्याप्रमाणे आम्ही तेथे गेलो. कोठडीचे दर्शन घेतले, कोठडी नव्हे तर ते माझ्या मनातले मंदिरच होते. रात्री लाईट अँड साऊंड शो होता, तो शो बघताना प्रत्येकजण रडत होता. ब्रिटिश एवढे हरामखोर व क्रुर होते की सावरकरांना त्यांनी ज्या कोठडीत ठेवले होते. ती कोठडी फाशी गेटच्या समोर होती. जेणेकरून सावरकरांना फाशी देत असलेल्या घटनेचे दृश्य त्यांना दिसावे व त्यांची मन:स्थिती बिघडावी. अशा परिस्थितीतही सावरकरांना काव्य सुचले व त्यांनी ते भिंतीवर कोरले.

देशद्रोहाच्या आरोपावरुन सावरकरांना ताब्यात घेऊन भारतात घेऊन जाण्यासाठी निघालेली बोट दिनांक ०८ जुलै १९१० रोजी मार्सेलीस बंदरामध्ये पोहोचली. जीवाची पर्वा न करता सावरकरांनी बोटीतील स्वच्छतागुहाच्या खिडकीतुन समुद्रात उडी घेतली. ती ऐतिहासिक उडी घेतल्याचे पहारेकरांच्या लक्षात आले. त्यावेळी पहारेकऱ्यांनी आरडाओरडा चालू केला. बोटीवर एकच गडबड व धावपळ उडाली. पहारेकऱ्यांनी सावरकरांवर पिस्तुलाच्या गोळ्याचा वर्षाव चालू केला. त्यावेळी श्वास रोखून पाण्याखालून पोहून सावरकर किनाऱ्यावर पोहोचले व तटावर सरासरा चढू लागले. परंतु घसरुन खाली पडले. पुन्हा त्यांनी पुन्हा दुसऱ्या प्रयत्नात त्यांनी तटसर केला. ते पळत सुटले. तोपर्यंत पहारेकरी बंदरावर येऊन पोहोचले होते. पहारेकऱ्यांनी त्यांचा पाठलाग चालू केला. जिवाचे रान करून सावरकर पळत होते. त्यांनी रस्त्यावर असलेल्या एका फ्रेंच पोलिसाचा हात पकडला व त्यांना नजीकच्या पोलीस ठाण्यावर येऊन चला अशी विनंती केली. तोपर्यंत सावरकरांना धरायला आलेल्या पहारेकऱ्यांनी सावरकरांना पकडले व धक्के देत ओढीत सावरकरांना परत बोटीवर घेऊन गेले. ब्रिटिश पहारेकऱ्यांनी फ्रान्सच्या परकीय भूमीवर सावरकरांना अटक केली. ते कृत्य पूर्णपणे बेकायदेशीर होते. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात होते. फ्रेंच पोलिस आयुक्त बोटीवर आले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व आयुक्तांनी संगनमताने सावरकरांना भारतात पाठवले. त्या दिवशीची सावरकरांची ती उडी जगभर गाजली. सर्व युरोपियन वृत्तपत्रांनी मोठ्या मथळयाखाली याबाबत बातम्या दिल्या.

दिनांक २२ जुलै २०१० रोजी सावरकरांना घेऊन येणारी बोट मुंबई बंदरात पोहोचली. ब्रिटिशांनी सावरकरांचा एवढा धसका घेतला होता की, नंग्या तलवारी घेतलेल्या पहारेकऱ्यांच्या रांगेतून सावरकरांना एका बंद मोटारीपाशी नेण्यात आले. त्या मोटारीतून रेल्वे स्टेशनवर नेऊन खास आगगाडीच्या बंद डब्यातून नाशिकला नेले. जोसेफ बॅप्टिस्टा वकिलांनी त्यांची तुरुंगात भेट घेतली. फ्रान्स भूमीवर सावरकरांना केलेली अटक चुकीची आहे, त्यांना बेकायदेशीररित्या अटक करून भारतात पाठवले या बेकायदेशीर कृत्याबद्दल प्रामाणिक इंग्रज लोकांनी ब्रिटीश सरकारचा निषेध केला. जस्टीस या वर्तमानपत्रात हिंडनमन यांनी लिहिले आहे की सावरकरांवर मुंबईला खटला भरण्यात आलेला आहे. राजकीय अपराध केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. त्यांच्यावर भरण्यात आलेला खटला जर ब्रिटनमध्ये चालला असता तर त्यांना त्यांच्या बचावाची नीट व्यवस्था झाली असती,लोकमताचा योग्य तो प्रभाव पडला असता आणि त्यांना तेथील ब्रिटनमधील न्यायालयाकडून वाजवी न्याय मिळाला असता. पण असे घडू नये म्हणून ब्रिटीश राज्यकर्त्यांनी सावरकरांची भारतात रवानगी केले आहे. ते दोषी नसले, निर्दोषही असले तरीही त्यांना हिंदुस्तान सरकार त्यांच्या अंकित असलेल्या ब्रिटिश न्यायव्यवस्थेकडून अपराधी ठरवतील. तसे करता यावे हा त्यांच्या हिंदुस्थानात पाठवण्यामागचा दृष्ट हेतु आहे. दिनांक ०१ जुलै १९१० रोजी लॉर्ड मोर्ले यांनी तेथील पार्लमेंटमध्ये याबाबत तक्रार केली.

भारतातील सरकारने सावरकरांविरुद्ध खटला भरण्याआधी आवश्यक त्या तरतुदी पाळल्या पाहिजेत असा हिंदुस्तान सरकारला आदेश देण्याचा आपला मनोदय बोलून दाखवला. हे कळताच मुंबईचे राज्यपाल जॉर्ज क्लार्क याला धक्का बसला. सावरकरांवर मुंबईत खटला भरावा की नाही या मुद्द्यावर मुंबईचा राज्यपालांवर लंडनमधील भारतमंत्र्याचे कार्यालय यांच्यात पुष्कळ संपर्क झाले. खटला भरण्यात विलंब झाला तर धोक्याचे ठरेल असे मुंबई सरकारने कळवून सावरकरांविरुद्ध खटला भरण्याचा आदेश दिनांक ३१ ऑगस्ट १९१० रोजी मुंबई सरकारला तारेने कळवला.

सावरकरांवरील खटला नियमित न्यायालयापुढे न चालता त्यासाठी खटला चालवण्यासाठी एक विशेष न्यायमंडळ स्थापन करण्यात आले. प्रचलित प्रथेप्रमाणे ज्युरींची नेमणुक करण्यात आली नव्हती. खटल्याच्या निर्णयाविरुद्ध अपिल करण्याची सवलत ठेवली नव्हती. अपिलाचा हक्क काढून घेण्यात आला होता. या न्याय मंडळावर मुंबईचे प्रमुख न्यायमूर्ती सर बेसिस स्कॉट, सर ना. ग. चंदावरकर आणि न्यायमूर्ती हिटन यांची नेमणूक करण्यात आली होती. सरकारतर्फे मुंबईचे ॲडव्होकेट जनरल जॉर्डिंग, वेल्डन, वेलिणकर आणि सरकारी वकील निकल्सन यांची फौज सरकारने उभी केली होती. तर जोसेफ बॅप्टिस्टा, चित्रे गोविंदराव गाडगीळ आणि रांगणेकर हे आरोपीतर्फे काम पाहत होते. न्याय मंडळापुढे एकूण तीन खटले चालणार होते. पहिल्या खटल्यात सावरकरांसकट ३८ आरोपी होते दुसऱ्या खटल्यात सावरकर व गोपाळराव पाटणकर हे दोन आरोपी होते आणि तिसऱ्या खटला एकटया सावरकरांवर भरण्यात आला होता. दिनांक १५ सप्टेंबर १९१९ रोजी खटल्याचे कामकाज सुरू झाले. न्यायालयाभोवती ५० सशस्त्र पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला होता. सरकारने सावरकरांची एवढी धडकी घेतली होती की, मुंबईचा पोलीस आयुक्त जातीने स्वतः उपस्थित राहीला होता. कडक बंदोबस्तात सावरकरांना न्यायालयात आणले जात होते. सावरकरांनी न्यायालयापुढे निवेदन दिले की मला आंतरराष्ट्रीय निर्बंधाप्रमाणे फ्रेंच सरकारकडून आसरा मिळण्याचा आणि फ्रिज निर्बंधाचे संरक्षण मागण्याचा हक्क आहे. माझ्यावर खटला चालविण्याचा हिंदुस्तान सरकारला अधिकार नाही. मी फ्रान्सच्या स्वाधीन झालो होतो त्यामुळे या सरकारला माझ्यावर खटला चालवण्याचा अधिकार उरला नाही त्यामुळे मी या खटल्यात कोणताही भाग घेऊ इच्छित नाही.

सावरकरांना झालेली अटक ही बेकायदेशीर होती. या एकाच मुद्द्यावरून सावरकरांविरुध्दचा खटला हा फेटाळून लावण्यात यायला पाहिजे होता. सावरकरांवरील खटला हे एक नाटकच होते. न्यायाधीशांनी त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा देण्याचे आधीच ठरवले होते. अखेर दिनांक २३ सप्टेंबर १९१० रोजी त्या पक्षपाती न्याय मंडळांनी सावरकरांना काळ्यापाण्याची जन्मठेप शिक्षा दिली. हा निकाल ऐकताच भर न्यायालयात सावरकरांनी स्वातंत्र्य लक्ष्मी की जय अशी गर्जना दिली. न्यायाधिश चकीत होऊन पाहु लागले. पोलीस हत्यारे घेऊन पुढे सरसावले. एखाद्या राजपुत्राला शोभेशा रुबाबात कडक पोलीस बंदोबस्तात स्थिर पावलांनी सावरकर न्यायालयाच्या बाहेर पडले.

सावरकरांना एका जन्मठेपेची शिक्षा ठोठावुन लॉर्ड हार्डिंज व लॉर्ड सिडेनहॅमचे मुंबई सरकारचे समाधान झाले नव्हते. नाशिकमध्ये झालेल्या जॉक्सनच्या खुनात सहाय्य केल्याचा आरोप ठेवुन सावरकरांवर दुसरा खटला भरला. २५ वर्षांची ते जन्मठेप भोगुनही सावरकर पुन्हा परत येथील अशी सरकारला भिती वाटत होती. पुर्वीच्याच न्यायमंडळापुढे हा दुसरा खटला दिनांक २३ जानेवारी १९११ रोजी सुरु झाला व ७ दिवसात संपुन दिनांक ३० जानेवारी १९११ रोजी त्याच न्यायमंडळाने सावरकरांना आणखी एक जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. खटला म्हणजे एकतर्फी नाटकच होते. दोन जन्मठेपांची अभुतपूर्व शिक्षा!! दोन जन्मठेप ही शिक्षा ऐकल्यावर स्वां.सावरकर मिस्किलपणे म्हणाले..ब्रिटिश सरकार माझा हिंदधर्म मानते.हिंदुधर्मातील पूर्नजन्मावर त्यांचा विश्वास आहे. पन्नास वर्षानंतर मुक्तता ! जगाच्या राजकीय इतिहासात न भुतो न भविष्यती असा अजोड उच्चांक. वाचक हो या खटल्याची निकालपत्रे कोठेही प्रसिध्द करण्यात आली नाही. जगाच्या पाठीवर पहिल्यांदाच असे घडले होते. दोन्ही खटल्याचा निकाल एकतर्फीच होता. फ्रेंच भूमीवर सावरकरांना बेकायदेशीररित्या अटक करण्यात आली. याची दखल घेण्याची त्या न्याय मंडळाला गरज भासली नाही. सावरकरांना भारतात आणण्यासाठी काढण्यात आलेला आदेश हा बेकादेशीर होता ही बाब देखील न्यायमर्तिंनी विचारात घेतली नाही. हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात सावरकरांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानादेखील हिंदुस्थानातील न्यायमंडळाने सावरकरांना ५० वर्षाच्या काळया पाण्याची रानटी शिक्षा दिली.

साम्राज्यवादाच्या दडपणाखाली असलेल्या न्यायव्यवस्थेने कोणतीही न्यायबुद्धी न वापरता सावरकरांना जी शिक्षा दिली तो एक जुडिशिअल मर्डरच होता, न्यायाचा खूनच होता. वाचक हो फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांनी माफी मागुन सावरकरांना आम्ही ब्रिटिश पोलिसांच्या ताब्यात दिले ही फार मोठी आमच्याकडून चूक झालेली आहे त्याबद्दल आम्ही जाहीर माफी मागतो असे तेथील पार्लमेंटमध्ये निवेदन दिले व जाहीर माफी मागितली. तशीच माफी ब्रिटिश सरकारने मागावी असेच माझ्यासारख्या असंख्य राष्ट्रभक्तांची मागणी आहे. सरकारने याबाबत कार्यवाही चालू करावी ही काळाची गरज आहे. जयंतीनिमित्त वीर सावरकरांना विनम्र अभिवादन!



# वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्काराने महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखेचा पुण्यात सन्मान

### शानदार पुरस्कार सोहळ्याला सोलापूरकरांची हजेरी

### सोलापूरच्या अश्विनी चव्हाण यांना उत्कृष्ठ कार्यकर्ता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

आद्य साहित्य संस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने जाहिर करण्यात आलेल्या राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून सोलापूरच्या महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण शाखेला गौरवण्यात आले.

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात मंगळवार दि. २६ मे रोजी झालेल्या या शानदार सोहळ्यात ज्येष्ठ सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते तर ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक ऋषिकेश जोशी, संगीतकार पं.सत्यशील देशपांडे, मसाप पुणे चे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मसाप दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष अमोल धाबळे यांनी पुरस्कार स्विकारला. यावेळी अविनाश महागांवकर, नगरसेवक सात्विक बडवे, सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, श्रुती वडकबाळकर, ॲड. जे.जे. कुलकर्णी यांच्यासह राज्यभरातील साहित्यिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

गेल्या १२० वर्षापासून मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धन करत अनेक अनेक थोर लेखक, साहित्यिक यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे ही संस्था संपूर्ण देशात नावारुपाला आणली. संपूर्ण राज्यात तसेच देशात आणि परदेशातही महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखांचा विस्तार झालेला आहे. त्यातच सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक शाखा आहेत. या सर्व शाखांमधून अनेक चांगले उपक्रमाचे आयोजन करण्यात येवून मराठी साहित्य आणि संस्कृतीचे जतन केले जात आहे. परिषदेच्या १२१ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने दरवर्षी अनेक पुरस्काराचे वितरण होते त्याच अनुषंगाने यंदाच्या वर्षीचा राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे वैशिष्ट्यपूर्ण शाखेचा पुरस्कार सोलापूरच्या दक्षिण शाखेला जाहिर करण्यात आला.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरकडून कार्यक्रमाचे नेटके नियोजन, शिस्तबध्दता, तेच तेच पणा न आणता विविधता आणून प्रत्येकवेळी नवनवीन संकल्पना राबवणे, जास्तीत जास्त आणि नवनवे प्रेक्षकांपर्यत कार्यक्रम पाहोचवणे, पारंपारिक पध्दती सोबतच आधुनिकतेचा समावेश करणे, कार्यक्रमाचे आयोजन करताना वेळेचे योग्य नियोजन आणि दिलेल्या वेळेतच कार्यक्रम सुरू करून समारोप करण्याची परंपरा, वर्षभरात राबवलेल्या कार्यक्रमाचे अवलोकन करून वेळोवेळी त्याचा हिशोब, ऑडीट आणि अहवाल तयार करून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्याकडे वेळेत पाठवणे, या सर्व महत्वाच्या गोष्टीचा विचार करून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवड समितीने दक्षिण सोलापूर शाखेला वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कारासाठी निवड केली.

नेहमी विविध वैशिष्ठपूर्ण उपक्रम राबवण्यासाठी शाखेचे अध्यक्ष रेणुका महागांवकर यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष प्रा,दीपक देशपांडे, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर, कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर यांच्यासह दक्षिण शाखेचे सर्व पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

दि. २६ मे रोजी बालगंधर्व रंग मंदिरात वार्षिक ग्रंथ व विशेष ग्रंथकार पुरस्कार प्रदान सोहळा, मसाप जीवन गौरव व डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करून पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील विविध साहित्यिक आणि संस्थांचा गौरव यावेळी करण्यात आला.

सोलापूरच्या अशविनी चव्हाण यांचा उत्कृष्ठ कार्यकर्ता म्हणून पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. रोख रक्कम आणि स्मृती चिन्ह असे सर्व पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्कार सोहळ्यासाठी सोलापूरमधून अनेकजणांनी हजेरी लावलेली होती.

यावेळी अंजली कुलकर्णी, डॉ.आशुतोष जावडेकर, प्रमुख कार्यवाह सुनील महाजन सुनेत्रा मंकणी प्रसाद मिरासदार, प्रा. माधव राजगुरू डॉ. नीतीन संगमनेरकर,विभागिय कार्यवाह डॉ. संजीव गिरासे, जयंत येलूलकर यांच्यासह पदाधिकारी कार्यकारी मंडळ व मसाप पुणे परिवार मोठ्यासंख्येने उपस्थित होता.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये लातूर शहरात मुलांचे ६ तर मुलींचे ४ वसतिगृह; औसा, निलंगा, उदगीर, देवणी व चाकूर येथे प्रत्येकी मुलांचे १ व मुलींचे १; अहमदपूर येथे मुलांचे २ व मुलींचे २; तर रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह कार्यरत आहे. या सर्व वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यासाठी हींींि://हारी.ारहरळीं.ीस या लिंकचा वापर करावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

या प्रवेश प्रक्रियेत जिल्ह्यात इयत्ता आठवी व अकरावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या, तसेच बिगर व्यावसायिक पदवी, पदविका (डिप्लोमा) प्रथम वर्षात आणि पदव्युत्तर प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) प्रवेश अर्ज भरता येईल. याशिवाय थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना (इयत्ता ८ वी) ३० जून, २०२६ पर्यंत, तर कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १५ जुलै, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.



## विविध वृत्त...

### महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा रविवारी

## लातूर शहरातील ९ परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ मे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे रविवार, ३१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ आयोजित करण्यात आली असून, या परीक्षेच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लातूर शहरातील परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये शहरातील ९ परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरामध्ये हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ अशा दोन सत्रांमध्ये पार पडणार असून हे आदेश परीक्षेच्या दिवशी सकाळी ०८.०० वाजेपासून ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत लागू राहतील. या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थीं व्यतिरिक्त ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरीत्या प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवावी लागणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास, शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास आणि कोणत्याही अनाधिकृत व्यक्ती वा वाहनास प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल. याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हे प्रतिबंधात्मक आदेश परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थींवर निगराणी ठेवणारे पर्यवेक्षक आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या परीक्षाविषयक कर्तव्याच्या अनुषंगाने लागू असणार नाहीत.

लातूर शहरातील नांदेड रोडवरील यशवंत विद्यालय, खाडगाव रोडवरील सरस्वती विद्यालय, नांदेड रोडवरील जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगरमधील परिमल माध्यमिक विद्यालय, दयाराम रोडवरील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, सरस्वती कॉलनीतील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शाहू चौकातील ज्ञानेश्र्वर विद्यालय, नंदी स्टॉप येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आणि श्याम नगरमधील श्री केशवराज विद्यालय येथे परीक्षा होणार आहे.

## प्रशासनास अंधारात ठेवून चालू असलेली अवैध मुरूम चोरी तात्काळ थांबवावी : विवेक साळुंके



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : प्रशासनास अंधारात ठेवून शिरूर अनंतपाळ तालुक्यातील भिंगोली येथील शासकीय जमिनीवरील अवैधरित्या चालू असलेली मुरूम चोरी तात्काळ थांबवावी व या प्रकरणातील दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विवेक माधवराव साळुंके यांनी एका लेखी निवेदनाद्वारे तहसिलदारांकडे केली आहे.

शिरूर अनंतपाळच्या तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात विवेक साळुंके यांनी पुढे असे नमूद केले आहे की, भिंगोळी येथील शासकीय जमिनीवरील वृक्षांची विनापरवाना तोड करून तेथील हजारो ब्रास मुरूम चोरी केली जात आहे. मुरूम उत्खननामुळे पर्यावरणाचाही मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. या अवैध मुरूम चोरीसंदर्भात संबंधित तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी,तहसीलदार यांच्याशी संपर्क साधला असता कोणाकडूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. उघड उघड मुरुमांचा उपसा केला जात असतानाही प्रशासन या बाबींपासून एवढे अनभिज्ञ असल्याचे का दाखवत आहे ? असाही प्रश्र्न निर्माण होत आहे. संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ गांभीर्याने दखल घेऊन सखोल चौकशी करावी. यात दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदरील मुरूम चोरी करणाऱ्यांकडून रॉयल्टी वसूल करून शासनाची होणारी लूट थांबवावी.

हा प्रकार तात्काळ बंद नाही झाल्यास तहसील कार्यालयावर आंदोलन करण्याचा इशाराही विवेक साळुंके यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति त्यांनी पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले, जिल्हाधिकारी, निलंगा उपविभागीय अधिकाऱ्यांनाही पाठविल्या आहेत.

## बाभळगाव येथे लोकनेते विलासरावजी देशमुख यांची जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : कै. दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाबळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विठ्ठल मुळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब देशमुख, हिंदी विभाग प्रमुख डॉ. रणजीत जाधव, इतिहास विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र देशमुख, ग्रंथपाल महावीर कटके, वसंत मस्के, राजकुमार कांबळे, प्रकाश मेहकर, हणमंत शिंदे, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, बालाजी देशमुख, नितीन पाटील यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

# घरभाडे थकवले, नगर सेविकाच्या परिवारास दिला न्यायालयाने दणका

## घरमालकाला पोलिस संरक्षण देऊन घरचा ताबा घेण्याचे आदेश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : गतकाही वर्षांपासून लातूर शहरात खुला प्लॉट किंवा घरावर अनाधिकृत कब्जा करण्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. यामुळे अनेक मालमत्ताधारक भयभीत झालेले असतानाच चक्क लोकप्रतिनिधी कडूनच घरावर कब्जा केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. घटना अशी की प्रमोद देशमुख (घरमालक) यांनी त्यांची मालमत्ता अंकित नंदकिशोर बाहेती (नगरसेविका प्रभाग क्र. १६ यांचे पती) यांना लिव्ह अँड लायसेन्स स्वरूपात दिली. तद्नंतर भाडेकरू यांनी घरभाडे देण्यास नकार केला असून घर देखील खाली करण्यास मनाई केली. त्यामुळे घरमालक प्रमोद देशमुख यांनी संभाजीनगर येथे भाडेकरू विरुद्ध अँड. पुष्कर ओमप्रकाश मालपाणी यांच्या मार्फत दावा दाखल केला.

याप्रकरणी मिस्टर नगरसेवकाला न्यायालयाने दणका दिलेला असून पोलिस संरक्षणात घरमालकाला घराचा ताबा देऊन तात्काळ थकीत घरभाडे द्यावे असे आदेश देण्यात आलेले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार भाडेकरू यांना जुलै २०२५ पासून डबल भाडे देण्याचे सांगितले आहे.

प्रभाग १६ मधील एका इमारतीत प्रमोद चंद्रसेन देशमुख यांचा स्वमालकीचा फ्लॅट आहे. सदर फ्लॅट काही महिण्यापूर्वी मिस्टर नगरसेवकाला भाड्याने दिलेला आहे. काही महिने वेळेवर भाडे देऊन त्या मिस्टर नगरसेवकाने घरमालकाचा विश्र्वास मिळवलेला होता. मात्र यानंतर मिस्टर नगरसेवकाने घरभाडे देण्यास टाळाटाळ करत घरमालक प्रमोद देशमुख यांच्याशी संपर्कही केला नाही. तसेच घरमालकाने संपर्क केल्यास फोन न उचलने किंवा आपण बाहेर गावी आहेत असे बहाणे सांगण्यास सुरु केले.

या बाबीला कंटाळून घरमालकाने घर खाली करण्याबाबत मिस्टर नगरसेवकाला सांगितले. मात्र त्याला ही या मिस्टर नगरसेवकाने थारा दिला नाही. या सर्व बाबींना कंटाळून घरमालक प्रमोद देशमुख यांनी न्यायालयात म्हणजेच भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, छत्रपती संभाजी नगर विभाग येथे धाव घेतली. याप्रकरणी न्यायालयाने घरमालकाला दिलासा देत सदर घर मिस्टर नगरसेवकाच्या ताब्यातून पोलिस बंदोबस्तात खाली करुन घ्यावे असे निर्देश देत घरमालक प्रमोद देशमुख यांना मिस्टर नगरसेवकाने तात्काळ दंडासहित थकीत घर भाडे द्यावे असे आदेशीत केले आहे.

याप्रकरणी आता काय कार्यवाही होणार याकडे लक्ष लागलेले असून लोकप्रतिनिधींनी किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून अशा प्रकारची वागणुक योग्य आहे का असा प्रश्र्न उपस्थित होत असून लोकप्रतिनिधींकडून सर्वसामान्य जनतेने काय अपेक्षा करावयात याबाबतही लोकप्रतिनिधींनी चिंतन करणे आवश्यक असल्याची चर्चा होत आहे.

## लातूर पॅटर्नच्या बदनामीचे षड्यंत्र खपवून घेणार नाही अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूरमध्ये झाली व्यापक चिंतन बैठक



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : लातूर पॅटर्न हा विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संस्थाचालक या सर्व घटकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक घडवलेला आहे. नीट पेपरफुटीच्या प्रकरणात एखाद्याने चूक केली म्हणून संपूर्ण लातूर पॅटर्नच्या लौकिकाला धक्का लागला आहे, असे समजण्याचे काही कारण नाही. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असून विषय न्यायप्रविष्ट आहे. यात जे कोणी दोषी असतील त्यांना कायद्याने कडक शिक्षा होईलच; परंतु तत्कालिक राजकीय फायद्यासाठी लातूरच्या लौकिकाला धक्का पोहोचेल अशी वक्तव्ये कोणीही करू नयेत. संकटसमयी आम्ही लातूरमधील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि स्थानिक व्यावसायिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा स्पष्ट व ठाम विश्र्वास आ. अमित देशमुख यांनी दिला.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणानंतर ट्युशन एरियातील ट्यूशन क्लासेसच चालक, हॉस्टेलचालक, विविध व्यवसायिक विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेले भीती व संभ्रमाचे वातावरण दूर करण्यासाठी दि.

२६ मे रोजी सायंकाळी लातूर शहरातील अष्टविनायक मंदिराशेजारील गणेश हॉल (उद्योग भवन परिसर) येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने एका व्यापक चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे मुख्य नेतृत्व आमदार अमित देशमुख यांनी केले. या वेळी त्यांनी ट्युशन क्लास, वसतिगृहे, झेरॉक्स व पुस्तक दुकाने, अभ्यासिकांचे चालक व मालक तसेच इतर संबंधित घटकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या.

बैठकीत उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातूरमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रामाणिक आणि कष्टाळू आहेत. नीटची परीक्षा रद्द झाली किंवा पुनर्परीक्षा होणार म्हणून विद्यार्थ्यांनी अजिबात घाबरण्याचे कारण नाही. त्यांनी शांत राहून आणि पूर्ण आत्मविश्र्वासाने परीक्षेला सामोरे जावे, त्यांना नक्कीच यश मिळेल. तसेच, आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी लातूरला पाठवण्याची इच्छा बाळगून असलेल्या बाहेरील जिल्ह्यातील पालकांनीही पूर्णपणे निर्धास्त राहावे; विद्यार्थ्यांच्या भवितव्याला कोणतीही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी प्रत्येक लातूरकर घेईल. लातूर हे शहरातील व्यावसायिक आणि ट्यूशन चालकांना धीर देताना आमदार अमित देशमुख यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला. उद्योग भवन असेल किंवा शहरातला इतर कुठलाही भाग, जर व्यावसायिक किंवा नागरिकांकडून काही तांत्रिक अनियमितता घडल्या असतील, तर शासकीय यंत्रणांनी त्या नियमानुसार दुरुस्त करून घ्याव्यात, त्यासाठी नागरिकांना वेठीस धरू नये. कायद्याच्या चौकटीत राहून व्यवसाय करणाऱ्यांना कुठल्याही यंत्रणेने विनाकारण त्रास दिल्यास ते प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. लातूरचा शैक्षणिक केंद्र म्हणून अधिक विस्तार करण्यासाठी आगामी काळात येथे आणखी सोयी-सुविधा निर्माण केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्वांचे आभार प्रा. विकास कदम यांनी मानले. लातूरचे शैक्षणिक वैभव आणि हित जपण्यासाठी सर्वांनी संघटित राहण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## धुळे ते बाभळगाव पदयात्रा करून सूर्यवंशी यांनी वाहिली विलासरावजींना आदरांजली



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्याप्रती असलेली अथांग श्रद्धा व्यक्त करण्यासाठी धुळे येथील हेमंत सूर्यवंशी यांनी धुळे ते बाभळगाव (ता. लातूर) अशी शेकडो किलोमीटरची पायी पदयात्रा पूर्ण केली.

मंगळवारी सकाळी बाभळगाव येथील विलासबागेत पोहोचून सूर्यवंशी यांनी लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतीस्थळी अत्यंत भावपूर्ण वातावरणात अभिवादन केले.

हेमंत सूर्यवंशी यांनी पायी पदयात्रा करून बाभळगाव गाठल्याची माहिती मिळताच, आ. अमित देशमुख यांनी सूर्यवंशी यांची बाभळगाव येथील निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेतली. लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रती सूर्यवंशी यांनी व्यक्त केलेल्या या अनोख्या आणि निस्सीम भावनांचा आदर करत आमदार अमित देशमुख यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.

या प्रसंगी आमदार अमित देशमुख यांनी हेमंत सूर्यवंशी यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सन्मान केला. तसेच एवढ्या मोठ्या प्रवासाच्या पार्श्र्वभूमीवर त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करत काळजी घेण्याचे सुचवले. या प्रसंगी बाभळगाव निवासस्थानी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त पोद्दार हॉस्पिटलमध्ये अस्थिरोग शिबिरात ९८ रुग्णांची तपासणी - उपचार




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ मे : दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अस्थिरोग शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ९८ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले.

या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, अभिजीत देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर एड. स्नेहल उटगे, विलास बँकेचे चेअरमन एड. किरण जाधव, माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेविका खाजाबानू बुऱ्हाण, श्याम धूत, विजय पस्तापुरे , संजीव भार्गव, दीपक वारद , आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचा पॅटर्न निर्माण करण्याचे काम करणाऱ्या डॉ.अशोक पोद्दार यांच्या हॉस्पिटलच्या वतीने आजपर्यंत आयोजित करण्यात आलेले हे १७५ वे अस्थिरोग शिबीर होते, हे विशेष.

जे जे काही नवीन ते ते आपल्या लातूरला हवे या भावनेने लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूरला सर्वांगसुंदर बनवण्याचा ध्यासच घेतला होता. प्रत्येक क्षेत्रात आपले लातूर अव्वल राहिले पाहिजे या हेतूने त्यांनी जवळपास सर्वच क्षेत्रातील व्यावसायिक - उद्योजकांना कायम प्रोत्साहित करण्याचे काम केले होते. आज लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगतीमध्येही या दिवंगत लोकनेत्याच्या दूरदृष्टीचा सिंहाचा वाटा आहे, ही बाब कोणीही नाकारणार नाही. आजच्या या उदघाटनप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी डॉ. अशोक पोद्दार आणि आरोग्य शिबीर हे लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी एक अतूट नाते बनल्याचे मत व्यक्त केले. दिवंगत लोकनेत्याच्या पुण्यतिथी - जयंतीदिनी ते नियमित अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करतात. रुग्णसेवेस प्राधान्य देण्याबरोबरच समाजातील , तळागाळातील रुग्णांनाही अशा शिबिरांच्या माध्यमातून दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात,असेही खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

अभय साळुंके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातूरकरांच्या आरोग्यासाठी लातूर शहरातील बहुतांश तज्ज्ञ डॉक्टर्स अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करतात. त्या सर्वामध्ये डॉ. अशोक पोद्दार यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते हे सर्वांना माहितीच असल्याचे त्यांनी सांगितले. एड. किरण जाधव यांनी आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. अशोक पोद्दार अस्थिरोग शिबिराचा उपक्रम राबविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात, असे सांगून या शिबिराच्या माध्यमातून आपल्या लोकनेत्याला ते दरवर्षी अशा प्रकारच्या अस्थिरोग शिबिराच्या उपचाराच्या रूपाने भावपूर्ण आदरांजली वाहतात,असे सांगितले. पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी या शिबिराच्या निमित्ताने आपल्या हॉस्पिटलमध्ये उपस्थित सर्व प्रमुख अतिथींचे स्वागत केले. आपल्या हॉस्पिटलच्या वतीने नियमित अस्थिरोग शिबिराचे आयोजन करण्यात येते, याबद्दल सर्वच मंडळी आश्र्चर्य व्यक्त करताना दिसतात. पण, आरोग्य शिबिरांचे आयोजन करून त्या माध्यमातून समाजातील तळागाळातील गरजू रुग्णांनाही सेवा देण्याचे ईश्र्वरी कार्य साधले जाते हे आपल्या दृष्टीने महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिराच्या निमित्ताने अस्थिरोग, फिजिओथेरपी, रक्त तपासणी, डिजिटल एक्सरे मध्ये ५० टक्के सूट देण्यात अली. शस्त्रक्रियेमध्ये ३० टक्के तर एमआरआय, सिटीस्कॅन मध्ये १० टक्के सूट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णांना उपलब्धतेनुसार मोफत औषधींचे वितरण करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

या शिबिरात एकूण ९८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये हाडांची मोफत ठिसूळता तपासणी ७३ रुग्ण, एक्सरे ३६ रुग्ण तर २३ रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली. डॉ.अशोक पोद्दार यांच्यासह डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. कपिल धुमुरे, डॉ. सिद्रामप्पा भोसगे,डॉ. प्रशांत अंभोरे, यांनी रुग्णांची तपासणी व उपचार केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे व्यवस्थापक वसीम शेख यांच्यासह सर्व स्टाफने परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## प्राचार्य सलगरे यांचे साहित्य माणुसकीचा धर्म शिकवणारे



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ मे : सिध्दहस्त साहित्यिक प्राचार्य मधुकर सलगरे यांचे साहित्य हे माणुसकीचा धर्म शिकवणारे आहे. त्यांच्या प्रत्येक ग्रंथात तर्कशास्त्राचा अभ्यास करुन जीवन उपयोगी माहिती देण्यात आली आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

राजे मल्हारराव होळकर ट्रस्ट लातूरतर्फे ग्रंथ प्रकाशन आणि पुरस्कार वितरण समारंभ लातूरमधील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ते बोलत होते.

प्राचार्य मधुकर सलगरे लिखित जीवनधर्म चिकित्सा, भूगोलासह या पाचव्या ग्रंथाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिव्य मराठीचे स्टेट हेड सुभाष बोंद्रे हे उपस्थित होते. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सोपानराव जटाळ, डॉ. राजेश पाटील, डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. हमीद चौधरी, अशोकराव काळगे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, प्रवीण देशमुख, अशोक नारनवरे आदी उपस्थित होते. या समारंभात पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राजे मल्हारराव होळकर ट्रस्टच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यामध्ये डॉ. शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी, प्रवीण देशमुख, डॉ. हनुमंतराव किनीकर, डॉ. अशोक नारनवरे, साधनाताई शेटे, संभाजीराव सूळ, अमोल पांढरे, चन्नवीर भद्रेश्र्वरमठ आर्दीचा समावेश होता.

या समारंभात डॉ. अशोक नारनवरे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी आदींनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मधुकर सलगरे यांनी प्रास्ताविक करुन ग्रंथाविषयी भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता खडके यांनी केले तर आभार चंद्रकांत हजारे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश मोरे, उज्ज्वलकुमार माने, उमेश घोडके, अनिता खडके, मनोज अंबुरे, सुधीर भास्करे, राजपाल भंडे, साई सलगरे, नरसिंग काळे, प्रणव रणदिवे, प्राजक्ता रणदिवे आदींनी परिश्रम घेतले.

## 'हिराकाशी' वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप उपक्रम




तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २७ मे : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२, तोंडार येथे विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या जयंतीचे औचित्य साधून कारखान्याच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप करण्यात आले.

मंगळवार, दि. २६ मे रोजी सकाळी ११.०० वाजता विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२, तोंडार येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कारखान्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण

आदरांजली वाहण्यात आली. कारखाना स्थळावरील मुख्य अभिवादन कार्यक्रमानंतर, विलासरावजींच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी कारखान्यामार्फत 'हिराकाशी वृद्धाश्रम सेवालय, धेडिहिप्परगा' येथे अन्नधान्य वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून कारखान्याने आपली सामाजिक कृतज्ञता व्यक्त केली.

# लातूर आयएमए दोषी डॉक्टरांना पाठीशी घालणार नाही; नीट प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ मे : नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून सुरू असलेल्या कारवाईचे इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या लातूर शाखेने स्वागत केले असून या गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयने चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या डॉक्टरांची अत्यंत निष्पक्षपणे आणि सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी संघटनेने शासनास केली आहे. या प्रकरणात ज्या डॉक्टरांचा सहभाग असल्याचा संशय आहे किंवा ज्यांना ताब्यात घेण्यात आले आहे, त्यांना आयएमए कोणत्याही प्रकारे पाठीशी घालणार नाही, असेही स्पष्ट केले आहे.




अशा कोणत्याही बेकायदेशीर व अनैतिक कृत्याचा संघटना निषेध करीत असून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि वैद्यकीय क्षेत्राच्या विश्र्वासार्हतेशी खेळणाऱ्या दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी सीबीआयने कोणत्याही दबावाशिवाय या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन निष्पक्ष चौकशी करावी अशी मागणी केली आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षांची विश्र्वासार्हता टिकून राहणे देशाच्या आरोग्य व्यवस्थेसाठी अत्यंत गरजेचे आहे. पात्र आणि कष्टकरी विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे समर्थन आयएमए कधीही करणार नाही असे लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत ,सचिव डॉ. विश्रांत भारती, वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर पवार, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी अवस्थी यांनी सांगितले. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखेने राज्य स्तरावर हा निर्णय घेतला असून लातूर शाखेनेही या निर्णयाचे स्वागत केले असल्याचे डॉ. राऊत व डॉ. भारती यांनी सांगितले.

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाकडून लातूर शहरात मटका अड्ड्यावर छापा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ मे : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशाने परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत लातूर शहरात मटका अड्ड्यावर छापा मारून ११ जणांविरुद्ध कार्यवाही करण्यात आली आहे.

नांदेड परिक्षेत्रात दि. १ ते ३१ मे, २०२६ दरम्यान अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे.सोमवारी दिवसभरात, परिक्षेत्रात अवैध गुटखा विक्री करणाऱ्या (३) इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून २७,०१,२५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिक्षेत्रात मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण (११) इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (६) गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५५ हजार ६२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या (१६) इसमांविरुद्ध (१६) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २७ हजार ६२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर, अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध (२) गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून १५,०८,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध (३) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ५ लाख ४२ हजार ४००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## श्रावण बाळ योजनेतील जाचक अटी रद्द करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २७ मे : राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना श्रावण बाळ योजनेचा लाभ सहज आणि सुलभ पद्धतीने मिळावा यासाठी योजनेतील जाचक अटी तातडीने रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी माजी नगरसेवक तथा निराधार समितीचे सदस्य संतोष माने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सादर केलेल्या निवेदनात ६५ वर्षांवरील लाभार्थ्यांकडून जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) तसेच रहिवासी दाखला मागविण्याची अट ग्रामीण भागातील वृद्ध नागरिकांसाठी मोठा अडथळा ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे अनेक पात्र ज्येष्ठ नागरिक शासनाच्या महत्त्वाच्या योजनेपासून वंचित राहत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील अनेक वृद्ध नागरिकांनी आयुष्यभर कष्ट करून उदरनिर्वाह केला असून त्यांना शिक्षणाची संधी मिळालेली नाही. त्यामुळे त्यांच्याकडे शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म नोंदी उपलब्ध नसतात. शासनाने मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून या अटी शिथिल कराव्यात आणि पात्र लाभार्थ्यांना पारदर्शक व सुलभ प्रक्रियेद्वारे श्रावण बाळ योजनेचा लाभ द्यावा, अशी मागणी संतोष माने यांनी केली आहे. राज्य शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेतल्यास हजारो निराधार व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## अहमदपुरात भव्य रक्तदान शिबीर ७१ रक्तदात्यांना मोफत हेल्मेट



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २७ मे : वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित वाहनचालना आणि रक्तदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अहमदपूर पोलीस ठाण्याच्या वतीने सोमवारी (दि. २५ मे) भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ७१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे, प्रत्येक रक्तदात्यास - रोटरी क्लब लातूरच्या वतीने मोफत हेल्मेट भेट देण्यात आले.

हा उपक्रम पोलीस अधीक्षक अमोल तांबे व उपविभागीय पोलीस अधिकारी - अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली - पार पडला. शिबिरासाठी डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर आणि रोटरी क्लब लातूर (मिडटाऊन जिल्हा ३१३२) यांनी मोलाचे सहकार्य केले. अहमदपूरचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी सांगितले की, रक्तदानातून गरजू रुग्णांना जीवनदान मिळते, तर हेल्मेटचा वापर अपघातांमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे रक्तदानासोबतच सुरक्षित प्रवासाचा संदेश देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. शिबिरादरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांचे व आयोजकांचे कौतुक केले. स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी बुरकुले, संतोष केदासे, पोलीस उपनिरीक्षक आनंद श्रीमंगल, रोटरी क्लबचे अध्यक्ष कपिल बिरादार, प्रा. अनिल चवळे तसेच पोलीस कर्मचारी तानाजी आरदवाड, मारुती शिंदे, सुकेश केंद्रे, विनोद माने, गोविंद काळे, उमाकांत कासनाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रेणापूर शहर, तालुका काँग्रेसच्या वतीने जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २७ मे : माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती रेणापूर शहर काँग्रेस कार्यालयात मंगळवारी दि. २६ रोजी साजरी करण्यात आली



यावेळी रेणापूर शहरातील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांच्या हस्ते लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद कापसे, शहरध्यक्ष नितीन मोटेगावकर, नगरसेवक पद्मसिंह पाटील, सचिन मोटेगावकर, महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष पुजाताई इगे, काँग्रेस चे ज्येष्ठ कार्यकर्त जगन्नाथ गाडे, संदिपान देशमुख, शिवाजी आकनगिरे, कार्यध्यक्ष रहिम पठाण, विलासराव देशमुख युवा मंच रेणापूर शहराध्यक्ष सचिन पुंडलिकराव इगे, अनुसुचित विभाग तालुकाध्यक्ष अजय चक्रे, चेतन एकुरके, सुरज वंगाटे, भीमाशंकर कोरे, अमोल बंडे, बाळू पटनुरे, मदन पांचाळ, सुरेश फुलारी आदी उपस्थित होते

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा. किशोर चक्रे यांनी केले.

## स्वामी दयानंद विद्यालयाचे ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २७ मे : जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय कव्हा येथील इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी मधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र होऊन देदिप्यमान यश मिळवलेले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ५ वी ८ वी मधील ८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र होऊन स्वामी दयानंद विद्यालयाच्या लौकिकात भर पाडण्याचे कार्य केलेले आहे.

यामध्ये इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पास होऊन शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रबुध्द प्रविण भालेराव १९० गुण, मानसी बालाजी देशमुख १८२ गुण, युवराज गणेश अंकुशे १७० गुण, वैष्णवी विठ्ठल नळगिरे १६४ गुण, यशोदा बालाजी इरले १६४ गुण, विर सिध्दाजी माने १६० गुण घेऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले आहेत तर इयत्ता ८ वी मधून सरस्वती हणुमंत चिंताले १७६ गुण, संध्या नवनाथ कवरे १७४ गुण घेऊन शिष्यवृत्तीस पात्र झालेले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा तथा माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संचालिका आदितीताई पाटील कव्हेकर, समन्वयक अनिरूध्द पाटील, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील,समन्वयक विनोद जाधव, यांच्यासह शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## उज्जैन ज्योर्तिलिंग येथे अधिकमास निमित्य अखंड शिवनाम सप्ताह परमरहस्य ग्रंथ पारायणास प्रारंभ

# दोन हजार शिवभक्तांचा सहभाग

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २७ मे : अधिकमास निमित्य उज्जैन महाकाल ज्योर्तीलिंग येथे अखंड शिवनाम सप्ताह, ग्रंथराज परमरहस्य ग्रंथाचे पारायणास प्रारंभ झाला असुन २५ मे रोजी दोन हजार शिवभक्तांनी यात सहभाग नोंदविला आहे.

अधिकमास निमित्य श्रीगूरु हावगीस्वामी मठसंस्थान रंडयाळ -डोणगाव -पडसावळी -उदगीर मठसंस्थानच्या वतीने मठाधिश श्री.श्री.ष.ब्र. १०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात श्रीक्षेत्र ज्योर्तिलिंग महाकाल उज्जैन येथे सोमवार दि. २५ मे पासुन अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य ग्रंथाचे पारायण व श्री.श्री. ष.ब्र. १०८ अमृतेश्र्वर शिवाचार्य महाराज जिंतूरकर यांच्या शिवकथेस प्रारंभ झाला आहे.

उज्जैन येथील महाकाल ज्योर्तिलिंग उज्जैन येथील हरिहर



धाम आश्रम, मेवाडा, रजपुत समाज, नरसिंह घाटसे, लालपुर मार्ग महाकाल उज्जैन येथील भव्य सभा मंडपात या भव्यदिव्य धार्मिक कार्यक्रमास प्रारंभझाला असुन परमरहस्यग्रंथ पारायणात उदगीरसह मराठवाडयातील विविध जिल्हयातील, आंध्र, कर्नाटक, तेलंगणा राज्यातील दोन हजार महिला पुरुष शिवभक्त सहभागी झाले आहे.

पहिल्या दिवशीचे महाप्रसादाचे एजमान अशोक वैजनाथ आचारे, अनिता अशोक आचारे, श्रीमती प्रेमला शिवर राज रेगुडे यांच्या वतीने महाप्रसाद ठेवण्यात आला होता. २५ मे ते ०१ जुन २०२६ दरम्यान दररोज सकाळी ७ ते ८ शिव पाठ, ९ ते ११ परमरहस्य ग्रंथाचे पारायण, ११.३० वाजता मंगल आरती, २ ते ४ श्री.श्री.ष.ब्र.१०८ अमृतेश्र्वर शिवाचार्य महाराज जिंतूरकर यांची शिवकथा, ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ६ ते ७ रिंगण शिवपाठ, रात्री ९ वाजता किर्तन व शिवजागर आदि कार्यक्रम संपन्न होणार आहेत. ३१ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ गुरुवर्यांची इष्टलिंग महापुजा व तिर्थप्रसाद तर ०१ जुन रोजी परमरहस्य ग्रंथ पारायणाची सांगता व अखंड शिवनाम सप्ताहची सांगता होणार असुन यावेळी धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहेत. २५ ते ०१ जुन दरम्यान होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमास पुरोहित्यकाळ विरभद्र महाराज सताळकर, शंकर महाराज, संदिप महाराज, रामलिंग स्वामी महाराज, शिवशंकर महाराज, नागलगावकर, रतिकांत महाराज, सांब महाराज, शिवराजप्पा महाराज व बाबु महाराज यांनी कार्य केले तर संगीत भजन संगीतकार रविराज किडिले, भिमा भुरे तर तबला वादक हारुबाई सुतार यांच्या टिमने सादर केले. शिवसप्ताह यशस्वी करण्यासाठी श्री. गुरु हावगीस्वामी देवस्थान कमिटी, श्री. गुरु हावगीस्वामी युवक मंडळ, समस्त महिला भजनी मंडळ, व श्रीगुरु हावगीस्वामी पुरोहित्यकार मंडळ परिश्रम घेत आहेत.

## विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण, नातेवाईकांना अन्नदान



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २७ मे : माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर येथील रुग्णालयात (सर्वोपचार रुग्णालय) रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी पानगाव येथील युवा उद्योजक तथा राहूल गांधी युवा मंचचे रेणापूर तालुकाध्यक्ष गुलाब चव्हाण यांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. जवळपास ५०० रुग्ण व नातेवाईकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ हार-तुरे न घालता, गरजूंच्या पोटची भूक भागवून त्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे, अशी भावना गुलाब चव्हाण (तालुकाध्यक्ष, राहुल गांधी युवा मंच) यांनी यावेळी व्यक्त केली. गुलाबा चव्हाण यांच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रसंगी राहुल गांधी युवा मंचचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पानगाव परिसरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी दत्ता माळी, सागर काबरा, जब्बार शेख, अनंत कस्पटे, सूरज भंडारे, गोविंद कवडे आदी उपस्थित होते.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंड्यात कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या चार गायींची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

परंडा शहरातील कुरेशी गल्ली परिसरात कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या बांधून ठेवलेल्या चार गोवंशीय जनावरांची परंडा पोलिसांनी सुटका केली आहे.

या प्रकरणी तिघांविरोधात प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



आरोपी इम्रान गणी कुरेशी, बब्बु कुरेशी आणि अमजद कुरेशी (सर्व रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी २५ मे २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कुरेशी गल्ली, परंडा येथे दोन जर्सी गायी आणि दोन गावरान गायी, अशी एकूण ४० हजार रुपये किमतीची जनावरे चारा-पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचे पोलिसांना आढळून आले.

या प्रकरणी परंडा पोलिसांनी सरकारतर्फे संबंधित आरोपींविरोधात प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियमातील कलम न्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# ‘तांत्रिक उत्पादन’ मॉडेल फेल; प्रत्यक्ष पीक कापणीवरच विमा द्या

**कृषी विद्यापीठाच्या अहवालानंतर जिल्हाधिकाऱ्यांची शासनाकडे शिफारस आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगाच्या आधारेच विमा भरपाई देण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केली असून त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांनी सादर केलेल्या वैज्ञानिक अहवालात ‘तांत्रिक उत्पादन’ (ढशलहपळलरश्र धळशश्रव) प्रणाली प्रत्यक्ष परिस्थितीशी विसंगत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानंतर धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य शासनाकडे प्रत्यक्ष मंडळनिहाय उत्पादकतेच्या आधारेच शेतकऱ्यांना न्याय्य पीक विमा भरपाई देण्याची शिफारस केली आहे.

खरीप हंगाम २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यात ५ लाख ७२ हजार २०३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यापैकी जवळपास ८० टक्के म्हणजेच ३.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती.

जिल्ह्यातील तब्बल ४ लाख ९६ हजार ९१ शेतकऱ्यांनी ICICI Lombard General Insurance कडे पीक विमा घेतला होता. मात्र, मे २०२५ मध्ये २७९.६ मि.मी. इतका विक्रमी पाऊस झाला.

त्यानंतर जून ते ऑक्टोबरदरम्यान जिल्ह्यात २२० वेळा अतिवृष्टीची नोंद झाली. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात १४१ वेळा अतिवृष्टी झाल्याने सरासरीच्या १५९ टक्के पाऊस पडला. यामुळे सोयाबीन पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शासकीय पंचनाम्यानुसार ९२ टक्के क्षेत्र बाधित झाले होते.



या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ५०४ पीक कापणी प्रयोग नियोजित करण्यात आले होते. मात्र विमा कंपनीने त्यातील ३६८ प्रयोगांवर आक्षेप घेतला. त्यानंतर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने ५० टक्के पीक कापणी प्रयोग आणि ५० टक्के तांत्रिक उत्पादन (ऊडडढ मॉडेल) यांच्या सरासरीवर आधारित अहवाल स्वीकारला. या अहवालात प्रत्यक्ष शेतात ३ ते ४ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन असताना काही महसूल मंडळांमध्ये १० ते १२ क्विंटल उत्पादन दाखवण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील नुकसान केवळ १० टक्के असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता.

या निष्कर्षाला आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तीव्र विरोध दर्शवत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन स्वतंत्र तज्ज्ञांकडून तांत्रिक पडताळणी करण्याची मागणी केली होती.

तसेच कृषी आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडेही त्यांनी पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने कृषी विद्यापीठाकडून वैज्ञानिक अहवाल मागविला.

कृषी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र प्रकल्पातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांनी २२ मे २०२६ रोजी सादर केलेल्या अंतिम अहवालात तांत्रिक उत्पादन मॉडेल जिल्ह्यातील भौगोलिक आणि हवामान परिस्थितीशी पूर्णतः विसंगत असल्याचे नमूद केले आहे. सततचा पाऊस, ढगाळ वातावरण, सूर्यप्रकाशाची कमतरता तसेच बुरशी व मूळ कुजण्यासारख्या रोगांमुळे झालेले २५ ते ३० टक्के नुकसान या मॉडेलमध्ये विचारातच घेतले गेले नसल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेषतः परंडा, मंगरूळ, धाराशिव शहर, सावरगाव आणि सोनारी या मंडळांमध्ये प्रत्यक्ष उत्पादन आणि मॉडेलमध्ये दाखवलेले उत्पादन यामध्ये २५० ते ३५० टक्क्यांपर्यंत तफावत आढळून आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष ‘पीक कापणी प्रयोग’ हेच वैज्ञानिकदृष्ट्या अचूक असल्याचे कृषी विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीकडे अधिकृत पत्र पाठवत केंद्र शासनाने निर्धारित केलेली तांत्रिक उत्पादकता प्रणाली अमान्य करून प्रत्यक्ष मंडळनिहाय उत्पादनाच्या आधारेच शेतकऱ्यांना विमा भरपाई देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील एकाही बाधित शेतकरी बांधवाला त्याच्या हक्कापासून वंचित राहू देणार नाही.

केंद्रीय समितीकडून शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय व्हावा यासाठी पाठपुरावा सुरूच राहील, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## पाथरूडला सीएसआर निधीतून ई-गार्बेज कलेक्शन वाहनाची भेट



### खा. ओम राजेनिंबाळकर यांच्या प्रयत्नातून घंटागाडीचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ मे -**

धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रयत्नातून सीएसआर निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-गार्बेज कलेक्शन वाहनाचे (घंटागाडी) लोकार्पण पाथरूड येथे प्रमुख पाहुणे व ग्रामस्थांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

भूम तालुक्यातील पाथरूड गावाचा वेगाने विस्तार होत असून गावातील मूलभूत सुविधांची गरजही वाढत आहे. विशेषतः ओला व सुका कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र वाहनाची आवश्यकता ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आली होती.

ही बाब खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ सीएसआर निधीतून ई-गार्बेज कलेक्शन वाहन उपलब्ध करून दिले.

या घंटागाडीमुळे गावातील ओला व सुका कचरा व्यवस्थापन अधिक सुलभ होणार असून गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यास मोठी मदत होईल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. गावातील विविध विकासकामांप्रमाणेच या वाहनामुळेही पाथरूडच्या विकासात आणखी भर पडेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास डॉ. चेतन बोराडे, युवा उद्योजक भाऊसाहेब बोराडे, ग्रामपंचायत सदस्य धोंडीबा टिळक, शहाजी आठवले, सेवानिवृत्त अधिकारी इंजिनिअर शिवाजी बोराडे, ग्राम पंचायत अधिकारी महादेव गिरी, ज्येष्ठ नेते बिभीषण तात्या तीकटे, गायनाचार्य चंद्रहार मनगिरे, चेअरमन धनंजय बोराडे, व्हाइस चेअरमन संदिपान पवार यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उस्मानाबाद-लातूर-बीड मतदार संघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**धाराशिव, दि.२७ मे -**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची मराठी व इंग्रजी प्रारूप मतदार यादी २२ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ही यादी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषद व नगर पंचायत कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. मतदार यादी किंवा प्रारूप मतदान केंद्र यादीबाबत हरकती, दावे किंवा आक्षेप असल्यास संबंधितांनी २९ मे पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अधिक मासामुळे तुळजाभवानी मंदिरात भाविकांची गर्दी वाढली

### दर्शन व्यवस्थेच्या वेळेत तात्पुरता बदल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

अधिक मास तसेच उन्हाळी सुट्ट्यांमुळे श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राज्यासह परराज्यातून दररोज हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरमध्ये दाखल होत असून मंदिर परिसरात मोठी गर्दी होत आहे.

या पार्श्वभूमीवर भाविकांना सुलभ आणि सुरळीत दर्शन मिळावे यासाठी मंदिर प्रशासनाने विशेष निर्णय घेतला आहे. तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार दि.२७ मे ते शनिवार दि.३० मे या कालावधीत मंदिर दर्शन



व्यवस्थेच्या वेळेत तात्पुरता बदल करण्यात आला आहे.

या चार दिवसांच्या कालावधीत मंदिरातील चरणतिर्थ विधी रात्रौ १ वाजता पार पडणार असून त्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले ठेवण्यात येणार आहे. सकाळची पूजेची घाट पहाटे ६ वाजता होणार असून त्यानंतर अभिषेक विधी पार पडतील.

अधिक मासामुळे धार्मिक महत्त्व वाढल्याने तसेच शाळांना उन्हाळी सुट्ट्या असल्याने कुटुंबासह भाविक मोठ्या संख्येने तुळजापूरला येत आहेत. त्यामुळे मंदिर परिसर, दर्शन रांगा तसेच शहरातील प्रमुख मार्गांवर गर्दीचे प्रमाण वाढले आहे.

भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, दर्शन प्रक्रिया सुरळीत पार पडावी आणि धार्मिक विधी वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी प्रशासनाने ही विशेष व्यवस्था लागू केली आहे. अधिक मास संपेपर्यंत तुळजापूरमध्ये भाविकांचा ओघ कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांमुळे संपूर्ण तुळजापूर नगरी पुन्हा एकदा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने उजळून निघाली आहे.

## गुटखा जप्त; २ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

आनंदनगर परिसरात शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि तत्सम पदार्थ विक्रीसाठी ठेवणाऱ्या दुकानदाराविरोधात आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पाशामिया कासीमसाब तांबोळी (वय ६२, रा. गालिबनगर) यांनी २६ मे २०२६ रोजी सायंकाळी ६.२० वाजण्याच्या सुमारास आर. के. जनरल स्टोअर्स व पान स्टॉल येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगल्याचे आनंदनगर पोलीस ठाण्याच्या पथकाला आढळून आले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी सुमारे २ हजार ८०० रुपये किमतीचा गुटखा आणि संबंधित साहित्य जप्त केले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## गांजा प्रकरणाची माहिती दिल्याच्या संशयातून २५ लाखांची खंडणी मागितल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

गांजा प्रकरणात पोलिसांना माहिती दिल्याच्या संशयातून २५ लाख रुपयांची खंडणी मागून मारहाण केल्याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरेश शामराव पवार (वय ३६, रा. कल्याणनगर, भुम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी दत्ता बिरु




काळे, रावजी दत्ता काळे, सुब्राव रमेश काळे आणि बप्पा सवंत काळे (सर्व रा. भुम, ता. भुम, जि. धाराशिव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, १५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून ते २९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत आरोपींनी फिर्यादीस गांजाच्या गुन्ह्याबाबत पोलिसांना माहिती का दिली? असा जाब विचारत २५ लाख रुपयांची मागणी केली. तसेच शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी सुरेश पवार यांनी २६ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## मोटार चोरीच्या बदनामीतून शेतकऱ्याची आत्महत्या?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

बावी येथील एका व्यक्तीने बदनामी आणि मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी पाच जणांविरोधात भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत विलास काशीनाथ भोसले (वय ४१, रा. अंबिका नगर, बावी, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी १८ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.५४ ते ७.१५ वाजण्याच्या दरम्यान बावी शिवारातील विश्वनाथ भोसले यांच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी आरोपी विश्वनाथ दिगंबर भोसले, लालू प्रकाश भोसले, प्रकाश विश्वनाथ भोसले, बाबू मारुती पिंपळे आणि उमेश रोहीदास राऊत (सर्व रा. बावी, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी मयत विलास भोसले हे तळ्यातील पाण्याची मोटार घेऊन जात असल्याचे छायाचित्रण करून ते इतरांना दाखवले.

तसेच मोटार चोरी केली अशी बदनामी केल्याने मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

मयताचे पुत्र प्रसाद विलास भोसले (वय २२) यांनी २५ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## एमपीएससी पूर्व परीक्षेसाठी धाराशिव प्रशासन सतर्क

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट अ व गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सतर्क झाले असून परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत कडक प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील तब्बल १ हजार ८७२ उमेदवार ही परीक्षा देणार आहेत.

अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव यांनी जारी केलेल्या आदेशानुसार परीक्षा काळात केंद्र परिसरातील शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी तसेच परीक्षार्थींना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत. ही परीक्षा ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील श्रीपतराव भोसले हायस्कूल (पार्ट-अ व पार्ट-ब), अण्णा ई-टेक्नो विभाग, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ची नवीन व जुनी इमारत तसेच जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

प्रशासनाच्या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात घोषणाबाजी अथवा शांततेस बाधा पोहोचवणाऱ्या कोणत्याही कृतीस मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, संगणक केंद्रे आणि इंटरनेट कॅफे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, इंटरनेट साधने, संगणक, कॅल्क्युलेटर, घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही वाहनांना परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेशी संबंध नसलेल्या व्यक्तींना प्रवेशबंदी करण्यात आली असून केवळ अधिकारी-कर्मचारी, शासकीय कर्मचारी, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि परीक्षार्थींनाच प्रवेश दिला जाणार आहे. परीक्षार्थींच्या नातेवाईकांनाही प्रवेश दिला जाणार नसल्याचे आदेशात स्पष्ट केले आहे.

परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली असून हे आदेश ३१ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहणार आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ नुसार गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## भुम येथील बौद्ध विहार तोडफोड प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करा

**दोषींवर ट्रॉसिटी कायद्यान्वये कठोर कारवाईची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा...**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ मे -**

भुम येथे १४ मे २०२६ रोजी झालेल्या बौद्ध विहार तोडफोड आणि दगडफेक प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बौद्ध समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी, कळंब यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, १४ मे रोजी अंदाजे दीडशे ते दोनशे समाजकंटकांच्या जमावाने भुम येथील भीमनगर परिसरात घुसून पवित्र बौद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मोडतोड केली. तसेच समाज बांधव आणि महिलांवर हल्ला करून मोठ्या प्रमाणात दगडफेक करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सदर हल्ला हा बौद्ध समाजाला लक्ष्य करून नियोजित पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित समाजकंटक आणि जातीयवादी व्यक्तींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ट्रॉसिटी क्ट) कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करून बौद्ध समाजाला संरक्षण द्यावे आणि समाजातील निष्पाप व्यक्तींवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अन्यथा बौद्ध समाजाच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर सतपाल बनसोडे, अनिल हजारे, बळीराम सावंत, मानव हौसलमल, अमर गायकवाड, निलेश गोजीकर, गणेश डिगुळे, राहुल हौसलमल, अजय जावळे, सुनील हजारे, प्रतीक निकाळजे यांच्यासह समाजबांधव व कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रुईभर येथे घरफोडी; सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

तालुक्यातील रुईभर येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लहु विश्वनाथ मते (वय ३५, रा. रुईभर, ता. जि. धाराशिव) यांच्या राहत्या



घरात अज्ञात व्यक्तीने २४ मे २०२६ रोजी रात्री ११ ते २५ मे रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान प्रवेश केला.

चोरट्याने घरातील अंदाजे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, किंमत सुमारे ३२ हजार रुपये, असा ऐवज चोरून नेला. घटना लक्षात आल्यानंतर लहु मते यांनी बेंबळी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### काक्रंबा-होनाळा रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

**तुळजापूर, दि.२७ मे -**

काक्रंबा-होनाळा दरम्यान नुकताच सिमेंट रस्ता तयार करण्यात आला असून या रस्त्यावर वाहने अतिवेगाने धावत असल्याने मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद शाळा याच रस्त्यावर असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी चेतन बंडगर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सद्दाम मुलाणी उपस्थित होते. रस्त्यावर तात्काळ गतिरोधक बसविण्यात आले नाहीत तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही चेतन बंडगर यांनी दिला.

### भारतीय प्रज्ञा शोध परीक्षेत स्वानंदी महामुनी जिल्ह्यात प्रथम

**भूम, दि.२७ मे -**

भारतीय प्रज्ञा शोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत स्वानंदी हारिभाऊ महामुनी हिने जिल्ह्यात प्रथम



क्रमांक मिळविला आहे. ती श्री गुरुदेव दत्त प्राथमिक विद्यामंदिर येथील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी आहे. अत्यंत कमी वयात मिळविलेल्या या यशामुळे शाळा, पालक आणि भूम शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्वानंदी हिने बुद्धिमत्ता, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. लहान वयापासून अभ्यासाची आवड जोपासल्यास मोठे यश मिळविता येते, हे स्वानंदीच्या यशातून दिसून येत आहे. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# डिझेल टंचाईने वाशी तालुक्यातील शेतकरी संकटात

### पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा; खरीपपूर्व मशागतीची कामे खोळंबली

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ मे -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात सध्या डिझेल टंचाईची समस्या तीव्र होत असून त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होताना दिसत आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर इंधन पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा असून त्याची झळ आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचली आहे.

पावसाळा तोंडावर आल्याने शेतकऱ्यांनी पूर्वमशागतीच्या कामांना वेग दिला आहे. नांगरणी, मेघडणी, वखरणी यांसारखी शेतीची महत्त्वाची कामे सध्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने सुरू आहेत. मात्र, पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने अनेक शेतकऱ्यांची कामे खोळंबली आहेत.

वाशी तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तासन्तास प्रतीक्षा करूनही डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. डिझेलअभावी ट्रॅक्टर बंद पडल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण होतील का, अशी चिंता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

डिझेलच्या किमतीत झालेली वाढ आणि वेळेवर इंधन उपलब्ध न होणे यामुळे शेती मशागतीचा खर्चही वाढला आहे.

ट्रॅक्टरद्वारे करण्यात येणाऱ्या मशागतीच्या दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. आधीच नैसर्गिक संकटे, वाढते उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींना सामोरे




जाणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता डिझेल टंचाईचे नवे संकट उभे ठाकले आहे.

आधुनिक शेती मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरणावर अवलंबून असताना डिझेल तुटवड्यामुळे खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात डिझेलचा पुरेसा पुरवठा करून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी वाशी तालुक्यातील शेतकरी करत आहेत.

## सततच्या नापिकीला कंटाळून युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२७ मे -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे आरळी खुर्द येथील एका युवा शेतकऱ्याने सततच्या नापिकीला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि. २३ मे) सायंकाळी घडली. इमाम हबीब व्हगे (वय ४०) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.



### आरळी खुर्द येथील घटना; कर्जाच्या विवंचनेतून टोकाचे पाऊल

इमाम व्हगे हे वडिलोपार्जित शेती कसून आपल्या ब कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे, पिकांची नापिकी आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे त्यांना सतत आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. आर्थिक संकटावर मात करण्यासाठी त्यांनी वडिलांच्या नावावर बँकेचे कर्ज घेतले होते. तसेच खासगी व्यक्तींकडूनही आर्थिक मदत घेत कुटुंबाचा गाडा हाकत होते.

सतत वाढणाऱ्या कर्जाच्या तणावातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा गावात सुरू आहे.

त्यांच्यावर रविवारी (दि. २४ मे) दुपारी आरळी खुर्द येथील कब्रस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ, भावजय असा मोठा परिवार आहे. घरातील कर्ताधर्ता व्यक्ती गेल्याने कुटुंबावर मोठा मानसिक आघात झाला असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

## हॉस्पिटलच्या संरक्षक भिंतीच्या वादातून डॉक्टरला मारहाण

### परंडा नगराध्यक्षांसह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

परंडा शहरात हॉस्पिटलच्या संरक्षक भिंतीच्या कारणावरून डॉक्टरला मारहाण झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी परंडा नगराध्यक्ष जाकीर सौदागर, वाहेद सौदागर यांच्यासह पाच जणांविरोधात परंडा पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. २५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परंडा शहरातील कुडूवाडी रस्त्यावरील समता नगर येथे डॉ. आनंद मोरे यांचे 'मोरे मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल' आहे.

डॉ. मोरे हे हॉस्पिटलमध्ये असताना वाहेद सौदागर यांनी संरक्षक भिंतीच्या कारणावरून त्यांना फोन करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी डॉ. मोरे यांच्या कक्षात घुसून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. यावेळी त्यांच्यासोबत आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी गैरकायद्याची मंडळी जमवून डॉ. मोरे यांना लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने मारहाण करून जखमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



घटनेदरम्यान डॉ. मोरे यांच्या पत्नी डॉ. रमा मोरे यांनी माझ्या पतीला का मारता? अशी विचारणा केली असता त्यांनाही शिवीगाळ करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी डॉ. आनंद मोरे यांच्या फिर्यादीवरून जाकीर सौदागर, वाहेद सौदागर आणि तीन अनोळखी व्यक्ती अशा एकूण पाच जणांविरोधात परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सिरसाट करीत आहेत.

### वडगाव येथे तिरट मटका जुगार अड्ड्यावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

धाराशिव शहर पोलीस ठाणे यांच्या जुगार विरोधी पथकाने मंगळवारी वडगाव येथील बंद पडलेल्या कुक्कुटपालन केंद्रावर छापा टाकून तिरट मटका जुगार अड्डा उद्ध्वस्त केला.

या कारवाईत आरोपी तुकाराम भागवत जाधव, मारुती भाऊ जाधव यांच्यासह इतर ११ जणांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून जुगार साहित्य, ४ मोटारसायकली, ११ मोबाईल फोन असा एकूण ४ लाख ९० हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुजरातचे आ. कनुभाई पटेल यांचे तुळजाभवानी दर्शन

### पुजारी फाउंडेशनकडून पटेल यांचा सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

कनुभाई करमशीभाई पटेल यांनी बुधवारी तुळजापूर येथे येऊन तुळजाभवानी मंदिर येथे दर्शन घेत देश व राज्याच्या जनकल्याणासाठी प्रार्थना केली.

गुजरातमधील सानंद विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार असलेल्या पटेल यांचे तुळजापुरातील पुजारी फाउंडेशनच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.

पुजारी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या हस्ते आमदार पटेल यांना शाल, श्रीफळ आणि आई तुळजाभवानीची प्रतिमा देऊन



सन्मानित करण्यात आले. यावेळी नगरसेवक विशाल रोचकरी तसेच संभाजीनगर खंडपीठातील विधीज्ञ ओमगशद बोईनवाड यांचाही सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बापू जगदे, प्रतिक रोचकरी, राहुल जाधव यांच्यासह स्थानिक नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तुळजापूरकरांनी केलेले आदरातिथ्य अविस्मरणीय असल्याची भावना आमदार कनुभाई पटेल यांनी व्यक्त केली.

## कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम सोबत राहू ; प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी

### माथाडी कामगारांच्या आंदोलनाला डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्या आणि न्याय्य हक्कांसाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनाला आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी भेट देत आंदोलक कामगारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी माथाडी कामगारांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा देत त्यांच्या हक्कांसाठीच्या प्रत्येक लढ्यात कायम सोबत राहण्याची ग्वाही दिली.



आंदोलनस्थळी उपस्थित माथाडी कामगारांच्या समस्या, अडचणी आणि विविध मागण्यांविषयी डॉ. पाटील यांनी सविस्तर माहिती घेतली. कामगारांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासन व प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना डॉ. प्रतापसिंह पाटील म्हणाले, माथाडी कामगार हे समाजातील कष्टकरी घटक असून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा संघर्ष अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन कामगारांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा.

या भेटीदरम्यान नगरसेवक सुनील आंबेकर, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सर्फराज कुरेशी, नगरसेवक अशोक देवकते, युवक प्रदेश सरचिटणीस इंजिनिअर रामेश्वर पवार, जिल्हा संघटक अमोल सुरवसे, शहर कार्याध्यक्ष नरसिंह मिटकरी, ॲड. योगेश सोन्नेपाटील, शुभम सुकाळे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोन्याच्या पट्ट्यांचे आमिष दाखवून ४ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मे -**

सोन्याच्या पट्ट्या विकण्याचे आमिष दाखवून एका युवकाची ४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना धाराशिव शहरात उघडकीस आली आहे.

या प्रकरणी अनोळखी महिला आणि पुरुषाविरोधात धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहित हरीशचंद्र कदम (वय ३१, रा. बौद्धनगर, धाराशिव) हे २० मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास वैराग बिलाल कॉलनी परिसरात त्यांच्या एमएच १३ एफए ४४६० क्रमांकाच्या मोटारसायकलवर होते.

यावेळी एक अनोळखी पुरुष आणि एक महिला यांनी फिर्यादीशी संपर्क साधून सोन्याच्या पट्ट्या विकायच्या आहेत असे सांगत विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांनी रोहित कदम यांच्याकडून ४ लाख रुपये घेऊन सोन्याच्या पट्ट्या दिल्या.

मात्र, संबंधित पट्ट्यांची तपासणी केली असता त्या सोन्याऐवजी पितळ धातूच्या असल्याचे उघड झाले.

या प्रकरणी रोहित कदम यांनी २६ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भारतीय

# जलतारा अभियान कासवगतीने; कळंब तालुक्यात जेसीबीअभावी कामे रखडली

### प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे योजनेची फजिती; शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२७ मे -**

पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जलतारा खड्डे व्यवस्थापन योजनेची कळंब तालुक्यात संथ गतीने अंमलबजावणी होत असल्याचे चित्र आहे. अपुऱ्या जेसीबी मशिन्समुळे अनेक गावांतील कामे रखडली असून प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे ही महत्त्वाकांक्षी योजना अर्धवट राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी राबवलेल्या जलतारा प्रयोगाची दखल राज्य शासनाने घेत प्रत्येक गावात अशा प्रकारचे उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातही जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सर्व तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांना हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र कळंब तालुक्यात या योजनेच्या अंमलबजावणीकडे सरकारी यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. शेकडो गावे असलेल्या तालुक्यात अवघ्या तीन ते चार जेसीबी मशिन्स उपलब्ध असल्याने कामांवर मोठा ताण निर्माण झाला आहे.

खामसवाडी, मोहा, येरमाळा, ईटकुर, शिराढोण, मंगरूळ यांसारख्या मोठ्या गावांमध्ये जलतारा खड्डे घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असतानाही मशिनअभावी कामे ठप्प झाल्याचे दिसत आहे.

यासंदर्भात कृषी विभागाशी संपर्क साधला असता, नाम फाउंडेशन आणि महसूल विभागाकडून मर्यादित मशिन्स उपलब्ध झाल्याने कामांवर ताण वाढल्याची माहिती मिळाली. तसेच अनेक खाजगी जेसीबी मालकांचे शासकीय देयके थकीत असल्याने त्यांनी या कामांकडे पाठ फिरवल्याचेही समोर आले आहे.

एक एकर क्षेत्रासाठी एक खड्डा अशी या अभियानाची संकल्पना आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास हजारो हेक्टरवरील विहिरी आणि कुपनलिकांच्या पाणीपातळीत वाढ होणार असल्याचे सांगितले जात आहे. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वी स्वखर्चाने अशा प्रकारचे प्रयोग राबवले असून त्यामुळे विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याचा अनुभव त्यांनी घेतला आहे. गतवर्षीही जलतारा अभियान सुरू करण्यात आले होते. मात्र मे महिन्यात लवकर झालेल्या पावसामुळे ते अभियान अर्धवट राहिले होते. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात जलसंधारण आणि पाणी साठवणूक योजनांना गती देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अशा परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशित केलेल्या जलतारा अभियानात कृषी आणि महसूल प्रशासनात आवश्यक समन्वय नसल्याने योजना कहीं खुशी, कहीं गम अशी झाल्याची



चर्चा तालुक्यात सुरू आहे. योजना शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असली तरी अंमलबजावणीतील ढिसाळपणामुळे कळंब तालुक्यात तिची फजिती होत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.